७४

INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING

UNIVERSITY OF MUMBAI

# द्वितीय वर्ष कला

## मराठी - अभ्यासपत्रिका क्र. २

Scanned by CamScanner

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. संजय देशमुख**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अंबुजा साळगावकर**
प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्रभारी, अभ्यास साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. धनाजी गुरव,**
प्राचार्य व प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
महाड, जि.रायगड

**संपादन** : **डॉ. वसंत सीताराम शेकडे**
कणकवली महाविद्यालय,
कणकवली, जि. सिंधुदुर्ग

**लेखन** : **प्रा. संजय निचिते**
पी. डी. कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ

: **डॉ. नंदकुमार इंगळे**
मातोश्री सुमतीबाई चिटणीस महाविद्यालय, नेरळ, ता. ठाणे

: **डॉ. संजय चिताळकर**
कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, शिवळे, मुरबाड

: **प्रा. सुभाष अडावतकर**
सा. प्रा. किर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई

: **प्रा. राजेंद्र डोंगरदिवे**
बी. एन. एन. महाविद्यालय, भिंवडी, जि. ठाणे

**पुर्नमुद्रण : जून २०१७, द्वितीय वर्ष कला मराठी - अभ्यासपत्रिका क्र. २**

**प्रकाशक :** : **प्रभारी संचालक,** दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**प्रकाशन :** मेल ऑर्डर सोल्युशन इंडिया प्रा. लि.
४०६, रहेजा प्लाझा,
प्लाट क्र. १५/बी, न्यू लिंक रोड,
अंधेरी (पश्चिम), मुंबई -४०० ०५३.

Scanned by CamScanner

# द्वितीय वर्ष कला
# मराठी अभ्यासपत्रिका क्र. दोन

## अभ्यासक्रम

| | |
|---|---|
| घटक क्र. १ | कादंबरी - एक साहित्य प्रकार |
| घटक क्र. २ | गोतावळा - आनंद यादव (कादंबरी) |
| घटक क्र. ३ | रोबो - दीनानाथ मनोहर (कादंबरी) |
| घटक क्र. ४ | प्रवास वर्णन - एक साहित्य प्रकार |
| घटक क्र. ५ | तोकोनामा - प्रभाकर पाध्ये (प्रवासवर्णन) |
| घटक क्र. ६ | घाट शिळेवरी उभी - रा. भि. जोशी - (प्रवासवर्णन) |

# १

# कादंबरी : एक साहित्यप्रकार

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना
१.२ कादंबरीचे घटक
१.३ मराठी कादंबरीची परंपरा
१.४ संदर्भ ग्रंथ सूची

## १.१ प्रस्तावना

संगीत, चित्र, शिल्प आदी कलाप्रकारांप्रमाणेच साहित्य ही एक ललित कला आहे. शब्द हे साहित्यकलेचे माध्यम असून समग्र जीवनचित्रण हे साहित्याचे मूलद्रव्य असते. साहित्य म्हणजे जीवनानुभवांचे प्रकटीकरण. हे जीवनानुभव साहित्यिक शब्दांच्या माध्यमातून साकारत असतो. आणि हे जीवनानुभव पाहूनच तो आकृतीबंधाची निवड करत असतो.

सामान्यपणे कथात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म असे ललित साहित्याचे तीन वर्ग कल्पिले जातात. भावकाव्यात कवितेचा, नाट्यात्म साहित्यात नाटक, एकांकिकेचा तर कथात्म साहित्यात महाकाव्य, कथा व कादंबरीचा अंतर्भाव होतो. स्थूलपणे भावकाव्यात भावनेला, नाटकात संघर्षाला तर कथात्म साहित्यात घटनांना महत्त्व असते. यातील कथा व कादंबरी हे गद्याच्या वापरामुळे काव्याहून वेगळे ठरतात. कथा व कादंबरीतील साम्यभेद मांडताना डॉ.सुधा जोशी म्हणतात,"कथेप्रमाणेच कादंबरीची समष्टी देखील अनुभव, कथानक, पात्र, वातावरण, कथनपध्दती व भाषा या घटकांगांनीच आकारत असते. कथात्म साहित्याचे मुख्य धर्म कथा - कादंबरी समान असले तरी हे दोन्ही साहित्यप्रकार स्वतंत्र आहेत. कथा हा स्फूट साहित्यप्रकार आहे तर कांदबरी हा दीर्घ साहित्यप्रकार आहे. तसेच स्फूटता व दीर्घता या विशेषांना निव्वळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक अर्थवत्ता आहे. म्हणजे कथा व कादंबरी यांमधील फरक नुसता दीर्घतेचा, आकाराचा नसून प्रकाराचा आहे. कथेत रचनेचे, अनुभवाचे एककेंद्रिंत्व असते तर कादंबरी ही अनेक केंद्री असते. कादंबरीत अनुभवांच्या अनेकविध संघटना असतात. या संघटनांचा परस्पर-अनुबंध असतो, तसेच त्यांना स्वायत्त असे अस्तित्वही असते. त्यांच्यात स्वतंत्र विकसिनशीलता असते. यातून कादंबरीच्या अनुभवार्थात विशेष व्यामिश्रता येते, तसेच तिच्या संघटनेत विशिष्ट जातीचा लवचिकपणा, मोकळेपणा येतो."

कादंबरी हा एक दीर्घ कथात्मक साहित्यप्रकार आहे. इंग्रजी Novel या संज्ञेचा ' कादंबरी ' हा मराठी पर्याय असून बाणभट्टाच्या ' कादंबरी ' या कथाप्रबंधावरून मराठीत रूढ झाला. Novel या संज्ञेचे मूळ लॅटिन रूप Novus म्हणजे नवीनतेचा साज ल्यायलेले आणि त्याच्या Novella या इटालियन रूपावरून ही संज्ञा इंग्रजीत आली. इंग्रजी साहित्यात

कादंबरीचा उदय अठराव्या शतकात झाला व मराठी साहित्यात इंग्रजी कादंबऱ्यांच्या धर्तीवर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाला. म्हणूनच "कादंबरी हा शब्द आपला पण कल्पना परकीय म्हणावी लागेल " असे प्र. वा. बापट, ना. वा. गोडबोले म्हणतात.

कादंबरी हा विस्तृत अवकाश असलेला प्रवाही साहित्यप्रकार आहे. मानवी जीवनव्यवहाराबरोबरच कादंबरीच्या आशय - आकृतीबंधात झपाट्याने बदल होत आहे. त्यामुळे कादंबरीची एकच एक व्याख्या सिध्द करता येत नाही. पाश्चात्य कादंबरीकार फील्डींगच्या मते, "गंभीर वातावरण नसलेले गद्य महाकाव्य म्हणजे कादंबरी होय." येथे फील्डींग कादंबरीसाठी मोठा फलक स्वीकारताना दिसतो. तर एस. जी. वेल्स यांनी "ज्यात सर्व काही सामावेल अशी गारूड्यांची पोतडी" अशी कादंबरीची गंमतीदार व्याख्या केली आहे. कादंबरीच्या या व्याख्येत तिच्या विस्तृत पटावर, व्याप्तीवर भर दिलेला आहे.

निवेदन हा कादंबरीतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. तेव्हा निवेदनाला महत्त्व देऊन " कादंबरी म्हणजे विस्तारी निवेदन किंवा कथन होय", " कादंबरी म्हणजे विशिष्ट लांबी असणारे विस्तृत निवेदन" अशा कादंबरीच्या व्याख्या केल्या गेल्या आहेत.

आजच्या विकसित होत गेलेल्या कादंबरीच्या दृष्टीने वरील सर्व व्याख्या काहीशा अपुऱ्याच आहेत. कारण कादंबरीचे स्वरूप झापाट्याने बदलत आहे., विकसित होत आहे. वेगवेगळ्या जीवनक्षेत्रातील अनुभवांचे आकलन करण्याचा ती प्रयत्न करीत आहे. ग्रामीण, दलित, प्रादेशिक, राजकीय, ऐतिहासिक, पौराणिक अशा अनेक वाटांनी, दिशांनी ती प्रयोगशील होते आहे.

कादंबरीच्या विशाल स्वरूपाला सामावून घेणारी एकच एक काटेकोर व्याख्या जरी करता आली नाही तरी स्थूलमानाने कादंबरीची लक्षणे सांगता येतात. डॉ. उषा हस्तक यांनी ती सांगितली आहेत.

१) कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे. तिला किमान लांबी तर हवीच, त्याशिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही. तिच्या लांबीची किमान आणि कमाल मर्यादा सूचित करण्यासाठी शब्दसंख्येचा आधार घेण्यात आलेला आहे.

२) कादंबरीत कथनाला म्हणजेच निवेदनाला महत्त्व असते.

३) कादंबरीने व्यापलेल्या विषयांची वर्गवारी निश्चित करता येत नाही.

४) लघुकथा आणि लघुकादंबरी ह्यांच्यापेक्षा तिला मानवी जीवनव्यवहारांचे दर्शन आधिक व्यापक स्वरूपात घडविता येते. कारण, तिचा फलक त्यांच्याहून अधिक विस्तृत असतो.

५) घटना, व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या साहाय्याने मानवी जीवनाशी निगडित असणाऱ्या वास्तवाच्या विविधस्तरीय, व्यामिश्ररूपांचे दर्शन तिला घडविता येते. त्यासाठी, सामान्यतः स्थल - कालाच्या व्यापक पटाचा उपयोग केलेला असतो.

इतर कोणत्याही वाड्.मयप्रकारापेक्षा कादंबरी हा अत्यंत लवचिक व मुक्त असा वाड्.मयप्रकार आहे. काव्य, नाटक, कथा, चरित्र, या सर्वांना कादंबरीत स्थान मिळू शकते. पुराण, इतिहास कादंबरीच्या कक्षेत येऊ शकतात. थोडक्यात, अनेककेंद्री अनुभूती संक्रमित करणारा, मानवी जीवनव्यवहारांचा अर्थ लावू पाहणारा हा कथात्म गद्य वाड्.मयप्रकार आहे.

## १.२ कादंबरीचे घटक

कथाबीज, कथानक, व्यक्तिरेखा, घटना, निवेदन, वातावरण अशा अनेक घटकांनी मिळून कादंबरीची संरचना उभी राहते. या प्रत्येक घटकांचे कादंबरीत आगळे महत्त्व असते.

१) **कथाबीज :-** कथाबीज हा कादंबरीचा एक मूलघटक होय. एकप्रकारे तो कादंबरीचा गाभाच असतो. ज्यातून लेखकाला कादंबरी लिहिण्याचे सूचते त्यास 'कथाबीज' म्हणतात. हे कथाबीज लहानसे असते. ते एखाद्या घटनेत, एखाद्या व्यक्तीत वा एखाद्या विचारात असू शकते. उदा. खेड्यातील धनगरांचे अभावग्रस्त जनजीवन व तेथील भयानक दुष्काळ हा विषय व्यंकटेश माडगूळकरांना 'बनगरवाडी' कादंबरी लिहिण्याची प्रेरणा देऊन गेला.

कवी, नाटककार यांच्याप्रमाणेच कादंबरीकारही आपल्या अवतीभोवती असलेल्या विश्वाचे सूक्ष्म अवलोकन करत असतो. मानवी अनुभवविश्वातील सूक्ष्मतर वृत्ती - प्रवृत्ती टिपत असतो. या त्याच्या क्रियेतच कादंबरीचा जन्म होत असतो. मूलतः अमूर्त असलेले हे कथाबीज पात्रांमार्फत साकार होत असते. कथानक, पात्र, घटना, निवेदन, वातावरण यांच्या निर्मितीमागे हे कथाबीज असते. कादंबरीतील हे सारे घटक कथाबीजाने एकात्म झालेले असतात. या दृष्टीने 'कथाबीज' हा कादंबरीचा एक महत्त्वपूर्ण घटक ठरतो.

२) **कथानक :-** कथानक हा कादंबरीचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कथानकाशिवाय कादंबरीला आकारबंध प्राप्त होत नाही. कथानकात घटना - प्रसंगांची साखळी असते. पण या घटना केवळ कालानुक्रमे मांडलेल्या नसतात. तर या घटनांत कार्यकारणभाव संबंध असतो. घटनांची केवळ कालानुक्रमे मांडणी केली की गोष्ट तयार होते, कथानक नव्हे. कथानक व गोष्ट यामधील फरक स्पष्ट करताना ई. एम. फॉर्स्टर यांनी एक उदाहरण दिले आहे ते म्हणतात, "राजाच्या मृत्यूनंतर राणी वारली." ही झाली गोष्ट. यात आपण 'दुःखाने' असा आणखी शब्द घातला तर त्यास आपण कथानक म्हणू शकतो. कारण पहिल्या वाक्यात केवळ कालानुक्रमच आहे. तर दुसऱ्या वाक्यात कालानुक्रमाबरोबर कार्यकारणभाव सूचित केला गेल्याने उत्कंठा व कुतूहलनिर्मिती होते. राणी का वारली ? या प्रश्नांचे उत्तर त्यातून मिळते.

प्रारंभ, मध्य आणि शेवट अशा तीन अवस्थेतून कथानकाचा विकास होत असतो. हा कथानकाचा विकास एखाद्या वृक्षाची वाढ व्हावी त्याप्रमाणे नैसर्गिक, स्वाभाविक व तर्कसंगत व्हावयास हवा.

कादंबरीचे कथानक आकर्षक होण्यासाठी संभाव्यता, कार्यकारणमीमांसा व कुतूहल निर्मिती हे गुण आवश्यक असतात. चांगल्या कथानकात एका प्रसंगातून दुसरा प्रसंग स्वाभाविकपणे तर उद्‌भवतोच, पण कथानकाला पुढे कशी गती मिळणार याविषयी वाचकाच्या मनात कुतूहल निर्माण होते. ही उत्कंठा सतत टिकविणे यातच कथालेखकाचे कौशल्य दिसून येते. कादंबरीतील निरनिराळ्या प्रसंगांची साखळी उभी करताना त्यात विस्कळीतपणा येणार नाही याचेही भान लेखकाला ठेवावे लागते.

मुख्य कथानकासोबतच कादंबरीत उपकथानकेही आलेली असतात. कथानकाला ठळक करणे, त्याचे रहस्य खुलविणे हे उपकथानकाचे कार्य असते. या उपकथानकांची निर्मिती कथानकाला सरस ठरविते हे खरे, पण उपकथानकांची नीट जुळणी झाली नाही तर कथानकाचा बांधेसुदपणा हरवण्याची शक्यता अधिक असते. उपकथानके मुख्य कथानकाशी

एकजीव झालेली असली तरच ती मुख्य कथानकास उपकारक ठरतात, अन्यथा कादंबरीतील जीवनरस शोषून घेतात.

३) **व्यक्तिचित्रण :-** प्रत्येक कादंबरीला एक कथानक असते. या कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्रे करीत असतात. त्यांच्याशिवाय कथानक अपुरे राहिल. त्यामुळे व्यक्तिचित्रण हा कादंबरीतील एक मुख्य घटक आहे.

मनुष्याच्या जिज्ञासेचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय मनुष्य स्वभाव हाच राहिलेला आहे. मानवी स्वभावाचे विविध रंग टिपण्याचा, कादंबरीकाराचा प्रयत्न असतो. मनुष्यस्वभावातील बारकावे, त्याचे अनेकानेक कंगोरे शोधण्याचा त्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू असतो. मनुष्य स्वभावाचे कोडे उलगडून दाखवणे हे कादंबरीकाराचे कार्यच असते.

कादंबरीतील पात्रे म्हणजे खरोखरीच्या व्यक्ती नसतात. त्या खऱ्या असल्याचा आभास निर्माण केलेला असतो. कादंबरीकाराने त्या निर्माण केलेल्या असतात. प्रत्येक पात्राला कादंबरीकाराने विशिष्ट व्यक्तिमत्त्व दिलेले असते. पात्रचित्रण करताना लेखकाला केवळ काल्पनिकावर भर देऊन चालत नाही. त्यासाठी स्वानुभव व सूक्ष्म निरीक्षणाची गरज असते. लेखकाने हेतूपूर्वक पात्रांची निर्मिती केली असली तरी आपले विचार पात्रांवर लादायचे नसतात. त्यांची वाढ नैसर्गिकपणे होऊ द्यायची असते.

कादंबरीतील पात्रांच्या संख्येला मर्यादा नाही. ती किती असावीत, याला ठराविक नियम नाही. कादंबरी हा सात्यिप्रकार समाजजीवनाबरोबर वाढत जाणारा असल्यामुळे समाजजीवनातले व्यवहार, माणसामाणसांतील परस्परसंबंध, राग, लोभ, हर्ष, खेद या भावना यांच्या केद्रंस्थानी 'माणूस' च असतो. माणसामाणसांच्या संबंधांच्या जाळ्यांनीच समाज घडतो. समाजाचे खरे दर्शन व्यक्तींच्या विविध कृती-उक्तीद्वाराच घडत असते.

कादंबरीत येणाऱ्या पात्रांचे ढोबळपणे मुख्य पात्रे व गौण पात्रे असे वर्गीकरण केले जाते. यातील नायक, नायिका, खलनायक, प्रतिनायक यांचा समावेश मुख्य पात्रांत होतो तर गौण पात्रांत इतर सर्वसाधारण पात्रांचा समावेश होतो. अर्थात कादंबरी गौण पात्रे नसतातच कारण प्रत्येक पात्र कथानकाची गरज म्हणूनच आलेले असते.

आपल्याकडे ना. सी. फडके यांनी पात्रघटकाला प्राधान्य देण्याची भूमिका स्वीकारली आहे. ते म्हणतात, "कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शन हेच ललितकथेचे अधिक महत्त्वाचे अंग आहे. कथानकातून व्यक्ती निर्माण होत नाहीत, तर व्यक्तींतून कथानक निर्माण होत जाते."

**४) घटना :-** कादंबरीतील सर्वात लहान घटक म्हणजे घटना होय. कादंबरीचा फलक विस्तृ-त असल्याने अनेकविध घटना - प्रसंगाची साखळी तिच्यात आलेली असते. या घटना कार्यकारणभावसूत्रानुसार जोडलेल्या असतात. घटनांच्या साखळीतूनच कथानक पुढे सरकत असते.

कादंबरीमध्ये ज्या घटना असतात त्या घटना अकारण घडत नसतात. समग्र कादंबरीव्दारा कादंबरीकाराला जो परिणाम साधायचा असतो. त्याला केंद्रवर्ती ठेवून घटनांचे निवेदन केले जाते. त्यामुळे प्रत्येक घटनेचा परस्परांशी संबंध प्रस्थापित होतो.

कादंबरीतील पात्रे व घटना हे दोन घटक परपस्पराश्रयी आहेत. कारण कादंबरीतील घटना जशा पात्रांवर संस्कार करीत असतात, त्याचप्रमाणे पात्रेदेखील घटना घडवून आणत असतात. घटना व पात्रे एक प्रकारे परस्परांना घडवीत कथानकाची उभारणी करीत असतात.

कादंबरीतील घटनांची योजना नैसर्गिक, स्वभाविकपणे केलेली असावी. घटनांची निर्मिती कृत्रिमपणे केलेली असल्यास कादंबरीच्या आस्वादात अडथळे येतात, ती निरस ठरते. पूर्वीच्या अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांत नाट्यमयतेसाठी अशा घटना मुद्दाम घडवून आणलेल्या दिसतात.

५) **निवेदन :-** कादंबरीचा समग्र पट तिच्या भाषिक निवेदनातून उलगडत असतो. त्यामुळे तिचे निवेदन पध्दतशीरपणे केलेले असते. कादंबरीची, एकात्मता, एकसंघता प्रत्ययाला आणून देण्याचे कार्य 'निवेदन' च करत असते. त्यामुळे निवेदन हा कादंबरीतील सर्वाधिक महत्त्वाचा घटक ठरतो.

कोणतीही कादंबरी भाषिक निवेदनाच्या मदतीशिवाय वाचनीय रूप धारण करू शकत नाही. कादंबरीतून व्यक्त होणारे सारे अनुभव आणि त्यांची विविध परिमाणे निवेदनातून सूचित होतात. विशिष्ट स्वभाव धर्माच्या व्यक्ती, त्यांच्या कृती - उक्ती, घटना - प्रसंग, वातावरण इ. तपशील पुरविण्यासाठी आणि विशिष्ट दृष्टिकोनातून त्याची मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराजवळ निवेदन हेच एक साधन उपलब्ध असते.

कादंबरीतील तोचतोचपणा आणि एकसूत्रीपणा टाळण्यासाठी कादंबरीकार निवेदन तंत्रामध्ये सतत प्रयोग करीत असतो.

१) **प्रथमपुरूषी निवेदन :-** येथे कादंबरीतील पात्र स्वतःच स्तःची कहाणी सांगते. यालाच आत्मनिवेदन किंवा स्वमुखी निवेदन असेही म्हटले जाते. उदा. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' या कादंबरीतील पांडुरंग सांगवीकर हा स्वतःच स्वतःची गोष्ट सांगतो.

२) **त्रयस्थ निवेदन :-** लेखक कादंबरीतील पात्रांची गोष्ट त्रयस्थपणे सांगत असतो. उदा. 'गारंबीचा बापू' मध्ये लेखक त्रयस्थपणे बापूचा गोष्ट सांगतो. बापू स्वतः आपली गोष्ट सांगत नाही. या निवेदनपध्दतीला तृतीय पुरूषी निवेदन असेही म्हटले जाते.

३) **पात्रमुखी निवेदन :-** काही वेळा प्रथम पुरूषी किंवा तृतीय पुरूषी निवेदन न वापरता लेखक कादंबरीतील त्या त्या व्यक्तिरेखांनाच स्वतःची कथा सांगायला लावतो. त्यामुळे एकच घटना वेगवेगळ्या व्यक्तिरेखेकडून वेगवेगळ्या दृष्टिकोनातून ऐकायला मिळते. उदा. 'मृत्युंजय' या कादंबरीतील कर्ण, कुंती, अशा सर्वच व्यक्तिरेखा स्वतःबद्दल बोलत राहतात.

६) **वातावरण :-** कादंबरीत वातावरण या घटकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. चित्रकलेमध्ये पाश्वर्भूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे असते. चित्रातील पाश्वर्भूमीने त्या चित्रातील देखाव्यास जसा एक प्रकारचा उठाव मिळतो तसेच कादंबरीतील वातावरण हे व्यक्तिदर्शन व कथानकातील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते.

स्थलकालवैशिष्ट्याचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. कादंबरीतील व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाही. त्यांची मुळे कादंबरी बाहेरच्या जगात नव्हे तर कादंबरीमध्ये, कादंबरीकाराने कल्पनाशक्तीने निर्माण केलेल्या वातावरणात रूजलेली असतात. कादंबरीचा अवकाश विशाल असल्याने व्यक्तीचे सभोवतालचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक तो सगळा बारीक-सारीक तपशील कादंबरीकार पुरवू शकतो. कादंबरीतील व्यक्तींच्या अंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य 'वातावरणा' मध्ये असते. कादंबरीतील वातावरणाचे स्वरूप हे केवळ वर्णनात्मक पातळीवर राहत नाही तर कादंबरीच्या रचनेचाच एक अविभाज्य दुवा बनते. उदा. 'गारंबीचा बापू' मधील निसर्ग कादंबरीच्या आशयाशी एकरूप झाला आहे.

समाजजीवन आणि काळ हे दोन्ही गतिमान असतात. प्रत्येक काळात समाजजीवनात परिवर्तन होत असते. ते कधीही स्थिर स्वरूपाचे नसते. संवेदनशील कलावंत या गोष्टींची दखल घेतो. त्याला जाणवलेल्या व भावलेल्या अशा गोष्टींची नोंद घेऊन त्यांना हातळतो व कादंबरीत त्यांचे प्रतिबिंब पडत असते. हे प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. भौगोलिक, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मानसिक इ. लेखकाच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे तात्त्विक चिंतन हाही वातावरणाचा भाग म्हणून येत असतो.

थोडक्यात, वातावरणामुळे कादंबरीला संदर्भ प्राप्त होऊन एक व्यापक फलक प्राप्त होतो.

७) **लेखकाची जीवनदृष्टी :-** कादंबरीच्या निर्मितीप्रक्रियेतील मूळ घटक म्हणजे कादंबरीकार, कादंबरीकर हा कलावंत असल्यामुळे, तो जीवनातल्या प्रसंगांचे छायाचित्रण करीत नाही तर जीवनात घडणाऱ्या घटना, प्रसंगांच्या त्याच्या मनावर परिणाम होतो. त्यातून त्याच्या मनात काही प्रतिक्रिया तयार होतात. यामुळे त्याचा एक दृष्टिकोन तयार होतो स्वाभाविकच कादंबरीची निर्मिती करताना तो विशिष्ट घटना प्रसंगांची निवड करून त्यांची विशिष्ट दृष्टिकोनाने जुळणी करून कादंबरीला कलात्मकता व कथनात्मकता प्राप्त करून देत असतो. कादंबरीत आलेल्या घटनांमागे लेखकाची जीवनसरणी व मूल्यप्रणाली आकलनाच्या संदर्भात महत्त्वाचे ठरते लेखकाच्या एकूण कादंबरी लेखनामागील जीवनविषयक जाणिवांचे स्वरूप. म्हणजेच जीवनांकडे पाहण्याचा स्वतःचा दृष्टिकोन ह्याचा पडताळा घेऊन त्याच्या कादंबरीची घडण विशिष्ट प्रकारचीच का झाली. ह्याची संगती लावणे त्यामुळे शक्य असते.

एकंदरीत, कथाबीज, कथानक, निवेदन, वातावरण, घटना, लेखकाचा दृष्टिकोन आदी घटकांनी कादंबरीची एकात्म, एकजिनसी संरचना घडत असते.

## १.३ मराठी कादंबरीची परंपरा

कादंबरी हा अर्वाचीन काळातील साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कादंबरीला मराठी कवितेप्रमाणे प्राचीन परंपरा नाही.

प्रारंभीच्या काळात इंग्रजी कादंबऱ्यांच्या भाषांतराचा प्रयत्न झाला. हरि केशवजींनी जॉन बनियनच्या 'पिलग्रीग्स प्रोगेस' या कादंबरीचे 'यात्रिकक्रमण' हे भाषांतर १८४१ साली प्रसिध्द केले होते. परंतु ही भाषांतरीत कादंबरी असल्याने तिला मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान

दिला जात नाही. १८५७ साली प्रसिध्द झालेली बाबा पदमनजी यांची ‘यमुनापर्यटन’ ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी होय. मात्र या कादंबरीतील ख्रिस्ती धर्मप्रसारामुळे मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान तिला बापट-गोडबोले यांनी नाकारला. अर्थात ‘ कादंबरी ’ या साहित्यप्रकाराच्या अपेक्षा पूर्ण करणारी ‘यमुनापर्यटन’ ही कादंबरी आहे.

१८६१ साली प्रसिध्द झालेल्या लक्ष्मण मोरेश्वर हळबे यांच्या ‘मुक्तामाला’ या कादंबरीने मराठी साहित्याच्या क्षेत्रात अद्‌भूतरम्य कादंबरीचा एक स्वतंत्र प्रवाह निर्माण केला. त्यानंतर त्यांचीच ‘रत्नप्रभा’ ना. स. रिसबूड यांची ‘मंजूघोषा’, ‘विश्वासराव’ या अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांनी लोकप्रियता मिळवली. याच काळात ऐतिहासिक कादंबरी लेखनाला सुरूवात झाली. र. भि. गुंजीकर यांची ‘मोचनगड’, वि. ज. पटवर्धन यांची ‘१९५७ सालचे बंडाची घामधूम किंवा हंबीरराव व पुतळाबाई’ या ऐतिहासिक पाश्वर्भूमी असलेल्या परंतु अद्‌भूतरम्यतेच्याच वळणाच्या कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या.

१८७४ नंतर लेखन करणाऱ्या ह. ना. आपटे, ना. ह. आपटे, श्री. व्यं. केतकर यांनी कादंबरीला साहित्याच्या क्षेत्रात निश्चित स्थान मिळवून दिले. ह. ना. आपटे लिखित ‘पण लक्षात कोण घेतो ?’ या कादंबरीने आतापर्यंतच्या अद्‌भूतरम्य कादंबरीला वास्तवाच्या पातळीवर आणले. या कादंबरीतील ‘यमू’ या पात्राव्दारे दु:खाने पोळलेल्या तत्कालीन ब्राहमण स्त्रियांचे वास्तव चित्रण प्रत्ययाला येते. ‘पण लक्षात कोण घेतो ?’ नंतर ‘यशवंतराव खरे’, ‘मी’, ‘मायेचा बाजार’, ‘जग हे असे आहे’ आणि ‘गणपतराव’ या हरिभाऊंच्या कादंबऱ्या तत्कालीन सामाजिक वास्तवाची अत्यंत प्रत्ययकारी मांडणी करतात.

हरिभाऊंसोबतच लेखन करणाऱ्या ना. ह. आपटे, वा. म. जोशी यांचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. ना. ह. आपटे यांनी ‘अजिंक्य तारा’, ‘लांक्षित चंद्रमा’, ‘रजपुतांची भीष्म’ आणि ‘संधिकाल’ या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. वा. म. जोशी हे वृत्तीने तत्त्वज्ञ होते. त्यामुळे त्यांच्या तत्त्वचर्चेचा पगडा त्यांच्या कादंबरी लेखनावरही पडलेला जाणवतो. ‘रागिणी’, ‘आश्रमहरिणी’, ‘नलिनी’, ‘सुशिलेचा देव’, ‘इंदू काळे सरला भोळे’ या त्यांच्या प्रसिध्द कादंबऱ्या होत. स्वातंत्र्य, त्याग सेवा, ज्ञानलालसा आदी मूल्यांसंबंधीची विस्तृत चर्चा त्यांच्या कादंबऱ्यांत आली आहे. म्हणूनच त्यांना ‘तात्त्विक कादंबरीचे जनक’ अशी उपाधी दिली गेली.

शृंगारिक, प्रणयरम्य कादंबऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्यांत वि. वा. हडपांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ‘झाकली मूठ’, ‘दिव्य लावण्य’, ‘बहकलेली तरूणी’, ‘बाईलवेडा’, ‘इष्काचा प्याला’, ‘राणी की रखेली’ या त्यांच्या कादंबऱ्याच्या शीर्षकांवरूनच त्यातील शृंगारिक जीवनचित्रणाची कल्पना येते. याच काळात वास्तववादी जीवनचित्रण करणाऱ्या श्री. व्यं. केतकरांनी ‘गोंडवनातील प्रियवंदा’, ‘परागंदा’, ‘ब्राम्हणकन्या’, ‘गावसासू’ ‘विलक्षणा’ या कादंबऱ्या लिहिल्या. केतकरांच्या कादंबरीने तत्कालीन कादंबरीचा परीघ विस्तारला.

मराठी कादंबरीचा प्रवाह संपन्न करणाऱ्यांत ना. सी.फडके व वि. स. खांडेकर यांचा फार मोठा वाटा आहे. १९२०-४० या कालखंडावर त्यांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे या काळाचे वर्णन ‘फडके, खांडेकर युग’ असे केले जाते. १९१७ साली ‘अल्ला हो अकबर’ ही ना. सी. फडके यांची पहिली कादंबरी प्रसिध्द झाली. त्यानंतर ‘दौलत’, ‘जादूगार’, ‘काश्मिरी गुलाब’, ‘प्रवासी’, ‘अटकेपार’ अशा त्यांच्या कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या. स्त्री-पुरूष प्रेमाचे विविध रंग त्यांच्या कादंबऱ्यांत चित्रीत झाले आहेत.

फडकेंच्याच समकालीन लेखन करणाऱ्या वि. स. खांडेकरांनी जीवनवादाचा पुरस्कार करत फडकेंच्या कलावादाला विरोध केला. 'हदयाची हाक' ही त्यांची पहिली कादंबरी प्रसिध्द झाली. त्यापाठोपाठ 'कौंचवध', 'अमृतवेल', 'ययाति' अशा त्यांच्या कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या.

१९४७ नंतर मराठी कादंबरी अनेकानेक प्रयोग झाले. बा. सी. मर्ढेकरांनी ('पाणी', 'रात्रीचा दिवस') मराठी कादंबरीत संज्ञा प्रवाही स्पंदनांचे चित्रण करण्याचा प्रयोग केला. वसंत कानेटकर ('घर', 'पंखा', 'पोरका') यांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्तिरेखांचे चित्रण केले. शरचंद्र मुक्तिबोध ('क्षिप्रा', 'सरहद्द', 'जन हे वोळतू जेथे') यांनी मार्क्सवादी विचार कादंबरीतून प्रस्तुत केले तर वि. वा. शिरवाडकरांनी ('वैष्णव', 'जान्हवी') गांधीवादी विचारांचा आपल्या कादंबऱ्यातून पुरस्कार केला. पु. य. देशपांडे ('बंधनच्या पलीकडे' 'सुकलेले फूल' ग, त्र्यं. माडखोलकर ('भंगलेले देऊळ', 'शाप', 'दुहेरी जीवन') वि. वि. बोकील ('फोल आशा। 'तू तिथं मी') विभावरी शिरूरकर ('हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न', 'बळी') विश्राम बेडेकर (रणांगण) , साने गुरूजी ('धडपडणारी मुले ', 'सती', 'गोड शेवट'), श्री. ना. पेंडसे ('एलगार', 'गारंबीच्या बापू') गो. नी. दांडेकर ('शितू', 'पडघवली'), व्यंकटेश माडगूळकर (बनगरवाडी, स्थलांतर, कोवळे दिवस) यांनी ही मराठी कादंबरीचा प्रवाह सशक्त करळ्यात महत्त्वाचे योगदान दिले.

१९६० नंतर एकूणच मराठी साहित्यात प्रचंड प्रमाणात उलथापालथ झाली. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, नागर असे स्वतंत्र प्रवाह मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात निर्माण झाले. उध्दव शेळके, (धग), आनंद यादव ('झोंबी', 'नांगरणी', 'गोतावळा') यांनी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह संपन्न केला. केशव मेश्राम, शंकरराव खरात, बाबाराव मुसळे, बाबूराव बागूल, उत्तम बंडू तुपे यांनी दलित कादंबऱ्या लिहिल्या. घोरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार यांनी स्त्रीयांचे दु:ख आपल्या कादंबऱ्यांत मांडण्यास सुरूवात केली. भालचंद्र नेमाडे ('कोलला', 'बिढार 'जरिला', 'झूल') भाऊ पाध्ये ('वैतागवाडी', 'वासूनाका') जयवंत दळवी (चक्र) आदींनी वास्तववादी कादंबऱ्या लिहिल्या.

एकूणच, कादंबरीच्या आजवरच्या दीडशे वर्षाच्या प्रवासात कादंबरीने अनेक वळणे घेतली. अद्भूत, पौराणिक, ऐतिहासिक, वास्तववादी, शृंगारिक, राजकीय, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी अशा अनेक वाटांनी, दिशांनी ती प्रयोगशील बनली.

## १.४ संदर्भ ग्रंथ सूची

१) कादंबरी : एक साहित्यप्रकार - डॉ. हरिश्चंद्र थोरात.
२) कादंबरी आणि मराठी कादंबरी : उषा हस्तक
३) मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास - प्र. वा. बापट / ना. वा. गोडबोले.
४) कथा : संकल्पना आणि समीक्षा - डॉ. सुधा जोशी.

❖❖❖❖

# २. गोतावळा - आनंद यादव (कादंबरी)

# २

# गोतावळा - आनंद यादव (कादंबरी)

**घटक रचना :**

२.१ प्रस्तावना
२.२ ग्रामीण कादंबरी
२.३ कथानक
२.४ नारबाचे व्यक्तिचित्र
२.५ गोतावळा : शेती क्षेत्रातील बदलाच्या स्थित्यंतराची कहाणी
२.६ गोतावळा कादंबरीची भाषिक - वैशिष्ट्ये
२.७ संदर्भ
२.८ संभाव्य प्रश्न

## २.१ प्रस्तावना

मराठीमध्ये साहित्याचे विविध प्रवाह आज अस्तित्वात आहेत. त्यामध्ये ग्रामीण साहित्य हा प्रवाह आज विशेष नावारूपाला आलेला असा साहित्य प्रवाह आहे.'ग्रामीण' या शब्दातच खेडे गाव, आणि तेथील संस्कृती, चालीरीती, प्रथा-परंपरा हा अर्थ दिगदर्शित होतो. म्हणजे ग्रामीण साहित्यातून खेड्यातल्या सामान्य, आशिक्षिम, शेतकरी, शेतमजूर यांची व्याख्या, संस्कृती, माणसांमाणसांतील प्रेम-माया, द्वेष, हेवे-दावे .... यांचे दर्शन ज्या साहित्य प्रवाहातून घडते, त्याला ग्रामीण साहित्य असे म्हणतात. अशी ग्रामीण साहित्याची ढोबळमानाने व्याख्या करता येईल.

ग्रामीण समाज, ग्रामीण माणूस, ग्रामीण निसर्ग यांची वर्णने ग्रमीण साहित्यामध्ये पाहयला मिळतात. कथा, कविता, कादंबरी, नाटक असे विविध साहित्यप्रकार ग्रामीण साहित्यमध्ये स्वतंत्रपणे नावारूपाला आलेले आहेत.

मराठीमध्ये ग्रामीण साहित्याला सुरूवात १९२० पासून झाली. याच काळात गांधीवादाचा पगडा मराठी मनावर पडत होता. 'खेड्याकडे चला' आणि 'ग्रामोध्दार' या म. गांधीजींच्या घोषणांमुळे खेड्या-पाड्यात ग्रामसुधारणा करण्याच्या दृष्टीने अनेक सुशिक्षित तरूण खेडुतांसाठी त्यागी वत्तीने काम करू लागली. खेड्यातील अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय, यांचे चित्रण कथा-कादंबरींतून होऊ लागले. पण याच काळात रोमॅटीक संप्रदायाचा प्रभाव जोर धरत होता. तरीही काही प्रमाणात खेड्यातील चालीरीती, संस्कृतीचे दर्शन साहित्यातून अभिव्यक्त होत होते. पण खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळतच ग्रामी साहित्य, दलित साहित्य, आणि आदिवासी साहित्य.

असे साहित्य प्रवाह उदयाल आले. या साहित्य प्रवाहात ग्रामीण साहित्य प्रवाह हा विशेष नावाजलेला साहित्य प्रवाह आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रमीण साहित्याचे खरे पुरस्कते हे म. फुले होत. म. फुले यांनी ग्रामीण भागातल्या अज्ञान, अशिक्षित, शेतकरी, शेतमजूर, गोर-गरीब यांचा कैवार घेतला. त्यांच्या समस्या आपल्या सर्वच साहित्यातून मांडून तात्कालीन शासनाला आणि उच्चवर्गीय समाजात जागे करण्याचे महान कार्य म. फुले यांनी आपल्या साहित्यातून केले.

स्वातंत्र्योत्तर काळानंतर म्हणजे १९६० नंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य नावारूपाला आले. कथा कविता कादंबरी, .... अशा विवध प्रकारांतून ग्रामीण साहित्य फुलत राहिले. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार ही त्रिमूर्ती ग्रामीण कथाकार आणि कथा कथनकार म्हणून महाराष्ट्रच्या रसिक वाचकांचा मनावर अधिराज्य गाजवत होती. त्याबरोबर आनंद यादव, रा. रं. बोराडे यांनी ही कथा, कविता, कादंबरी लिहून ग्रामीण साहित्यामध्ये आपला आगळा वेगळा ठसा निर्माण केला. अलीकडच्या काळातील इंद्रजित भालेरावांची ग्रामीण कविता समाजमनाचा वेध घेणारी आहे. त्याचबरोबर बाबाराव मुसळे यांच्या 'हल्या हल्या दुद् दे' आणि पुरूषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया' या ग्रामीण कादंबऱ्यातून ग्रामीण समाज मन अभिव्यक्त होताना दिसेल. राजन गवस हे तर अलीकडच्या काळामध्ये एक मातब्बर ग्रामीण साहित्य प्रकार म्हणून सुपरिचित आहेत. तसेच उत्तम बंडू तुपे, भास्कर चंदनाशिव चंद्रकुमार नलगे इत्यादी अनेक ग्रामीण लेखक आपापल्यापरीने ग्रामीण साहित्य नावारूपाला आणत आहेत.

## २.२ ग्रामीण कादंबरी

बाबा पद्मनजी यांची 'यमुना पर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी १८५७ साली प्रासिध्द झाली. या कादंबरीतून बालविधवा, विधवा स्त्रियांच्या समस्या, सतीपथा तसेच अस्पृश्यता असे सामाजिक प्रश्न हाताळल्यामुळे ततकलीन काळात ही कादंबरी विशेष गाजली. तर मराठी ग्रामीण साहित्यातील पहिली कादंबरी म्हणून तिचा निर्देश करता येईल ती म्हणजे 'बळिबा पाटील' ही कादंबरी कृष्णाराव भालेकर यांनी लिहिली. ही कादंबरी 'दीनमित्र' मधून एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ पर्यंत क्रमशः प्रकाशित झाली होती. इ.स. १८८७ साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. त्यावर ही कादंबरी आधारलेली आहे. या कादंबरीचा नायक बळिबा पाटील हा म. फुले यांच्या सत्यशोधकी चळवळीतून तयार झालेला होता. त्यामुळे तो निर्व्यसनी तर होताच पण जात, धर्म माणसा-माणसांतील भेदभाव न मानणारा होता. दुष्काळच्या चित्रणाबरोबर ततकालीन काळात अस्पृश्य समाजात भोगावे लागणारे जातियेतेचे चटके, आणि त्याची चिड येऊन  त्याच्याविरूध्द आवाज उठविणारा बळिबा पाटील समर्थपणे कृष्णराव भालेकर यांनी ऊभा केला आहे.

रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' (१९०३) ही कादंबरी 'दुष्काळ' या विषयावरच लिहिली आहे. दुष्काळाची खरी झळ ग्रामीण परिसरातील शेतकरी आणि शेतमजूराला कशी पोहोचते. आणि याच परिस्थितीत सरकारी अधिकारी दुष्काळातील माणसांची कशी लुबाडणीक करतात याचे वर्णन वाचकालाही अस्वस्थ करणारे आहे.

१९२० ते १९४५ या कालखंडात ग. त्र्य. माडखोलकर यांची ‘चंदनवाडी’ (१९४३) र. वा. दिघे यांची ‘सराई’ (१९४६) वि. द. चिंदकर यांची ‘महापूर’ (१९४३) आणि ग. ल. ठोकळ यांची ‘गावगुंड’ (१९४३) या कादंबऱ्याही महत्त्वाच्या आहेत.

१९४५ ते १९५० या काळात श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर यांच्या ज्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या त्या प्रादेशिक कादंबऱ्यामध्ये मोडतात. यातून कोकणची प्रादेशिक वैशिष्ट्चे साकार झाली आहेत. हा कालखंड प्रादेशिक कादंबरीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. याच काळात ग्रामीण जीवन प्रभाविपणे चित्रण करणारी कादंबरी दिसत नाही.

ग्रामीण कादंबरी खऱ्या अर्थाने भरभराटीला आली ती १९५५-६० नंतरच. विभावशी शिरूरकर यांची ‘बळी’ / आणि व्यंकटेश माडगूळकर यांची ‘बनगरवाडी’ (१९५५) या कादंबऱ्या विशेष लोकप्रिय झाल्या. दोन्ही कादंबरीतील विषय वेगळे आहेत. पण त्यातील सामाजिक समस्या सारख्याच आहेत. त्यामुळे या कादंबऱ्या ग्रामीण साहित्यामध्ये विशेष लोकप्रिय आहेत.

ग्रामीण भागातले तरूण शिकून जस जसे सुशिक्षित होऊ लागले तस तसे त्यांना आपल्या ग्रामीण भागातल्या समाजांची जाणीव तीव्रतेने होऊ लागली. आणि त्याचे जिवंत आणि प्रत्ययकारी चित्रण १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतून अभिव्यक्त होऊ लागले. त्यात उध्दव शेळके यांची ‘धग’, शंकर पाटील, ‘टारफुल’, रणजित देसाई यांची ‘माझा गाव’ हमीद दलवाई यांची ‘इंधन’, ना. धो. महानोर यांची, ‘गांधारी’, रा. रं. बोराडे यांची ‘गोतावळा’, आनंद यादव यांची ‘गोतावः’.. या प्रमुख विशेष उल्लेखनीय कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यातून ग्रामीण वास्तव जीवन प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. याशिवाय १९६० नंतर ज्यांनी ग्रामीण कादंबरीला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला त्यात महादेव मोरे, विश्वास पाटील इत्यादी अनेक कादंबरीकार आहेत. त्यांनी आपापल्या कर्तृत्वाने मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवाह अधिकच सशक्त करण्याचा प्रयत्न केला. या सर्वामध्ये आपल्या आगळया आणि वेगळ्या शैलीने ग्रामीण साहित्यामध्ये स्तःच्या ठसा उमटविणारे साहित्यिक म्हणजे आनंद यादव.

आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याच्या सर्वच प्रकारांमध्ये संचार केला. कथा, कविता, कादंबरी, समीक्षा असे विविध ग्रामीण वाड्.मय प्रकार आनंद यादव यांनी हाताळले आहेत. ‘माळावरची मैना’, ‘खळाळ’, ‘उखडलेली झाडे’, ‘आदिनाथ’, ‘डवरणी’, ‘घरजावई’ असे कथासंग्रह तर ‘गोतावळा’, ‘एकलकोंडा’, ‘माउली’, ‘नटरंग’ या कादंबऱ्या तर ‘मळ्याची माती,’ ‘मायलेकरं’, ‘हिरवेजग’ हे कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. त्याचबरोबर ‘झोंबी’, ‘नांगरणी’, ‘घरभिंती’ या आत्मचरित्रपर कादंबऱ्या, ‘मातीखालची माती’ हा ग्रामीण व्यक्तिचित्रांचा संग्रह, मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती, ‘ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या’ , ‘ग्रामीणता साहित्य आणि वास्तव’, ‘साहित्याची निर्मिती प्रक्रिया’ हे ग्रामीण साहित्यावरचे समीक्षा ग्रंथ ही प्रसिध्द आहेत. तसेच ‘पाणभवटे’, ‘स्पर्शकमळे’. हे लालितगद्य तर ‘रान घुंगराची’ हे वगनाट्च, तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा हे संपादिक ग्रंथही प्रसिध्द आहेत..... अशी विविध आणि विपुल साहित्य निर्मिती करून आनंद यादव मराठी रसिक मनावर आजही अधिराज्य गाजवताना दिसतात. आनंद यादव यांच्या सर्व साहित्यामध्ये सर्वश्रेष्ठ कलाकृती म्हणून जिचा उल्लेख केला जातो ती कलाकृती म्हणजे ‘गोतावळा’ ही कादंबरी होय.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यामध्ये इतर प्रवाहांप्रमाणे ग्रामीण साहित्याचा सामर्थ्यवान साहित्यप्रवाह म्हणून उल्लेख केला जातो. या काळात शिक्षणाचा प्रसार ग्रामीण भागात झाला. ग्रामीण भागातील मुले-मुली शिक्षण घेऊ लागली. शिक्षणामुळे त्याच्यात नव्या जाणिवा निर्माण झाल्या. आणि त्या जाणिवांनी आपल्या सभोवतालच्या जीवनाकडे पाहू लागले. ग्रामीण समाजाची अनेक शतकांपासून सुरू असलेली दु:सह स्थिती, ती निर्माण होण्याची कारणे यांचा विचार त्यांच्या मनात रूंजी घालू लागला. अशा अनेक विचारांतूनच " ग्रामीण साहित्या " चा उदय झाला. कथा, काव्य, कादंबरी ... अशा साहित्य प्रकारातून ग्रामीण भागाचे, तिथल्या समाजाचे अंतरंग प्रकट होऊ लागले. ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव यांसारख्या अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी ग्रामीण साहित्याला वाढविले, फुलवले, सजविले, नवनवीन प्रयोग यामध्ये होऊ लागले. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या कक्षाही रूंदाऊ लागल्या. सूक्ष्म पातळीवरची सुखदु:ख लेखक रेखाटू लागले. आनंद यादव यांना तर याबाबतीत अग्रक्रम द्यावा लागेल. आनंद यादवांनी आतापर्यत जे ग्रामीण साहित्यप्रकार हाताळले त्यातून त्यांचे वेगळेपण सिध्द झाले. "गोतावळा" ही अशीच एक वेगळया वळणावरची कादंबरी लिहून मराठी कादंबरी जगाला एक नवे परिणाम त्यांनी उपलब्ध करून दिले.

## २.३ कथानक

"गोतावळा" ही कादंबरी मौज प्रकाशन मुंबई यांनी १९७१ मध्ये प्रसिध्द केली अन त्यातल्या वेगळेपणामुळे व गुणवैशिष्टयांमुळे ती अल्पावधीतच लोकप्रिय झाली. रसिक वाचक टीकाकार सर्वांनीच कादंबरीचे मनापासून कौतुक केले. राज्यशासनाचे 'उत्कृष्ट कादंबरी' बद्दलचे पारितोषिकही 'गोतावळयाला' मिळाले. ग्रामीण साहित्यातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून 'गोतावळा' या कादंबरीचा विशेष उल्लेख केला जातो. 'गोतावळा' पूर्वीचे आणि "गोतावळा" नंतरचे ग्रामीण साहित्य अशी ग्रामीण साहित्याची जी कालविभागणी केली जाते. त्यावरून ग्रामीण साहित्यातले 'गोतावळा' चे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येते.

"गोतावळा" या कादंबरीला रूढ अर्थाने ज्याला कथानक असे म्हणता येईल असे कथानक नाही. रामू सोनावडे नावाच्या एका सधन शेतकऱ्याच्या मळयामध्ये नारबा नावाचा एक मजूर वेठबिगारीवर काम करीत असतो. नारबा अत्यंत प्रामाणिक असून जणू काही आपलाच मळा आहे असे समजून मळ्यात रात्रंदिवस काम करीत असतो. तिथली माती, पिके, झाडे, विहिर, मोटवान, गायी, म्हैशी, बैल, शेळ्या, घोडा, कोंबड्या, कुत्री यांवर त्याची नकळत माया बसते. हेच त्याचे विश्व असते... अन् हाच त्याचा गोतावळा असतो. त्यांच्या सुखदु:खात तो आपले सुखदु:ख पाहत असे. पण काही दिवसांनी मालकाच्या मनात शेतीचे आधुनिकीकरण करण्याचे येते. त्यातून बैल, म्हशी, शेळ्या, तो विकून टाकतो. मळ्यातील सर्व झाडे-झुडपे तोडून टाकतो. नारबाचे यामुळे सारे भावविश्व उद्ध्व होते. शेवटी मालक शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टर खरेदी करतो. आता त्याला बैलांची, रेड्यांची गरज नसते... किंबहुना नारबाचीही नसते... नारबा हा झालेला बदल पचवू शकत नाही... शेवटी तो मळा सोडून निघून जातो. असे हे गोतावळ्याचे थोडक्यात कथानक. कथानक तसे साधेच असले तरी त्याचा विकास अत्यंत कलात्मक पातळीवरून यादवांनी केला असल्याने या कादंबरीला श्रेष्ठ कलाकृतीचा दर्जा प्राप्त झाला आहे. प्रत्येक प्राण्यावर असलेले नारबाचे प्रेम अन् ते सारे प्राणी एकामागून`क नाहिसे होत असताना तिळ तिळ तुटणारे नारबाचे मन हाच या कादंबरीचा आत्मा आहे. हे या कादंबरीचे

बलस्थान आहे. आनंद यादवांनी अत्यंत सहृदयतेने हे कथानक फुलविले आहे. नारबाची विवशता अत्यंत यथार्थ शब्दात पकडली आहे. नारबाच्या भाव - भावनां यांचे अनोखे दर्शन अत्यंत कुशलतेने घडविले आहे. नारबाची सारी कहाणी हृदयद्रावक आहे. त्याच्या जीवनातील अर्थगर्भता नेमकेपणाने व्यक्त झाली आहे.

वरवर पाहता ही कहाणी नारबाची असली तरी यादवांना या कादंबरीतून केवळ नारबाची विवशता दाखवायची नाही तर अलीकडे शेती क्षेत्रामध्येही जे यांत्रिकीकरण अवतीर्ण होत आहे.... त्याचे शेतीवर व पर्यायाने शेतकऱ्याच्या भाव - जीवनावर जे परिणाम होत आहेत.... झाले आहेत त्याचा एक मोठा पट त्यांना मांडून दाखवायचा आहे. याबाबत ते स्वतः एके ठिकाणी म्हणतात - "हजारो वर्षे चालत आलेली शेती - संस्कृती नष्ट होत चालली आहे आणि तिच्या जागी नवी यंत्रनिष्ठ संस्कृती उदय पावत आहे. या अस्तोदयाच्या संक्रमणात जुन्यातील चांगलेही (उदा. निसर्ग आणि मानव यांचे नाते, माणुसकी, प्राणिजीवन) नाहीसे होत चालले आहे व नव्याच्या स्वागताच्या उत्साहात त्यातील काही वाईटाचाही स्वीकार होत आहे. शेती-संस्कृतीतील दुबळा (शेतमजुरासारखा) घटक पार उखडला जात आाहे. नव्या संस्कृतीत त्याच्या अस्तित्वाला काहीही स्थान नाही. असा जो स्थान हरवलेला मजूर आहे त्याची यंत्रयुगामुळे होणारी दुरावस्था .... त्याचे पूर्वीचे श्रध्दाळू जीवन अन् त्या क्षध्देचा त्याग करणे भाग पडल्याने त्याच्या मनात दाटून आलेला उमाळा..... याचा मनोविश्लेषणात्मक पातळीवरून वेध घेतला आहे. आपल्या या कादंबरीबाबत आनंद यादव म्हणतात - "गोतावळा" कादंबरीला तशी ठोस कथा नाही. मळ्यात एक ट्रॅक्टर येऊ घातलेला आहे - असा कथेचा आरंभ आहे आणि त्या मळ्यात तो ट्रॅक्टर येतो, असा कथेचा शेवट आहे. रूढार्थाने जिला कथा म्हणता येईल ती एवढीच आहे. नव्या शेती - संस्कृतीचे प्रतीक असलेल्या ट्रॅक्टरच्या आगमनासाठी जुनी संस्कृती कशी हळूहळू मोडीत निघते आणि तिथे एक महाभारत कसे घडते, हा एक वर्षाचा पट घेऊन मी दाखवायचे ठरवले . म्हणूनच गोतावळा ही एका अर्थाने शेती संस्कृतीतील बदलाची कहाणी आहे.

'गोतावळा' ही यादवांची कादंबरी १९७१ मध्ये प्रसिध्द झाली असली तरी तिची निर्मितीप्रक्रिया ही १९५६ पासून सुरू झाली होती.

कविता ते कथा अन् कथा ते कादंबरी असा "गोतावळा" कादंबरीचा प्रवास झाला. १९५६ ते १९६९/७० इतका दीर्घकाळपर्यत हा लेखन प्रवास चालू होता. अखेर १९७१ साली ही कादंबरी प्रसिध्द झाली.

**"गोतावळा" कादंबरीची मूलद्रव्ये :-** या कादंबरीच्या कथाबीजाबाबत अन् मूलद्रव्याबद्दल आनंद यादव म्हणतात, "दुसऱ्याची शेती खंडाने किंवा फाळ्याने करण्याची आमच्या घरी पिढीजात परंपरा. म्हणजे दुसऱ्याच्या शेतीवर राबणाऱ्या, स्वतःची काडीमात्र शेती नसलेल्या शेतकऱ्याचे आमचे घराणे. जन्मल्यापासून त्या परंपरेत मी वाढलो. एस.एस.सीपर्यत तर कधीतरी शाळेला, नाहीतर रात्रंदिवस शेतात अशीच माझी अवस्था होती. घरी मोठा मुलगा मीच असल्याने सगळी कामे मला स्वतःला करावी लागत असत. कॉलेजला होतो तरी वयाच्या पंचविशीपर्यंत हे मी घनदाट अनुभवले. तेथून पुढेही घर शेतकऱ्याचेच राहिले. मी मात्र नोकरीत शिरलो. या काळातील शेतीविषयक अनुभव "गोतावळा" त व्यक्त झालेले आहेत.

यादवांनी रंगविलेला "नारबा" हाही त्यांना अनेक रूपात भेटला होता. त्यांच्या चुलत चुलत्याच्या मळ्यात असलेला लक्ष्मू बारड नावाचा ढोरगडी, कागलच्या शेटजीच्या मळ्यात असलेला शंकर मोरे नावाचा एक खुळचट ढोरगडी आणि शिंप्याच्या मळ्यात एक वर्षभर काम करीत असलेला आनंदा टांगेवाला नावाचा वेडाबागडा ढोरगडी. या तिन्ही व्यक्तित्त्वाच्या मिश्रणातून "नारबा" तयार झाला आहे. या तिघांचीही लग्ने झाली नव्हती हे इथे लक्षात घ्यायला हवे. कारण नारबाचेही लग्न झाले नव्हते. त्याचे एकटेपणा'गोतावळ' कादंबरीत सर्वत्र विखुरलेले असल्याचे दिसून येते.

"गोतावळा" च्या निर्मितीबाबत यादव म्हणतात, "प्राणिजीवनविषयक एक अनुभवविश्व आपल्याजवळ तुडूंब भरत आहे. ते रिते झाल्याशिवाय आपणास दुसरीकडे वळता येणे कठीण आहे. ते रिते करण्याच्या हेतूनेही मला "गोतावळा" ची मांडामांड करावीशी वाटली. पूर्वसूरीच्यं ग्रामीण साहित्याचे वाचन व चिंतन यथाशक्ती चालूच होते. त्यावेळच्या धुरिणांच्या प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबऱ्या वाचल्यावर माझ्या लक्षात दुसरी एक गोष्ट अशी आली की, ग्रामीण संस्कृतीचे केंद्र असलेल्या शेतमळ्याला मध्यावर धरून अजून कुणी कादंबरी लिहिलेली नाही. कांदबरीतील प्रमुख घटना, प्रसंग, वातावरण हे आपण शेतमळयावरचेच योजावे. त्याच्या आधारे शेतीसंस्कृतीही जिवंत करता येईल. या हेतूनेही मी कथानकाची मांडामांड करू लागलो. असे सांगून ते पुढे म्हणतात - "माझे ग्रामीण जीवनातील गतायुष्य आणि माझे तत्कालीन वाड्.मयीन व्यक्तिमत्त्व यांचा एकत्रित परिणाम " "गोतावळा" च्या मांडामांडीला कारणीभूत झालेला आहे."

**<u>शीर्षक :-</u>** "गोतावळा" या यथायोग्य शीर्षकामुळे या कादंबरीचे "वैभव" वाढले आहे. नारबा ज्या वातावरणात जगत असतो त्या वातावरणातील जीवसृष्टी व प्राणिसृष्टी त्यांच्या अत्यंत जवळची नसते. गायी-म्हैशी, घोडे, बैल, शेळ्या-मेंढ्या, कुत्री, कोंबडया यात तो रमलेला असतो. त्यांच्या सुखदुःखात तो आपले सुखदःख पाहात असे. नारबाचे लग्न झालेले नव्हते त्यामुळे संसाराचा प्रश्नच नव्हता. वर उल्लेखलेले सर्व प्राणी म्हणजेच त्याचा संसार... त्याचा गोतावळा. या गोतावळयात तो गुंतलेला असतो. त्याची अन् त्याच्या या गोतावळ्यातील प्रत्येक प्राण्यांची करूण कहाणी यादवांनी शब्दबध्द केली आहे. म्हणूनच त्यांनी या कादंबरीला "गोतावळा" असे शिर्षक दिलेले आहे ते खूपच योग्य वाटते. त्यांना या कादंबरीसाठी "ढोर माणूस","रान-माणूस""निरवानिरव" , "वाट" "आरिवरीच साल", अशी अनेक शीर्षके सुचली होती, पण ती सारी बाजूला सारत त्यांनी "गोतावळा" हे समर्पक शीर्षक स्वीकारले.

## २.४ नारबाचे व्याक्तिचित्र

डॉ. आनंद यादवांनी आपल्या "गोतावळा" या कादंबरीतून "नारबा" चे व्यक्तिचित्र रेखाटले आहे ते केवळ नारबाचे नसून असंख्य ग्रामीण शेतमजूरांचे ते व्यक्तिमत्त्व आहे. आजही हजारो ... लांखो शेतमजूर या पध्तीचे जीवन जगताना दिसतात. रानांत शेत नाही. अन् गावात घर नाही अशा अवस्थेत असणारे हे सारे शेतमजूर कोणाच्या तरी मळयावर वेठबिगारीने कामास राहतात म्हणूनच नारबा हा अशा सर्व वेठाबिगार शेतमजूरांचा प्रतिनिधी आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

यादवांनी उभा केलेला “नारबा” हा कपोलकल्पित नसून त्यांना भेटलेल्या ... व त्यांनी जवळून पाहिलेल्या अनेक शेतमजूरांच्या एकत्रिकरणातून उभा केला आहे. प्रामुख्याने त्यांनी तीन शेतमजूर अगदी जवळून पाहिले आहेत. स्वतः यादव म्हणतात - “गोतावळांतील जो नारबा आहे. तो लक्ष्मण बारड् शंकर मोरे आणि आनंदा टांगेवाला यांच्या मिश्रणातून तयार झालेला आहे”. थोडक्यात “नारबा” हे यादवांच्या कल्पनेतून निर्माण झालेल्या व्यक्तित्व नव्हे तर त्यांना भेटलेल्या अनेक ढोरगड्यांचे ते व्यक्तित्व आहे.

**नारबा - एक ढोरगडी :-** “गोतावळा” या कादंबरीची निर्मिती प्रक्रिया सांगताना यादवांनी “ढोरगडी” हा शब्द पुन्हा - पुन्हा वापरला आहे. त्यामुळे “ढोरगडी” म्हणजे नेमका कोण ? असा प्रश्न प्रामुख्याने शहरी वाचकांना पडतो. शेतमजूरांचे सामान्यतः दोन प्रकार पडतात. १) दररोज वेगवेगळया मळयावर, शेतावर जाऊन पगारावर काम करणारे गडी व २) कुणाच्याही एकाच्या मळयावर अथावा शेतावर कायमपणे काम करणारे गडी. नारबा हा या दुसऱ्या प्रकारातील गडी. अशा गड्यांना “कायमचा गडी” , “घरचा गडी”,“वेठबिगारी”,“ढोरगडी” अशा अनेक नावाने संबोधले जाते. कोल्हापूर परिसरात यांना “ढोरगडी” म्हटले जाते. यांच्याबाबत यादव म्हणतात, “त्यांच्याजवळ मान - अपमान असे काही नसावेसे दिसते. ती माणसे नेहमी मालकच्या शिव्या भरपूर खातात. त्या शिव्यांचा त्यांच्या मनावर कोणताही खोलवर किंवा दूरगामी परिणाम होत नाही. जनावरांची देखभाल करत ती आनंदात जगत असतात. जनावरांवर मात्र त्यांचे माणसापेक्षा जास्त प्रेम असते. त्यांचे ते सोबतीच असतात.”

लोकांचे मळे खंडाने करताना यादवांना जे प्रत्यक्ष अनुभव आले ते सारे अनुभव त्यांनी “गोतावळा” मध्ये कलात्मक पातळीवरून व्यक्त केले आहेत. नारबा जेवढे प्रेम जनावरांवर करतो तितकेच प्रेम यादवांनीही जनावरांवर केले आहे. ट्रॅक्टरच्या निमित्ताने जनावरांची जी वाताहात होते तशीच वाताहात यादवांनी अनुभवली होती. म्हणूनच ते म्हणतात, “नारबाच्या ताब्यात मी प्रत्यक्षात अनुभवलेल्या प्राण्यांचा गोतावळा दिला आहे. प्राण्यांविषयी मला जे अनुभव आले, ते मी नारबाकडे सुपूर्त केले आहेत. ..... कूळकायदा आल्याच्या काळात भटाचा मळा आमच्याकडून काढून घेण्यात आला आणि कूळकायद्याच्या बडग्यामुळे आम्हांला कुणी नव्याने शेत खंडाने देईना. त्यामुळे आमची सगळी जनावरे एका वर्षाच्या आत विकावी लागली ..... प्राणी विकणे, मारणे, मरणे, किंवा त्यांचे हाल होणे यातील दुःख जो त्या प्रण्यावर जीवापाड प्रेम करतो त्यालाच कळते. आमच्याकडे आता जमीन नसल्याने वैरणपाण्यावाचून त्यांचे चाललेले हाल बघवत नव्हते. आमच्या जनावरांची ही जी झालेली वाताहात आहे ती “गोतावळा” त ट्रॅक्टर येण्याच्या निमित्ताने घडताना दाखविली आहे. आणि मला व माझ्या घरच्यांना वाताहतीच्या काळात ज्या व्यथावेदना झाल्या त्या मी “नारबा” ला देऊन टाकल्या आहेत. ..... मी पाहिलेल्या दोन - तीन ढोरगड्यांवर नारबा आधारलेला असला, तरी त्याचे मन, तसेच निसर्ग, प्राणी, शेतमळा यांविषयीचे त्याच्या संवेदनशील मनाचे जे अनुभव आहेत, ते माझे आहेत .... “नारबा” या पात्रात मी माझा “जीवनरस” ओतला आहे. ”

“गोतावळा” तील त्यांचा मळा हा माणसारखा हसतो, बोलतो, रूसतो, फुलतो .... अन् रडतोसुध्द! आपल्या साऱ्या कथानकाचा पट त्यांनी या मळयावरच मांडला आहे. मळ्यातील विहिर, खोप, झाडे-झुडपे, बांध-बंधारे, पीके, मोट, धाव, पाट या सर्वच गोष्टींचा त्यांनी मानवी पातळीवरून विचार केला आहे. “गोतावळा” मधील या मळ्याचा मालक आहे रामू सोनावडा. पण खऱ्या अर्थाने इथे मालक आहे तो नारबा! रामू सोनावड्याच्या मळ्यात काम करणारा हा नारबाच

मळयाची सारी देखभाल करत असतो. मालकापेक्षाही त्याचे मळयावर जास्त प्रेम असते. त्या मळ्यावर तिथल्या मातीवर त्याची नितांत गाढ श्रध्दा असते. त्याची ही श्रध्दा सर्व कादंबरीभर विखुरलेली आहे. मळा पावसान भिजला की नारबा, भिजतो ..... मळा खुलला की नरबा खुलतो. मळ्याच्या अंगाखांद्यावर नारबा वाढला .... पोसला... या मळयाचे आपल्यावर खूप मोठे उपकार आहेत याची जाणीव त्याला नेहमीच असते. म्हणूनच मळ्यातल्या पिकांची, प्राण्यांची, झाडा झुडपांची तो आपल्या लेकरासारखी काळजी घेत असतो. मळ्यातील हिरव्या जगात तो मोठ्या आनंदान जगत असतो. आयुष्यातील एक नव्हे दोन नव्हे मोजून वीस वर्षे तो या मळ्याच्या सानिध्यात असतो. या दीर्घ सानिध्यामुळे त्या मळयात त्याचा जीव गुंतलेला असतो. हा मळा असाच सतत फुललेला असावा.... त्याच्या सावलीत अनेक प्राण्यांनी आपले संसार थाटावे .... अन् थाटलेले प्राण्यांचे संसार बघण्याच भाग्य आपणाला नेहमीच लाभावं हीच एक त्याची इच्छा असते. त्यासाठी तो रात्रंदिवस कष्ट करत असतो. धडपडत असतो. मळ्यातल्या प्रत्येक कणावर त्याचे मनस्वी प्रेम असते. मळ्याची शोभा वाढविणाऱ्या प्रत्येक गोष्टीत त्याचा जीव गुंतला होता. हे सार वैभव अनुभवताना त्याला मनस्वी आनंद वाटत होता. या वैभवाच्या मागे आपले असणारे कष्ट ... आपली राबणूक..... अन् त्यातून उमळलेल हे मळयातल हिरवं जग अनुभवण्यासाठी त्याला वाटल हे सार आपण डोळ्यांनी पिऊन घ्याव... त्याच्या या भावनेचा आवेग शब्दात पकडताना यादव लिहून जातात, “समदं रान टवटवीत बघून मन मोकळं मोकळं: झाल. अंतराळी व्हावस वाटू लागले .... समद्या रानभर, माळभर, उसावरन, पिकावरन तरंगतरंगत फिरत याव. समद न्यहाळाव, कुरवाळाव. उरासंग धरून मिठी मारावी....” आपल्या प्रेमाखातर सारा माळ आपल्या मिठीत घेऊन इच्छिणारा हा नारबा मळ्यातील झाड तोडताना... प्राणीजगत नष्ट होताना उध्वस्त होतो. ट्रॅक्टरच्या आगमनामुळे “मळ्याच मरण” जवळ आल्याचा त्याला भास होतो. अन् एका अर्थाने ते खरेच आहे. मळ्याचे जे स्वतंत्र भावविश्व असते ते आधुनिक यंत्रतंत्रामुळे नष्ट होणार यात शंका नाही. मळयात असणारे प्राणी, मोटवान, हिरवळ, झाडे... त्यांची सावली... झाडांच्या अंगाखांद्यावर बागडणारे पक्षी हे सारं आता नष्ट होणार असते. पिंपळ तोडल्यावर “मळ्यांची शोभा गेली” असे त्याला वाटते. मोटा नाहीत ... गायी, म्हैशी नाहीत ... कोंब्ड्याची बाग नाही... झाडाची सावली नाही.... अशा मळ्यात नारबाचा जीव आता रमेल कसा? ट्रॅक्टरच्या आगमनाने जसा नारबा उध्वस्त झाला तसा त्याचा मळाही उध्वस्त झाला... असा मळा सोडताना तो म्हणतो,

कशाला ऱ्हाऊ आता हित? जगण्यासारख काय ऱ्हायलय मांझ? हुत ते समंद व्हगाडल. पार मातीला जाऊन मिळाल त्याच्या भावना व्यक्त करताना आनंद यादव लिहून जातात, “ठरानभर नजर पसरली ... जिवाला बंर नसल्यागत मळा दिसत हुता. सगळा माळ उलटापालटा होऊन नांगरात पडला हुता ... त्याच्या पोटातली आतडीच वर काढली हुती. संबंध माळावर कुठ झाड डगरी, वारूळ कायबी दिसत नव्हत... बोरीची झुडप, लिळिबी, घाणीरड, बांध झाडुर समद गेलेल.... आता माळावर ढोर कशाला येतील नि पोर तरी कशाला येतील?”... माळ आणि मळा यातील सजीवतेत रमलेला हा नारबा...आता आतून बाहेरून उध्वस्त झाला होता... मळा हेच त्याचे जीवन होते... मळा हीच त्याच्या जगण्याची प्रेरणा होती.

**आनंद यादवांच्या साहित्यातील जीवसृष्टी :-** आनंद यादवांच्या साहित्यातील प्राणीसृष्टी हा विषय तसा पाहिला तर स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. नारबाच्या जीवनाचे अविभाज्य अंग म्हणून या प्राणीसृष्टीचा उल्लेख केला पाहिजे. कारण नारबा वाढला .... हसला .... खेळला .... रडला .... जगला .... ते या प्राण्यांच्या सोबतीने ढोरमेहनत करणारी नारबासारखी माणसं

बुध्दीने मंद असली .... अशिक्षित असली असली तंरी प्राण्यांवर ते जीवापाड प्रेम करीत असतात. अशी माणसं, माणसात फारशी रमत नाहीत. प्राण्यांच्या विश्वात मात्र ती रमतात .... खुलतात. प्राण्यांची सुख दु:खे त्यांच्या आवडी निवडी .... त्यांचे स्वभाव .... त्यांच्या खोडी .... त्यांची दुखणी याबद्दल त्यांना असणारी माहिती विलक्षण असते. नारबाचे तर सारे विश्वच प्राण्यांभोवती फिरत असताना दिसते.

ज्या प्राण्यांचा गोतावळा नारबांच्या भोवती आहे त्या प्रत्येक प्राण्याबरोबर नारबाचे भावसंबंध जडले गेले आहेत. यादवांनी मळ्यातील सर्वच प्राण्यांचे इथे भावपूर्ण पध्दतीने चित्रण केले आहे. मानवी पातळीवरून त्यांचे अवलोकन केले आहे. "गोतावळा" मध्ये ज्या प्राण्यांचे कमी-अधिक प्रमाणात उल्लेख आले आहेत ते प्राणी असे - कोंबडा, कोंबडी, त्यांची पिल्ले, बैल, म्हैस, रेडे, कुत्री, घोडा, शेळ्या, करड, हे तर सर्व आहेतच पण त्याचबरोबर उंदिर, मोर, मधमाशा, पाल, झुरळ, साप, मुंगुस, कावळे, मधमाशा, घुबड, मुंग्या, खेकडी, बेडूक, माकडे, कासव, मासे इ.... प्राणीसृष्टी त्यांनी गोतावळयात आणली आहे. यांदवांच्या सूक्ष्म निरीक्षण-शक्तीचे इथे आश्चर्य वाटते. मळ्यात काम करताना अन् त्याच मळ्यातील खोपीत राहत असताना स्वतः यादवांनी हा सारा 'गोतावळा' जवळून अनुभवला आहे. त्यांच्या अनुभवाच्या मुशीतून हा सारा गोतावळा व्यक्त झाला आहे.

विविध नात्याने जोडलेल्या आपल्या सर्व नातेवाईकांचा समूह म्हणजे "गोतावळा" इथे नारबाच्या बाबतीत "गोतावळा" म्हणजे त्याची सारी प्राणीसृष्टी. कारण त्याचे आई - वडील वारल्याने व त्याला भाऊ-बहिणी नसल्याने त्याला कुणीच लांबचे अगर जवळचे नातेवाईक नव्हते ... भोवतालचे सारे प्राणी हाच त्याचा आता "गोतावळा" बनला... हेच त्याचे सारे मित्र बनले. त्याच्या आयुष्यातील प्रत्येक श्वास या गोतावळयासाठी त्याने वेचला आहे.

नारबान आपल्या सभोवतालच्या प्राण्यांना माणसासारखी नावं दिली आहते. चन्न्या आणि सोन्या अशी लाडीक नाव त्यानं तरण्या पाड्यांना दिली आहेत तर वयस्क बैलांना म्हालिंगा आणि शिवलिंगा अशी भावपूर्ण, श्रध्देशी नातं जोडणारी नावे दिली आहेत. नाम्या कुत्रा आणि चंपी कुत्री या गोतावळ्यात आहे. नारबा या सर्वांशी मानवी पातळीवरून होलताना दिसतो. त्यानं या सर्व प्राण्यांचा अगदी त्यांच्या मानसिक पातळीवरून अभ्यास केल्याचे दिसून येते. प्रत्येक प्राण्याचा स्वभाव, त्यांच्या सवयी त्याला माहीत आहेत. रेडयांचा वास वैरणीला लागला की ती वैरण बैल खात नाहीत हे तो जाणून होता ... अर्थात असा सारा उल्लेख करणे हेही चुकीचच आहे. कारण तो स्वतः सर्व प्राण्यांत इतका गुंतून गेला होता की त्यात आपले स्वतःचे अस्तित्व तो विसरून गेला होता. प्राणीसृष्टीशी तो पूर्ण पणे एकरूप झाला होता. म्हणून त्याला ओला चारा मिळला की नारबा खूष होतो... त्यांना कुणी मारल की तो दु:खी होतो. नारबाला आपल्या पोटाची कधी काळजी वाटली नाही ... पण प्राण्यांच्या भूकेची मात्र त्याला नेहमी काळजी वाटते. म्हणूनच त्यांच्या तोंडून ... "मला तर ढोरांबिगार चैनच पडत न्हाई. त्येच करण्यातच माझा दीस जातो." असे उद्‌गार येतात. असा गुराढोरांत रमणारा नारबा आपणाला प्रत्येक गावात भेटतो... पण त्याच्या मनाचा वेध आपण घेत नाही. त्याच्या मनात खोलवर डोकावून पाहात नाही. असा डोकावून पाहण्याचा प्रयत्न यादवांनी केला अन् त्यातूनच "गोतावळा" प्रकट झाला.

नारबासारखी माणस वास्तवाच्या जगात जगत नसतात ती जगतात प्राण्यांच्या निर्लेप जगात, प्राण्यांच्या अंतरंगात जाऊन त्यांचे मन वाचण्याची कला त्यांना अवगत असते. विहिरीचा

गाळ काढत असताना एका मजुराने त्यातील कासव लपवून फडक्यात गुंडाळून ठेवलेले असते. त्याची ही चोरी लक्षात येताच नारबा त्याच्याशी भांडण करून कासव परत मिळवितो.

**नारबाच्या भावभावना आणि जीवन :-** प्राण्यांच्या सहवासात नारबा आनंदानं वावरत असला तरी त्याच्या मनात खोलवर एक दु:ख भरून राहिला आहे... ते दु:ख म्हणजे आपण अविवाहित राहिल्याचं. आपलं लग्न झालं नाही.. आपण आपला संसार थाटू शकलो नाही... आपल्याला दमून भागून आल्यानंतर तांब्याभर पाणी द्यायला माग असं आपणाला कोणीच नाही ... याची जाणीव त्याला वारंवार होत असते... आपल्या माणसांचा "गोतावळा" असा आता राहिलेलाच न्हवता ... वर आभाळ अन् खाली धरती... संपूर्ण जगात आता नारबा एकटा होता... अगदी एकटा ... अन् असाचा एक दिवस रामू सोनावडयाच्या मळ्यात येऊन पोहोचला ... दोन वेळचं जेवण ... अन् आंगभर कापड ... या बोलीवर तिथंच राहिला ... मुक्या जनावरासारखा..

सोनावडयाच्या मळ्यात आता नारबा रमला... "आपली बी एक कारभारीन असावी तिच्यासंग कवातरी गुलूगुलू बोलावं. कधीतरी तिच्यावर रागवाव.. अन् नंतर मायेन जवळ घेऊन तिला कुरवाळावं.. तिन गरम गरम भाकरी करावी आणि चुलीच्या उबला बसून आपन ती भाकरी खाव... तिच्या पोटी तीन - चार मुलं जन्माला यावीत... खोपीच्या अंगनात ती पोर खेळावीत... मळ्यातली गाजर, कनस त्यास्नी आनून द्यावीत. कदी मंदी आंब्याच्या गार सावलीत सर्वांनी मिळून आसल ती चटणी भाकर गोड करून खाव.." अस एक साध स्वप्न नारबाच होत... पण अखेर त्याच हे स्वप्न स्वप्नच राहिल... अवतीभवतीच्या सर्वांचीच लग्न होतात.. प्राण्यांनाही आपली कामवासना भागविण्याची हुक्की येते मग माझच अस का? माझ लग्न का कोणी करून देत नाही? असे प्रश्न त्याच्या मनात वारंवार येत असतात. कामवासना जेवढी दडपावी तितकी ती जास्त उफाळून येत असते. नारबा तर प्राणी विश्वातील कामवासनेचे स्वच्छंदी रूप जवळून पाहात होता. अशावेळी त्याला शरीरसुखाची ओढ निर्माण झाली नाही तरच नवल? अशी त्याच्या मनाला.. शरीराला वाटणारी ओढ अनेक ठिकाणी प्रकट झाली आहे. त्यातून निर्माण होणार दु:ख कादंबरीत सर्वत्र विखुरलेल आहे. एके ठिकाणी म्हणतो.... "मेल्यावर असाच कावळा हुईल, उडत उडत येऊन पिंड शिवीन पण माझा म्हाळ कोण घालणार? ना बायकू ना पोर... पिंड शिवायचा न्हाई ... बायकू द्या तवा पिंड शिवीन .. न्हाइतर न्हाई ... निदान कावळयाच्या जन्मावर गेल्यावर तर बायकू पाहिजे..." अशा शब्दात त्याने आ एकटेपण.. एकाकीपण व्यक्त केले आहे... त्याच्या या दु:खामुळेच वाचकांच्या मनात हा नारबा खोलवर रूतून बसतो.

नारबाचे जीवन, त्याच्या भाव-भावना हाच या कादंबरीचा मुख्य गाभा आहे. असे असताना रामू सोनावड्याच्या बदलत्या विचारमुळे आपल्यासहित जनावरांचे जे अस्तित्व नष्ट होत चालले आहे त्याच्याविरूध्द नारबा बोलू शकत नाही... विरोध करू शकत नाही. ज्या प्राण्यांच्यावर जीवापाड प्रेम केल ते प्राणी निरनिराळ्या कारणास्त्तव नष्ट होताना पाहून त्याचा उर फुटत असतो... मोठ्या डौलान मळ्यात वावरणार कोंबडा मालकान कापायला नको होता. ज्या गायीन चार पाडे दिले होते तिला कोल्हापूरचा बाजार दाखवायला नको होता, गाभ असलेली म्हैस विकायला नको होती ... एके काळी भिजलेले हरभरे ज्या घोड्याला खायला दिले जात होते त्या घोड्याला आता निव्वळ पिंजर घालायला नको होते... मळ्याची शोभा वाढविणारी झाडे तोडायला नको होती ... मोट बंद व्हायला नको होती .. पण .. पण हे सार नारबा मालकाला बोलणार कसा? कितीही केल तरी तो एक ढोरगडी... मालकान टाकलेल्या तुकड्यावर समाधान मानून, खाली मान घालून कष्ट करणारा एक वेठाबिगारी.. मळ्याच्या मालकाला "हे

तुम्ही करू नका" अस कस म्हणणार? काही ठिकाणी सौम्य शब्दात त्यान विनवणी केली आहे... नाही असं नाही... पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. मालकाला भावनेपेक्षा व्यवहारच श्रेष्ठ वाटला... नारबाला काय वाटत याचा विचार मालक कशाला करील? मालकाला मनातल काय सांगता येत नाही.. अन् त्याला सांगूनही काही उपयोग नाही.. म्हणूनच त्याला वाटत.." हे समदं कुणाला सांगायच? कुणालाच काय सांगाय येत न्हाई. बैलाबरोबर बैल झालो असतो नि दावणीला गपगार बसलो असतो तर बरं झालं असत.. मानसाच्या जन्माला आलो खर पर मला तोंड असून जीभ न्हाई अस झालय. मुक्या जनावरांना बोलता येत नाही... अन् नारबाला बोलता येत असूनही दुसऱ्याला काही सांगता येत नाही.. म्हणूनच यादवांनीही त्याच बोलण स्वगताव्दारेच प्रकट केल आहे.

ग्रामीण भागातली माणसं ही तशी फारच श्रध्दाळू असतात. देव-धर्म, पाप-पुण्य, रिती-रिवाज.. सण-वारा, पूजा-अर्चा अशा अनेक गोष्टींवर त्यांची नितांत श्रध्दा असते. शेत-पिके, जनावरे, पशू-पक्षी, यांच्याकडेही श्रध्दाळू नजरेने पाहिले जाते. नारबाही याला अपवाद नाही. स्वभावाने भोळा असणारा नारबा हा विलक्षण श्रध्दाळू आहे. मळा, गोठ्यातली जनावर, मळ्यातील झाड, मोट, मळ्यातील म्हसोबा, करेव्वा, आप्पाच्यावाडीचा सिध्देश्वर, वाडीचा ज्योतिबा, कोल्हापूरची अंबाबाई, ही त्याच्या श्रध्देची प्रमुख ठिकाणे, अर्थात त्याची प्रत्येक प्राण्यावर श्रध्दा आहे हे वेगळे नमूद करायला नको. भैलात तो "बसवाण्णा" पाहतो तर गायीला तो आईसारखा मान देतो. णोराचा पिसारा बघून त्याला यल्लमाचा दरबार आठवतो. भैलाच्या ठिकाणी त्याला नंदी दिसतो. आपल्या कामाच्या गडबडीत देव-धर्म आपणाला व्यवस्थितपणे करता येत नाही याची खंत त्याला वाटते. पांढरपेशी माणसे जशी यथासांग पूजा करतात तशी पूजा करणे नारबाला कसे शक्य आहे? म्हणूनच एक दिवस, उगवणाऱ्या सूर्याला नमस्कार करताना म्हणतो, "सुर्व्ये नारायेणा रोज काय तुझी आठवण हुईत न्हाई बाबा. कामाचा एराढ रगाडा असतोय नि घाई असती की तू वर आल्यावर जीव कामातून वैतागूनच जातो%" आपल्या रांगड्या भाषेत अशा साऱ्या श्रध्दा प्रकट होताना दिसतात. एकदा माकडांनी मळ्यातल्या कणसावर.. भाजी पाल्यावर ताव मारला.. त्यावेळी नारबाच्या मनात "मारूतरायाची करणी. णारायला तरी येतय? ते आणि पाप कुणी फेडत बसायच? न्हाईतरी मालक माळव्याचा पैसाच करणार हाय. वांडराच्या तरी पोटाला कुणी घालायच? असा उदात्त विचार येतो. एकूणच नारबाची श्रध्दा माणसापेक्ष प्राण्यांवर अन् निसर्गावर जास्त आहे. अशा श्रध्देमुळेच तो मळ्यात गुंतून राहिला आहे. अशी श्रध्दा जर नसती तर त्यांन केव्हाच मळा सोडला असता.

असा हा नारबा% नारबाच्या या व्यक्तिचित्रणातून एक गरीब आणि सच्च्या शेतमजूराचे की, ज्यांने आयुष्यभर आपल्या काळ्या मातीची सेवा केली पण त्याच्याकडे कुणाचेही करू गेले नाही. असे नारबा आज गावोगावी, शेतात राबत त्यांना त्याच्या पालकांनी माणुसकीने वागणूक दिली तर अनेक नारबा न राहता माणूस म्हणून जगतील. आनंदी जीवन जगतील आणि समाजातही त्यांना मानाचे स्थान मिळेल. थी अशा 'नारबांशी प्रेमाने वागण्याची!".

## २.५ गोतावळा: शेती क्षेत्रातील बदलाच्या स्थित्यंतराची कहाणी

मळयावर, प्राण्यांवर, झाडाझुडपावर पुत्रवत् प्रेम करणाऱ्या या नरबाच्या आयुष्यातील उध्वस्ततां हा 'गोतावळा' या कादंबरीचा प्रमुख विषय आहे असे वरवर विचार करताना वाटते. अन् त्यात वावगे काहीच नाही. कारण संपूर्ण कादंबरी भर नारबाचे भावविश्व विखुरलेले आहे.

एखाद्या तान्हया बाळाची काळजी घ्यावी तशी पिकांची, गोठ्यातल्या प्राण्यांची, अंगणातल्या कुत्र्या, कोंबड्याची काळजी घेणारा नारबा वाचकांच्या काळजात घुसतो. त्याचे मळ्यावर ... प्राण्यांवर असणारे प्रेम वाचकांना एका वेगळ्याच विश्वात नेऊन सोडते. ढोरात ढोर होऊन राहिलेला हा नारबा शेवटी शेवटी अनेक संतानी विशद केलेल्या तत्त्वज्ञानाच्या वाटेवरून चालणारा सत्परूष वाटतो. इतरांच्या सुखांत सुख मानणारा व त्यांच्या दुःखाने व्यथित होणारा नारबा हा श्रेष्ठ "कर्मयोगी" वाटतो. रामू सोनवडेच्या मळ्यात राहूनही त्याला सारं काही आपलंच वाटत असतं ... पण मालक विहिरीवर इंजन बसविण्याचा व सारी जनावरे विकून ट्रॅक्टर आणण्याचा निर्णय घेताना पाहून तो उध्वस्त होतो ... तो मालकाला वेगवेगळ्या पद्धतीने समजावण्याचा प्रयत्न करतो पण तो अपुरा ठरतो. शेतीकडे पाहण्याची रामू सोनावडेची दृष्टीच बदलेली असते. खंडीभर जनावर पोसण्यापेक्षा ती सारी विकून टाकून ट्रॅक्टर, इंजिन खरेदी करण्याचा प्रयोग त्याला फायदेशीर होता. या प्रयोगात नारबाचे जे भावविश्व उध्वस्त होणार होते. त्याचा विचार त्याच्या मनात येण्याचे कारणच नव्हते. त्या जनावरांना त्याने कधी वैराण घातली नव्हती की, कधी त्यांचे दुखणे - खुपणे पाहिले नव्हतं. उन्हाळ्यात ऊन लागू नये म्हणून अन् पावसाळ्यात पाऊस लागू नये म्हणून छत्री डोक्यावर धरून; बांधावर उभं राहून शेती करणारा हा मालक... याला त्या भूमीबदल, पिकांबदल... झाडाझुडपाबाबत... अन् तिंथ निमूटपणे राबवणाऱ्या जनावरांबदल प्रेम आपुलकी... माया... कशी वाटेल? त्याला शेतीतुन पाहिजे होता फक्त पैसा. अन् तो मिळवण्यासाठी जे जे लागेल ते ते करायला तो उत्सुक होता. परंपरांगत शेती, संस्कृती, पालेमुळे उखडण्यास तो तयार होता... जनावरांना अन् मजुरांना सांभाळण्यापेक्षा त्याला एखादा निर्जिव ट्रॅक्टर सांभाळणे योग्य अन् किफायतशिर वाटत होते... आजच्या बददल त्या वातावरणात त्याचा हा निर्णय योग्य आहे. पण एकूणच शेतीच्या भावजीवनावर त्याचा अनिष्ट परिणाम होताना दिसतो... एकदा माणूस भौतिक प्रगतीच्या नादाला लागला की, त्याची नितिमत्ता, त्याचे अन् त्याच्या भोवती असणाऱ्या लोकांचे भावविश्व कणाकणाने उध्वस्त होत जाते. आधुनिकीकरणाला इथे विरोध असण्याचे कारण नाही पण या आधुनिकतेमुळे जीवनमूल्यांचाच बळी जात असेल तर मात्र त्यांचा सर्वांनीच गांभीर्यने विचार करायला हवा. पैसे मिळविण्याच्या नादाने मनशांती बिघडत असेल .... पर्यावरणाचे संतुलन बिघडत असेल.. नितीमूल्ये पायदळी तुडवावी लागत असतील तर पैसा मिळूनही सारं काही गमावल्यासारखं होईल. जे आहे ते सांभाळून, नाही ते मिळविण्याच्या प्रयत्न केला पाहिजे. अन् हेही मिळवत असतांना दुसऱ्या कोणाचा त्यात बळी जाता कामा नये. दुसऱ्याच्या थडग्यावर राजमहल जरी बांधला तरी तो राहण्यास योग्य आहे असे कोणीच म्हणणार नाही. ताजमहल कितीही सुंदर असला तरी "निवारा" म्हणून त्याची किंमत शून्यच. भौतिक प्रगतीमुळे मानसाचे बाह्यांग सुधारले पण अंतरंग बिघडले. माणूस आज आहे ते गमावून नाही ते मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणूनच त्याची अवस्था मृगजळामगे धावणाऱ्या मृगासारखी झाली आहे अन् असे धावतांना पायाखाली काय तुडवले जात आहे याकडं कुणाचच लक्ष नाही. नेमकं रामू सोनावड्याच्या बाबतीत हेच झालं आहे.

"अधिक धान्य पिकवा" ही घोषणा ग्रामीण भागात रूजू लागली आहे. हरितक्रांतीचे लोण आता सर्वत्र पसरले आहे. ग्रामीण भागात सुधारणेचे वारे वाहू लागले आहे. सोसायट्या, बॅंका, साखर कारखाने, दूध-डे-या यांनी संपूर्ण ग्रामजीवन बदलून गेले आहे. शहरी वातावरणाचे अनुकरण इथेही होऊ लागले आहे. जुन्या पद्धती, जुने विचार कालबाह्य ठरू लागले आहेत. ग्रामीण माणसाची श्रद्धा... उदारपणा... माया.... निस्वार्थीपणा... या गोष्टी काळाच्या ओघात "खुळचटपणा" च्या यादीत जाऊन बसल्या आहेत. शेतीकडे जीवन जगण्याची पद्धती म्हणून जे

पाहिले जात होते ते बंद होऊन त्याकडे "व्यवसाय" म्हणून पाहण्याची पद्धती दृष्टिकोण रूजत चालला आहे. सजीव जनावरांपेक्षा निर्जीव यंत्रे आता शेतकऱ्यांना आवडू लागली आहेत. अशी यंत्रे खरेदी करण्यासाठी शासनाकडून कर्जेही मिळत आहेत.. अशावेळी मग २/४ हेक्टर शेती असलेली माणसंही यंत्राकडे वळणार? ज्या आजच्या जगात पैसा हेच दैवत झालं आहे त्या जगातच शेतकऱ्यांना जगायंच आहे... म्हणून ते धान्य, पिकांकडुन ऊस, कापुस, द्राक्ष अशा नगदी पिकाकडे वळले आहेत. या पिकांबद्दल दुजाभाव असण्यांच कारण नाही... पण पूर्वी धान्याबाबत शेतकरी जो स्वावलंबी होता तो आता परावलंबी बनत चालला आहे... त्याच्या शेतातील अनंदाचा ठेवा आता हरवत चालला आहे. बैल गेले ... त्याच्याबरोबर त्याच्या गळ्यातील घुंगरांचा नादबंद्ध आवाज गेला... बैलगाडी गेली... झूल गेली... अन् त्याठिकाणी आता निर्जीव ट्रॅक्टर अन् ट्रॉली... शेतक- यांचा मळा आता या बदलामुळे "मळा" राहिला नाही त्यांचा आता "फार्म" बनला आहे. साखर कारखाने आले अन् गुऱ्हाळे संपल्यात जमा झाली. धावत डेऱ्या आल्या नि घरातील तान्हया मुलालाही आता दूध मिळेनासे झाले. पूर्वी ग्रामीण भागातील लोंकाना कोंबड्याच्या आखण्याने जाग यायची. आज डेअरीच्या भोंग्याने जाग येत आहे. घरी चार चार म्हैशी असूनही प्रत्येक घरात "अश्वत्थामा" दुधासाठी आक्रोश करीत आहेत... असं सारं का झाल? याच एकमेव उत्तर म्हणजे जो तो पैशाच्या मागं लागला आहे. आनंद यादवानी रामू सोनावड्याच्या रूपानं असा माणूस उभा केला आहे. शेतीकडे व्यवहार म्हणून पाहणारा रामू सोनावडा अन् भावना म्हणून पाहणारा नारबा यांच्या संघर्षाची कहाणी म्हणजेच "गोतावळा" होय.

परंपरागत शेतीला विरोध करताना अन् आधुनिक शेतीचे महत्त्व पटवून देताना रामू सोनावडेकराचा पाव्हणा म्हणतोः "धदा म्हंटल की गाय नि माय करून भागणार नाही, येईल त्याचा पैसा केला पाहिजे. माणसाच्या लघवीचासुद्धा खतासाठी उपयोग करून घेता येतो. आपली शेती तुमच्या मागास विचारांनीच बुडत चालली आहे... पिकाला अडथळा आणणारी सगळी झाडं तोडून टाका... विनाकारण जनावरं पोसू नका ... जमिनीला ""काळी आई-काळी आई. " म्हणायचं सोडून द्या... म्हणायचच असेल तर दाई म्हणा... असं झालं तरच शेतीकडून जास्तीत जास्त प्राप्ती होईल. तिला भरपूर राबवून घेतली, पैसा... इंग्रजी खत घातली तर हयाच रानात पन्नास पन्नास हजाराच पीक घेता येईल "... या आणि अशा पाव्हण्यांच्या उपदेशामुळे रामू सोनावडा खुलावतो त्याला पन्नास पन्नास हजारांच्या नोटा समोर दिसू लागतात... अन् त्या मोहापायी एक एका जनावर विकून टाकण्याचा निर्णय घेतो...

गुरा ढोरांवर, झाडा झुडपांवर मनापासुन प्रेम करणारा भोळा नारबा या प्रकारामुळे उध्वस्त होतो. हर प्रकारे तो मालकांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतो. आपण पैशाच्या लालसेने झापाटलेला रामू नारबालाच खुळ्यात काढतो. जनावरे विकण्याचा निर्णय घेतल्यापासूनच मालकाच्या वर्तनात बदल होतो. जी जनावर म्हतारी आहेत... जी जनावरं कामाची नाहीत, त्यांना ओला चारा घालणयास मनाई करतो... कधी मधी नारबाने घातला असेल तर तो नारबावर उखडतो. विचारा नारबा या साऱ्या प्रकारमुळे दुःखी बनतो...

नऊ महिने गाभण असलेली म्हैस विकायला नेताना नारबा "मालक ऱ्हाऊ दे की ती म्हैस. नऊ म्हैनं संपलं आता. आता म्हैनाभरात यील" असं म्हणून विनवणी करतो, पण मालक म्हणतो अरं नारबा म्हणूनच तिला विकायची. आत्ताच तिला किंमत यील. अरं आता ही म्हैस म्हातारी झाली या... अजून एखादं यात येईल नी झाडलेली पिशवी हुईल. धंद्यातलं कळतंय कुठं

तुला? मालकाच्या डोक्यात एकच खुळ शिरलेलं असत... ते म्हणजे ट्रॅक्टर खरेदी करण्याचं, अन् त्यासाठी मिळेल त्या मार्गानं त्याला पैसा हवा होता... म्हणून एक एक करीत तो सारी जनावर विकून टाकतो... खरं तर या सर्व जनावरांची देखभाल नारबांन केली होती... नारबाच्या या जनावरांवर जीव जडला होता... ती जनावरंही नारबाला आपला मानत होती. अशाच एका म्हशीच्या आपलेपणाला शब्दरूप नारबाच्या स्वगतातून दिलं आहे... नारबाला वाटतं एखादी गरीब म्हस, पर मालकाला धार देण्याचं मनात नसतं. फडाडा लाथ उडीवती... कोण तू धार काढणार? तुझा माझा संबंध काय? जातीचा का गोतीचा तु? कवा वैरण घाटलीस कां कवा पाणी दावलंस? कासंत हात घाटलस तर लाथ बसंल"... खरोखर म्हशीला बोलायला आलं असतं तर ती असंच बोलली असती... पण... मालक सांगेल तिथं नांदायच अन् मालकांन समोर टाकेल ते खायच हाच त्यांचा धर्म! अन् हाच त्यांचा स्वभाव.

घोड्याच्या बाबतीतही असंच झाले. रामू सोनावडा एकेकाळी... म्हणजे घोडा तरून असताना त्याची खूप काळजी घ्यायचा. त्याची बडदास्त ठेवायचा. रोज भिजलेले हरभरे, ओला चारा यांचा खुराक असायचा... पण तेच घोडं म्हातारं झाल्यानंतर मात्र "त्याच्या पुढे फक्त वाळल पिंजर टाक" म्हणून नारबाला ताकीद देतो अशाच एके दिवशी घोडं जे चरायला गेलं होत ते परत आलंच नाही. नारबा त्याला दुरवर जाऊन शोधून आला... तेव्हा मालक "गेलं तर जाईना घे. ते काय आता धार देणार हाय थोडंच " म्हणून घोड्याचा विचार डोक्यातनं काढून टाकतो... एकूणच प्राण्याकडे पाहण्याची कशी स्वार्थी दृष्टी होती ते इथे लक्षांत येते. पण याच घोड्याबाबत नारबाला वाटतं - "आलं एकटंच अन् मेलंबी एकटच... मालकानं कुठनं पंढरपूरच्या वाटीला गेल्यावर आणलं हुतं. मला त्येची आईबी ठाव न्हाई नि बा बी ठाव न्हाई. म्हातारपणी त्यलावी ते ठाव हुता का न्हाई कुणाला दखल? फुडं फुडं ते आपुण घोडं हाय हेच इसरून गेल असणार. कारण जवळ पास एक म्हटली तर एक घोडी नव्हती. बरोबर बसायला, उठायला दुसरं एखादंबी घोड न्हाई. सगळी ढोरच... आज घोडं मेलं खरं कुणालाच काय वाटलं न्हाई. जुन्या खण्यावा तिवडा मोकळा मोकळा दिसतोय...... परवा दिशाच्या पावसानं त्येच्या बुडातली लिदंबी व्हावुन गेली. रानाला तेवढंच खत .... सपलं घोड. मालकांची घोड्याची हौसबी संपली... " प्रत्येक प्राण्याच्या आयुष्यात नारबा भावनात्मक पातळीवर गुंतला होता. एक म्हातारं मरतुकडं घोडं मेलं त्याच इतरांना काय मोल? पण नारबा मात्र घोडे मेल्यावर हमसून हमसून रडला... अन् हे केवळ घोड्याबाबतीत घडलं असे न्हवे...साऱ्याच प्राण्यांच्या बाबतीत असं घडलं ... नारबाच्या डोळ्यासमोर सारा गोठा रिकामा झाला. मागं राहिले ते केवळ खुंट ... त्यानाही पाय असते तर हे सारं पाहून तेही निघून गेले असते.

जे इतर प्राण्यांच्या बाबतीत घडलं तेच बैलांच्या बाबतीत घडलं. बैल म्हणजे शेतकऱ्यांचा जीव की प्राण. बैल असली तर घराला... शेताला शोभा येते. म्हणूनच या बैलांची पुजा केली जाते. "बसवण्णा" म्हणून मोठ्या आदरानं उल्लेख केला जातो. बेंदराला उत्साहानं मिरवणूक काढली जाते. रामू सोनावड्याकडे ३ जोड्या होत्या या तीनही जोड्यांची नारबा अतिशय काळजी घ्यायचा. त्यांच्या वयाप्रमाणे त्यांना वागणूक व्हायची. अशा या बैलांचा शेवटी ही वाईट पद्धतीने झाला. पिवलींगा नावाचा बैल म्हातारपणांमुळ मरून गेला तर त्याचा जोडीदार बैल म्हालिंगाला मालकाने पन्नास रूपयाच्या आशेने महारांना देऊन टाकला ... महारांच्या ताब्यात म्हालिंगाला देताना नारबा ओक्सबोक्सी रडू लागला. ज्या म्हालिंग्याने आयुष्यभर मालकाची सेवा केली होती त्या देवासमान असणाऱ्या बैलाला केवळ पन्नास रूपयांच्या आशेने कसायाला कापण्यासाठी द्यायचा हा मालकाच्या कृतघ्नपणाचा नमुनाच नव्हे काय? म्हालिंग्याची अशी

विल्हेवाट लावली तर दुसऱ्या दोन बैलाना मालकांने बाजारांची वाट दाखविली. नारबांन त्याला विरोध करायताच – "नारबा तुला यव्हारातलं कळलं असतं तर असा ढोरासारख वागला नसतास. ठेवून का अंडी घालणार हाईत ही बैल? आता उलट त्यांच्या अंगावर मास चढलंय, अंगात ताव आलाय, कुणीबी बघितलं तर चार पैसा चढ देईल..." यावर नारबान अश्रू ढाळण्याखेरिजं दुसरं काय करणार? पाहता पाहता सारा गोठा आता रिकामा झाला होता. एक गाय होती. तिलाही चारा घालायला लागतो म्हणून पांजरपोळात सोडून आला... तीनचार पाडं तीनचार पाड्या नि माणामणानं दूध देऊन शेवटला गाय देवाच्या वाटेला चालली. खाऊन झालेल्या शेंगाच्या टरफलागत तिचा दशा... शेळ्या मेंढ्या तर केव्हाच विकीन काढल्या होत्या. नाम्या कुत्रा चंपीच्या भूरणीनं मस्त गेला होता... रेडे, गायी, म्हैशी बैल... सार कांही आता नजरेआड झालं होतं... एक डौलदार कोंबडा होता तोही म्हसोबाला कापून त्याच्या रस्यावर साऱ्यांनी ताव मारला होता... पोटेचा नाडा शेंदून काढून खोपीत ठेवला होता. नाड्याविना विहिर म्हणजे कुंकवाविणा बाई... विहिरही आता उजाड झाली होती... आता मोटही संपली... अन् मोटेवरचं गाणी संपल... पाण्याचा पाट आता पोरका झाला होता... आता मळ्यात फक्त राहिली होती झाडं... पण त्याकडेही मालकाचं लक्ष गेलं... सारी झाडं तोडुन पैसा करण्याचा विचार मालकाच्या मनांत आला... "त्यानं मजुरांना बोलावलं. मळ्यातली सारी झाडं तोडून त्यांचे मुडदे पाडले..." "निदान तेवढा पिंपळ तरी राहूदे " नारबाने मालकाला विनविले..." माळाला चरणाऱ्या ढोरास्नी सावली हुती... माळाला सोभा होती..." यावर मोठ्या गुर्मीत मालक म्हणाला, "आता ह्यो माळ तरी कोठ ठेवायचा हाय? माळ नांगरून पावसाळ्यात थोडे थोडे पीक करायचं हयात" मळा गेला... माळ गेला... मळ्यातली ... मोकळं समध्या माळभर बेभान उन. सावलीचा तुकडासुदीक न्हाई ... आता या माळावर ढोंर कशाला येतील नि पोंर तरी कशाला येतील... पाखंर तर केव्हाच उडून गेली होती. मळ्यात आता कोंबडा आरवत नव्हता ... गाय हबंरत नव्हती ... बैल मस्ती करत नव्हती ... कुत्री भुकंत नव्हती.... पीक हसत नव्हती... झाडं डोलत नव्हती... मोटेचा कुंई .... आवाज आता कधीच येणार नव्हता...डोळयात पाणी खिदळणार नव्हतं... गोठ्यात सगळीकडे खूट्टेच खूट्टे ... मोकळे ... सारी दावणंच आता रांडमुंड झालीय... सारी खोपच मुकी झाली होती. मळ्याला आता मुड्याची अवकाळा आलीय... विहिरतलं पाणी ही आता मलं होत... त्यातल्या कासवाला हे काय चाललय ते कळत नव्हत... घोड्यांची हाडं तेवढी कुजत नव्हती म्हणून पडक्या विहिरीत दात वेंगाडून हसत होती... अन् वड्याच्या काठला म्हालिंग्याची हाडं वाहुन जाण्याची वाट पाहत पडून राहिली होती... पाखंर आता दूर देशाला निघून गेली होती... राहिला होता आता फक्त नारबा... तोही केवळ शरीरांन... मन तर त्याच केव्हाच मेलं होत... कसाबसा तग धरत दिवस ढकलत होता...

मळ्यावर आता राज्य होतं निर्जिव ट्रॅक्टरच अन् त्याच्या डॉयव्हरचं. ड्रायव्हर सांगेल ते काम बिनतक्रार करणं एव्हढच नारबाच्या हाती शिल्लक राहिलं होते. "नाऱ्या ट्रॅक्टर पुस म्हटले की, ट्रॅक्टर पुसायचा... नाऱ्या ट्रॅक्टरच्या तोंडात पाणी वतायचं... इंजन पुस म्हटले की इंजन पुसायचं... नारबाच्या कामाचं सारं स्वरूप बदलून गेलं होते... गाडी बंद... कुळव बंद... बैलाचा नागंर बंद ... कोळपणी बंद ... म्हणूनच नारबाला वाटते "धनी मेल्यागत जनावरे निघून गेली तसं मी बी त्येंच्यासंग जायला पाहिजे हुतं..." पण जाणार कुठं? ना आई... ना बाप... ना भाऊ ना बहीण... ना दोस्त... ड्रायव्हरचं अन् त्याच पटणं शक्यच नव्हते... ड्रायव्हरची अरेरावी आता त्याला सहन होत नव्हती... एक दिवस सहन होऊन तो मालकाला कळवळून म्हणाला "आत्तपत्तर ड्रायव्हरचं लई सोसंल मालक..." अन् हे म्हणत असतानाच त्याला कढ आवरला नाही... ढसाढसा तो रडू लागला... पण पैशाच्या धुंदीत असणाऱ्या मालकाला त्याच्या आसवांच

काय? तो उलट चढ्या आवाजात म्हणाला – "हे बघ, सोसवत नसलं तर तुझी तू वाट धर. तू न्हाई उभा दुसरा कोण तरी पाणी पाजाय येईल. पर ड्रायव्हर एकदा गेला की पुन्ना त्या शारगावातन हितं कुनी पाय धुवुन पाणी प्यालो तरी येणार नाही. आणि ऱ्हायचं असंल तर ड्रायव्हर सांगल तसं- ऱ्हायंचं... कर म्हटल ते करायचं ... तोंड बंद ठेवायंच... उगच मला वाळली रखरख नगं... कसं?" नारबाला रानानं दुभंगाव अन् पोटात आपणाला घ्याव असे वाटलं... संपल... सार ... सारं ... संपलं ... शेवटचा धागाही तुटला... नारबानं आता मळा सोडायचं ठरवलं... कशाला ऱ्हाऊ आता हिंत? जगण्यासारखं काय ऱ्हायलय माझं? ... भिवलिंगा ... म्हालिंगा, तुमची माती हितच पडली... कोंबड्या ... कुतऱ्याची ... माती हितच... मातीला सोडून सारी निघून गेली... पर ह्या मातीनं कुठ जायचं? अन् हाच प्रश्न नारबाला पडला... मी जाणार तरी कुठं? पन् हित ऱ्हाणार तरी कसं? हित आता कोण हाय आपलं? आता पिकं ट्रक्टरनं यतील, इंग्रजी खतानं दुप्पट फुलतील... खंडीखंडीनं पिकंल निं मालक ट्रक्टरन म्हैनाम्हैनाभर सुगी बडंल त्यात आपलं काय? ... विचारांच्या भोवऱ्यात नारबा मळा सोडतो... डेंडे ढेकळं तुडवत... चालु लागतो... पाठी मागं दुर वळून पहतो... उजाड मळा दिसते... २० वर्षापुर्वी या मळ्यात आपून आलो... दिवसरात्र मळ्यात राबलो... अन् आता समदं सोडून आपून निघून चाललोय.. मळा पाहून त्याला भडभडुन येत... डोळे भरत येतात... पण आता रडायलाही त्याला जागा नसते... नाही म्हणायला एक कुंत्रं मात्र त्याच्या पाठीमागून येत असतं... इथ मला सारं राज्य भोगूनही वैराग्य प्राप्त झालेल्या अन् त्यामुळेच राजवैभवाचा त्याग करून स्वर्गा रेहणाला जाणारा धर्मराज आठवतो... त्याच्याही सोबतीला शेवटी एक कुत्राच राहतो... नारबालाही आता आपलं सार राज्य सोडून एका अज्ञाताच्या प्रवासाला जायचं होतं ... त्यानं आपल मळा सोडला होता... पण चालायला ताकत तर पाहिजे... पाय थकले .... मन थकले .... बुध्दितर केव्हाच नष्ट झाली होती... त्यातच त्याच्या पोटात आणि .... पायात कळा येऊ लागल्या .... चक्कर येऊ लागली.... सारं रान गरगरा फिरायला लागलं.... अन् काय होत हे कळायच्या आता तो खाली कोसळतो. भावणा आणि व्यवहाराच्या संघर्षात शेवटी व्यवहाराचा विजय झाला.... यंत्र युगाच्या आक्रमणाचा नारबा बळी ठरला.... स्थित्यतराच्या संक्रमण काळातील तो हुतात्मा ठरला.... त्यांच स्मारक कोणी बांधणार नाही याची खात्री आहे. .... पण कुणी ऊर्भ केलंच तर त्यावर "इथ परंपरांगत शेती संस्कृती अन् आधुनिक यंत्र युगाच्या संघर्षात बळी गेलेला एक कष्टाळू माणूस चिरनिद्रा घेत आहे." अशी वाक्य कोरावी लागतील.

आज गावोगावी असे असंख्य नारबा उध्वस्त होत आहेत. त्यांना धड जगता येत नाही अन् मरताही येत नाही. बड्या श्रीमंत शेतकऱ्यांनी त्याचे भाव विश्वच उध्वस्तच करून टाकले आहे. मालकाच्या मळ्यात अहोरात्र कष्ट करणाऱ्या माणसांना या बड्या शेतकऱ्यांच्या मनाचा अंदाज येईनासा झाला आहे. मुळात सरळ मार्गानी जाणारी नारबासारखी माणसं सोनावड्या सारख्या धूर्त माणसांची चाल ओळखू शकत नाही. स्वार्थ त्यांना माहीतच नसतो.... पण त्यामुळेच आजच्या जगात अशा सरळमार्गी जगणाऱ्या माणसांची ससेहोलपट; होते.

आनंद यादवांनी नारबाचा सारा गोतावळा अन् त्यांची वाताहात शब्दबद्ध करताना भावना आणि व्यवहार यातील संघर्षाचे दर्शन तर घडविले आहेच. पण यंत्रयुगाचे जे अतिक्रमण शेती संस्कृतीवर होत आहे. त्याचाही वेध घेतला आहे म्हणूनच या कादंबरीला एका श्रेष्ठ अशा कालकृतीचा दर्जा लाभला आहे.

## २.६ 'गोतावळा' कादंबरीची भाषिक - वैशिष्ट्ये

आनंद यादवांनी ते ज्या कागल परिसरात वाढले त्या कागल परिसरातील ग्रामीण बोलीभाषेचा वापर "गोतावळा" मध्ये केला आहे. ग्रामीण भागातील सुखदु:खांचे चित्रण करतानाच ग्रामीण भाषेचाच वापर करण्याचा आग्रह त्यांनी सर्वत्रच धरला आहे. ग्रामीण कथाबीज अन् नागरी भाषा असा संकर त्यांना मान्य नाही. याबाबतची मते मांडताना ते म्हणतात, "ग्रामीण कथा ही लेखकाने अनुभवलेल्या ग्रामीण जीवनातून प्रेरणा घेऊन आलेली असते. त्या ग्रामीण जीवनाचाच ती ग्रामीण भाषा हा एक अपरिहार्य भाग असते. ती भाषाही ग्रामीण जीवनाचा अनुभव घेत असतानाच लेखकाने जगलेली भोगलेली असते. त्यामुळे ती भाषा त्या जीवनानुभवाचाच एक भाग म्हाणून त्याने अनुभवलेली असते. त्या जीवनानुभवाशी ती एकरूप असते. त्यामुळे त्याला ती कलाकृती जाणवते ती त्या भाषेसहच जाणवणार. जेव्हा त्याला त्याजीवनाची प्रत्यक्षता उभी करावयाची असते, तेव्हा त्या जीवनाचे काही घटक किंवा भाग टाळून भागणार नाही. हे टाळता येत नाही म्हणूनच तो ग्रामीण भाषेचा त्याच्या साहित्यकृतीतून वापर करत असतो. आनंद यादवांना 'गोतावळा' तून केवळ नारबाच्या उध्वस्त जीवनाची माहिती सांगायची नाही तर त्याच सांर जीवनच उलगडून दाखवायच आहे. केवळ माहिती करून देण्याचा हेतू असता तर कोणतीही भाषा वापरली असती तरी चालले असते. पण असे झाले असते तर "निवेदन" झाले असते .... आनंद यादवांना ग्रामीण भागातील प्ररिवर्तनासंबधी केवळ "निवेदन" करावयाचे नव्हते तर एक प्रकारचा "आत्माविष्कार" घडवायाचा होता. म्हणूनच त्यानी अत्यंत जाणिवपूर्वक ग्रामीण भाषेचा वापर इथे केला आहे.

"गोतावळा" मधील नारबालाच यादवांनी बोलके केले असल्याने ग्रामीण भाषेचा वापर करणे अपरिहार्य ठरले आहे. पण नारबाला बोलका करताना संवादांचा वापर फारसा न करता स्वगतांचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. संपूर्ण कादंबरीत नारबा फारसा बोललेला दिसत नाही. ज्याची अवस्था "तोंड आहे पण जीभ नाही" अशी आहे तो बोलणार तरी काय? अन् त्याचे ऐकून तरी कोण घेणार .... नारबासारखी माणस ही तशी अबोलच असतात. माणसापेक्षा ती प्राण्यातच जास्त रमतात. अशी माणसं सतत स्वत:शीच विचार करताना दिसतात. आपलं काम भलं की आपण भलं या त्यांच्या वृत्तीमुळे ती जास्त कुणात मिसळत नाहीत. अशा नारबाच्या मनातील प्रतिक्रियांचा अविष्कार यादवांनी त्याच्या "स्वागता" तून घडविला आहे. अन् हेच या कादंबरीचे प्रधान वैशिष्ट्य आहे. अर्थात हे नारबाच आत्मनिवेदन आहे असं कुणीं म्हटल तर ते मात्र चुकीचं ठरेल. कारण आत्मनिवेदनामध्ये स्वत:चे समर्थन असते.... स्वत:च्या मतांचा आग्रह असतो. इथे तसे घडलेले नाही. आनंद यादवाना केवळ नारबाचे दु:ख मांडायचे असते तर त्यांनी आत्मनिवेदन पद्धती स्विकारली असती. पण इथे त्यांना ग्रामीण भागातील परिवर्तनाची प्रक्रिया दाखवायची आहे. 'गोतावळा' मध्ये आत्मनिवेदन पद्धती कांहिसी दिसून येत असली तरी कलात्मक अविष्कारामुळे तिला एक वेगळे अन् स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले आहे. निवेदनापेक्षा स्वगताला यादवांनी प्राधान्य दिल्याने ग्रामीण बोली भाषेतून व्यक्त केलेली ही स्वगते मोठी अर्थपूर्ण झाली आहेत. म्हणूनच शांता शेळके म्हणतात, "आनंद यादवांच्या आधी कुठल्याही ग्रामीण लेखकाने इतक्या परिपूर्णतेने बोली भाषेचा उपयोग केल्याचे दिसून येत नाही."

'गोतावळा' हे केवळ आत्मनिवेदन नाही असं वर म्हंटल आहे त्याचा आणखी थोडा खुलासा करणे आवश्यक आहे. नारबाने केवळ आपले जीवन आणि सुखदुं:ख व्यक्त केले असते तर त्याला आत्मनिवेदन म्हणतात आले असते. पण 'गोतावळा' मध्ये मळा, प्राणी, पिके, जनावरे

या सर्वाच्याच मनातील प्रतिक्रिया ऐका वेगळ्या पद्धतीने "बोलक्या" केल्या आहेत. पण हे बोलकेपण व्यक्त करताना नारबाचा उपयोग माध्यम म्हणून केला आहे. एक वेळ आपलं दु:ख नारबा सांगू शकेल... पण जनावरे कशी सांगणार? बर जनावरांना बोलंत करायच तर मग या इसापनीतितील कथा झाल्या असत्या. यावर मात करण्याचा यशस्वी प्रयत्न आनंद यादवांनी केला आहे. उदा... पुढील उताऱ्यात स्वगताचा दोन पातळीवर कसा वापर केला आहे. — "एवढी गरीब म्हस, पर मालकाला धार देण्याच मनात नसतं. फडाडा लाथ उडीवती... कोण तू धार काढणार? तुझा माहा काय संबंध? जातीचा की गोतीचा? कवा वैरण घटलीस का कवा पाणी दावलंस? कासंत हात घाटलास तर लाथ बसंल. कुणालाबी हात घालू दयायला आम्हांला काय हाय की न्हाई?.. म्हशीला काय ठाव, समदं दूध त्येच्याच शिक्क्यावर जातंय ते?"

आता या लेखनातील पहिलं आणि शेवटचं वाक्य नारबाच्या मनातलं आहे तर मधली वाक्ये म्हैशीच्या मनांतील आहेत... जनावरांच्या मनांतील विचार नारबांच्या मनांतून व्यक्त करण्याची किमया यादवांनी करून एक वेगळाच यशस्वी प्रयोग इथं केला आहे. दोन्ही मनोगतांचा सुंदर मिश्रण हे या कादंबरीचे प्रधान वैशिष्टय मानावं लागेल.

बोलीभाषेतील सुंदर उपमा हे 'गोतावळा' चे आणखी एक वैशिष्टय. बायको नसलेल्या नारबाला "तोडलेल्या झाडाच्या हुभ्या बुडक्याभत भुंडा" म्हंटल आहे. तर कशी सरळ सरळ पाणी नसलेल्या नदीची उपमा दिली आहे. उन्हाळ्यात पाणी कमी असल्याने पाटात पाणी सावकाश जातं हे सांगताना, "पाणी मणकं तोडलेल्या सापागत हळूहळू चाललं होत?" अशी सार्थ उपमा दिली आहे तर घोड्याचा रंग लालसर होता हे सांगताना "उनात तांबडा रंग घासलेल्या घागरीगत चकचकायचा" अशी उपमा दिली आहे. घारींचा उल्लेख "पांढऱ्या बामणी घारी" असा केला आहे तर गिधाडांना गावात चौकाशीला आलेल्या फौजदाराची उपमा दिली आहे. मनाचा एकटेपणा विशद करताना "मन तेलाच्या ठेंबागत एकटं पडलेलं" असे सुंदर शब्द वापरले आहेत. झाडाचा शाखाविस्तार नमूद करताना "चौबाजूला रावणाचं हात पसरल्यागत फांद्या" अशी उपमा वापरली आहे तर त्याच तोडताना पाहून "रावणाचं हात तुटल्यागत त्येच्या दांडग्या ढाप्या तुटू लागल्या" असं वाटू लागलं. "सोन्या-चाण्या घरावर जप्ती आलेल्या माणसांगत एकदम गरीब दिसाय लागलं" किंवा "ट्याक्टर पिसाळलेल्या हत्तीगत धावला" अशा वाक्यामुळं घटनेची तिव्रता योग्य पद्धतीने प्रकट झाली आहे.

थोडक्यात-ग्रामीण बोली भाषा, त्याला अनुसरून वापरलेल्या उपमा, त्यामुळे ही कादंबरी अधिक परिणामकारक झाली आहे.

## २.७ संदर्भ


१. गोतावळा-आनंद यादव, मौज प्रकाशन, मुंबई.
२. साहित्याचा अन्वयार्थ - नागनाथ कोत्तापल्ले.
३. ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि समस्या - आनंद यादव.
४. मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा - चंद्रकांत बांदिवडेकर.

## २.८ संभाव्य प्रश्न

१. 'गोतावळा' या कादंबरीचे कथानक तुमच्या शब्दात लिहा.
२. नारबाचे व्यक्तिचित्र रेखाटा.
३. कृषी संस्कृतीच्या पराभवाची कथा म्हणजे 'गोतावळा' हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

पारंपरिक शेती संस्कृतीवर आधुनिक यंत्रयुगाचे अतिक्रमण झाल्यास होणारा परिणाम 'गोतावळा' या कादंबरीमध्ये कसा चित्रिस झाला आहे.
४. 'गोतावळा' या कादंबरीची भाषिक वैशिष्टये विशद करा.

❖❖❖❖

# ३. रोबो - दिनानाथ मनोहर (कादंबरी)

# ३

# रोबो - दिनानाथ मनोहर (कादंबरी)

**घटक रचना :**

३.१ प्रस्तावना
३.२ रोबो कादंबरीची वैशिष्ट्ये
३.३ 'रोबो' त आलेले शारीर पातळीचे वर्णन
३.४ संदर्भ

## ३.१ प्रस्तावना

'रोबो' ही दिनानाथ मनोहर यांची कादंबरी १९७६ साली प्रकाशित झाली. 'रोबो' त दिनानाथ मनोहर यांनी लष्करी जीवनाचे विदारक व वास्तव चित्रण केले आहे. साधारणतः प्रारंभीच्या काळात भारतीय लष्करात तरुणांचे भरती होण्याचे प्रमाण कमी होते. नंतरच्या काळात एक नोकरीची गरज म्हणून लष्करात बरेच तरुण भरती झाले. लष्करातील प्रशिक्षण किंवा त्यात शिस्तीचे वातावरण असल्यामुळे बरेच तरुण मध्येच सोडून जातात. त्यांना 'भगोडा' म्हणून ठरविले जाते. या कादंबरीचा नायक 'डिकी' लाही असेच ठरविले गेले आहे.

'डिकी' या कादंबरीचा नायक. प्रारंभी रुजू व्हायला जातो. तिथे त्याचे थंडे स्वागत होते. पुढच्या संघर्षाची संभाव्य जाणीव त्याला होते. सुरुवातीच्या काळात तो लष्करी प्रशिक्षण पूर्ण करतो. नंतर त्याची नियुक्ती संदेशवहन खात्यात टेलिफोन ऑपरेटर म्हणून होते. लष्करातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना तो सॅल्यूट करण्याचे टाळतो. एका प्रसंगात एका अधिकाऱ्याचे घरचे काम करण्याचे नाकारतो. त्यातूनच त्याच्या लष्करी जीवनाचा संघर्ष सुरु होतो. डिकी जसा भावनिक आहे तसाच तो विद्रोही देखील आहे. कसेही करुन या लष्करी जीवनातून बाहेर पडायचे, यासाठी तो अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करतो. कधी तो अधिकाऱ्यांशीच हटवादीपणे वागतो तर कधी मौन पत्करतो, जेणेकरुन या नोकरीतून आपल्याला लवकरच मुक्त केले जाईल, असे त्याला वाटते.

लेखक दिनानाथ मनोहर यांनी काही काळ आर्मीत नोकरी केलेली आहे. (संदर्भ, लोकमत - नाशिक आवृत्ती 'मंथन पुरवणी' मे २०१३) स्वतःचे काही अनुभव त्यांनी या कादंबरीत सांगितलेले असावे, असे वाटते. या कादंबरी डिकी बरोबरच पांडे, अनिल साहा, शिंदे, व सडासिंग हे भरती झालेले आहे. ते डिकीचे मित्र बनतात तर मुंबईचा प्रभाव पूर्व बंगाल मधील सुनीता ही स्त्रीपात्रेदेखील या कादंबरीत आलेली आहेत. हवालदार पिल्ले, जर्मनसिंग, मेजर मेहता, कर्नल फिलिप्स, शेखू, संगतराम, कॅमा कमांडर पडगीकर, हवालदार निरंमन,

मेजर सेन, सुभेदार मणियार, कॅप्टन काळे, इ. लष्करातील वरिष्ठ अधिकारीही या कादंबरीत आपल्याला दिसतात.

अनिल साहा नावाचा तरुण दिसायला बाळसेदार असल्याने विकृत हवालदार पिल्ले त्याचे लैंगिक शोषण करुन पाहतो. परंतु डिकी व त्याचे मित्र पिल्लेचा प्रयत्न हाणून पाडतात. पुढे पिल्ले गायब होतो. डिकीचा एक मित्र पांडे याला जर्मन सिंग प्रशिक्षणादरम्यान त्याच्या पदवीची अश्लिल भाषेत खिल्ली उडवितो. पांडेला हे सहन होत नाही. पुढे हा रेल्वेखाली आत्महत्या करुन आपले जीवन संपवतो.

मुळातच देशाचे रक्षण करावे, या निस्वःर्थी हेतूने डिकी व त्याचे मित्र लष्करात भरती झालेले असतात. मात्र अधिकाऱ्यांच्या दुटप्पीपणा पाहून, आलेल्या अनुभवातून त्यांना देशप्रेमाबद्दल फोलपणा जाणवतो. डिकीचा एक सहकारी मित्र सडा सिंग ड्रायव्हर आहे. त्याचे नवीन लग्न झालेले असते. जवळच १०/१२ मैलावर त्याचे गाव हे. आपल्या पत्नीला भेटण्यासाठी तो आतूर झालेला असतो. त्याची अस्वस्थता बघता घरी त्याला घरी सोडण्यासाठी मदत करतो. आपल्या पत्नीच्या सहवासात राहून सडासिंगला डिकी पुन्हा कॅम्पवर आणतो.

डिकीचाच एक सहकारी शिंदे आर्मीतील प्रशिक्षणाला वैतागून स्वतःची बोटे तोडून घेतो. डिकीला शिख इन्फ्रंटीमधील काही अनुभव दिलासा देणारे आहे. शिख इन्फ्रंटीमध्ये वरिष्ठ व कनिष्ठ असा भेदभाव केला जात नाही. तिथे कर्नल फिलिप्ससारखा उमदा अधिकारी आहे. तो आर्मीच्या शिस्तीची मर्यादा सोडून सर्वांना जवळ घेण्याचा प्रयत्न करतो, तर शेखू नावाचा अधिकारी देशासाठी बलिदान करणे म्हणजे जीवनातील फोलपणा व व्यर्थपणा आहे. देशासाठी कशाला मरायचे? असा सवाल तो डिकीला करतो. लष्करातील बेगडी मूल्यांना तो विरोध करतो.

मुळची मुंबईची असणारी प्रभा नावाची नर्स ही दिसायला सुंदर व आकर्षक आहे. ती मिलिटरी हॉस्पिटलमध्ये नर्स आहे. तिला डिकीबद्दल प्रेम वाटते. एकूण लष्करी जीवनात तिला फक्त डिकीचा आधार वाटते. पण डिकीला लष्करी जीवनाचा मूळातच तिटकारा आहे. म्हणून प्रभाबद्दल किंवा तिच्या प्रेमाबद्दल तो फारसा गांभीर्याने पाहत नाही. तिचे प्रेम त्याला खरे वाटत नाही. मात्र दोघे एकत्र सिनेमा पाहतात. फिरतात पण डिकी तिच्या जवळ जात नाही. शेवटी तिची बदली होते. तरीपण डिकी तिला स्टेशनवर सोडवायला देखील जात नाही.

डिकीची संदेश वहन खात्यातून दुसऱ्या खात्यात आसामच्या दिब्रूगडला बदली केली जाते. दिब्रूगडचे तेथील जीवन त्याला बैचेन करते. आर्मीतील जीवन सोडण्यासाठी तो मनोरुग्ण म्हणून दाखविण्याचा प्रयत्न करतो, पण त्याचा अर्ज फेटाळला जातो. पुढे तो दिब्रूगडला रुजू होतो पण आसपासचे आसाममधील दारिद्र्याचे व गरीबीचे भीषण दर्शन त्याला अस्वस्थ करते. स्टेशनच्या परिसरातील शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रिंया, त्यांची लहान, उपासी, अर्धनग्न मुले यांचे हलाखीचे जीवन तो जवळून पाहतो. रेल्वेत लगट करणाऱ्या स्त्रियांचीही त्याला किव वाटते.

कधी कधी डिकी दिब्रूगड मधील सुपारीच्या बागा, भाताची खाचरे, छोटी तळे, यांमधील सौंदर्याने मोहीत होऊन आपले दुःख हलके करण्याचा प्रयत्न करतो. पण आसाममधील

गरीबी व लाचारीचे जीवन बघून तो उदविग्न होतो. याच दरम्यान त्याला पूर्व बंगाल मधील सुनीता नावाची तरुणी भेटते. तिचा मनमोकळा स्वभाव डिकीला फार आवडतो. डिकीची होणारी घुसमट, मनाचा कोंडमारा तिच्याजवळ व्यक्त करतो. सुनीताचा सहवास त्याला आवडतो. डिकीची मनात चाललेली ही घुसमट किंवा द्वंद्व आपल्याला फ्राईडच्या मनोविश्लेषण सिद्धांताची आठवण करुन देणारा आहे. सारांश, आपले जीवन लष्करात घालविणे त्या पूर्वजन्मीचे पातक वाटते. कधी कधी त्याला पांडेच्या आत्महत्येचे कौतुक वाटते. त्याच्या पांडे किंवा शिंदे यांच्यासारखे साहस आपल्या हातून घडत नाही याचीही त्याला खंत वाटते.

डिकीचा शेवटचा प्रवास खडतर आहे. फौजेतून त्याला मुक्त केले जात नाही. सर्वजण त्याच्यावर अघोषित बहिष्कार टाकतात. यासंदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, “या सर्व उलाढालीमुळे तो विलक्षण मानसिक ताणाला सामोरा जात असतो. शिस्तभंगाची कारवाई होत नसेल निदान मनोरुग्ण ठरवून तरी आपल्याला बाहेर पडता येईल असे त्याला वाटते. त्या दिशेने त्याचे आकांताचे प्रयत्न सुरु होतात. फौजेच्या दैनंदिन चौकटी बाहेरच्या मनोविकार तज्ज्ञापर्यंत पोहोचण्यात त्याला यश येते. या मनोविकार तज्ज्ञाचे हातही फौजेने बांधलेले असतात. निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेले स्वातंत्र्य त्याच्याजवळ नसते. तो फक्त डिकीला काही महिन्यांची मेडिकल रजा द्यावी अशी शिफारस करतो. मुक्त होण्याच्या डिकीच्या प्रत्येक प्रयत्नासमोर अशा प्रकारे भिंती उभ्या राहतात.” (पृ. ४७, मुक्त शब्द - जुलै २०१२)

अखेर डिकी मनोविकार तज्ज्ञाकडून येत असताना तो एका आंदोलनात सापडतो. तिथे पोलिस गोळीबार करुन लोकांना पांगवतात, पण त्यात काही लोक मारले जातात. हा प्रकार त्याला नाऊमेद करतो. तो कॅम्पावर न जाता थेट रेल्वे स्टेशनवर जातो. गाडी पकडतो. ती पुलावर येताच डॉक्टरांनी दिलेले पत्र व लष्कराचे पेबुक काढतो व नदीच्या पाण्यात सोडून देतो. आता तो लष्करी जीवनातून पूर्णपणे मोकळा झालेला आहे. आर्मीच्या दृष्टिकोनातून तो आता ‘भगोडा’ (डेझर्टट) झालेला आहे. एकूणच ‘रोबो’ ठरलेला डिकी आता स्वतंत्र झालेला आहे. याबाबत डॉ. हरिश्चंद थोरात म्हणतात, ‘रोबोचा प्रारंभ होतो तेव्हा ती फौजी जीवनाचे अस्सल व वास्तववादी चित्रण करणारी कादंबरी आहे असे वाटते.’ (पृ. ४७, मुक्त शब्द, जुलै २०१२)

## ३.२ रोबो कादंबरीची वैशिष्ट्ये

‘रोबो’ ही नव कादंबरी आहे, त्यामुळे तिची भाषा काही बाबत काव्यात्मक झाली आहे. डिकीच्या मनात चाललेले विचार संज्ञाप्रवाही वाटतात. त्याचे विचार आत्मनिष्ठ वाटतात. काही वाक्ये गूढ व रहस्यमय वाटतात. लेखक डीकीच्या माध्यमातून लष्करी जीवनाचे विदारक चित्रण करु पाहतो. यासंदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, “डिकीने प्रथमपुरुषी भाषिक रुपात केलेली काव्यात्मकतेकडे झुकलेली आत्मनिवेदने येथे महत्त्वाचे काम बजावू लागतात. वाचक या दृष्टीतून जागरुक झाला की ‘रोबो’ मधील फौजेच्या मर्यादा ताणण्याचा प्रयत्न कादंबरीभर आणि विशेषतः कादंबरीच्या उत्तराधीत होतो आहे. याची जाणीव त्याला होऊ लागते. ‘रोबो’ मधील फौज रूपकालक स्वरुपाची आहे आणि तिला फौजेच्या पलीकडचे काहीतरी सांगावयाचे आहे, हे वाचकाला समजू लागते.” (पृ. ४७, मुक्त शब्द, जुलै २०१२)

'रोबो' मधील भाषेच्या संदर्भात काही शिव्या झालेल्या आहेत. जर्मनसिंग हा काश्मिरी अधिकारी इंग्रजी भाषेतून शिव्या देतो. पांडेच्या पदवीचा अश्लिल भाषेत उपमर्द करतो. परिणामी तो आत्महत्या करतो. जर्मनसिंगशिवाय इतर काही अधिकारी व जवान संतापापोटी सर्रास शिव्यांची लाखोली वाहतात. उदा. गधे, बेवफूक, ब्लडी फूल्स, रास्कल, बोकाचोद, मादरचोद या शिव्या 'रोबो' मध्ये आलेल्या आहे. याबाबत डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, "फौजेच्या संभाषिताशी घातलेल्या उघडवादाची उदाहरणे आहेत. कर्नल फिलिप्स आणि डिकी यांच्यामधील बोलणे फौजेच्या संभाषिताला छेद देणारे आहे. उघड नसला तरी फौजेच्या संभिषिताशी घातलेला छुपावाद. डिकीच्या प्रथमपुरुषी निवेदनामध्ये पाहयला मिळतो. कवितेच्या जवळ जाणारी परिस्थितीवर प्रतिक्रिया व्यक्त करणारी, स्वतःशी संवाद साधत 'स्व' ला अधोरेखित करणारी ही आत्मनिवेदने फौजेच्या संभाषिताच्या सत्रेखाली येण्याचे यशस्वी रीतीने टाळतात. (पृ. ५०, मुक्त शब्द - जुलै २०१२)"

## ३.३ 'रोबो' त आलेले शारीर पातळीचे वर्णन

फौजी जीवनातील अतृप्त काम वासनेचे प्रतिक आहे. अनिल साहाबर हवालदार पिल्ले अतिप्रसंग करु पाहतो. पांडेच्या पदवीची अश्लिल भाषेत टवाळी होते. शिंदे स्वतःची बोटे तोडून घेतो. तर रुडासिंग बाहेर पडून पत्नीला भेटून येतो. यासंदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात आपले मत मांडताना म्हणतात, "या सर्व व्यवहारामध्ये पराकोटीची हिंसकता आहे. नियम पाळतानांच नव्हेतर नियम मोडूनही शरणागत शरीरांना शोषणाचे माध्यम कसे बनवले जाते. अनिल साहाचा उदाहरणावरुन लक्षात येते. हवालदार पिल्लेच्या वासनेचा तो बळी होत असतो तेव्हाही सत्ता त्याच्या शरीरावरच राज्य करु पाहत असते." (पृ. ५३)

थोरात यांचे विधान हे योग्य वाटते. अर्थात या सर्वांना आव्हान देणारा डिकी आहे. त्याचे शरीर या सर्वांना आव्हान देणारा डिकी आहे. त्याचे शरीर बंड करते व शिस्तीच्या नावाखाली चालणारे शोषण तो नाकारतो. डॉ. थोरात पुढे म्हणतात, "शिस्तीच्या नियंत्रणाखाली अडकलेल्या सडासिंगला युक्ती-प्रयुक्तीने डिकी सडासिंगच्या गावी घेऊन जातो. त्याच्या घरातील माणसांची विशेषतः नवपरिणत बायकोची भेट घेता येणे शक्य व्हावे, यासाठी डिकी साहस करतो. या भेटीला अर्थातच उघड शारीर संदर्भ आहे. सडासिंग नुसता बायकोला भेटणार नाही. तो तिच्या बरोबर झोपणारही आहे." (पृ. ५४, मुक्त शब्द - जुलै, २०१२)

याबरोबरच 'रोबो' मध्ये स्टेशनवर दिसणाऱ्या मुली व स्त्रिया, त्यांचे फाटलेले कपडे, धक्के देणारे काही तरुण त्यांच्या शारीरतेचे प्रदर्शन डिकीला आवडत नाही. पण पोटासाठी या स्त्रियांना आपले शरीर विकावे लागते, हे वास्तव व सत्य डिकीला नाकारता येत नाही. तसेच लष्करी जीवन व त्यातील शिस्त म्हणजे डिकीला माणसातील माणूसपण नष्ट करणारी प्रक्रिया वाटते. माणसाला अमानुष बनविणारी, पशू बनविणारी, यंत्र बनविणारी यंत्रणा म्हणजे लष्कर वाटते. दिब्रूगडला आल्यावर रोज रात्री फिरायला जातो. तेव्हा त्याच्या मनात अनेक विचार येतात. देशाचे स्वातंत्र्य दिल्लीच्या लाल किल्ल्यावर फडफडत आहे. त्यांना गांधी, समाजवाद माहित नाही. ज्यांच्या रक्षणासाठी आपण आलो, त्यांचा आणि देशाचा संबंध काय? नाते काय? असा प्रश्न त्याला सतावत असतो.

डिकीचे फौजी जीवनातील प्रशिक्षण संपते. तो सुभेदार संगतरामला साध्या ड्रेसमध्ये सॅल्यूट करीत नाही. इथे पहिली ठिणगी पडते. म्हणजेच डिकी आता बंडाची तयारी करतो. हवालदार निरंतरन त्याला मेजर सेनच्या बंगल्यावर सामान पॅक करायला जायला सांगतो. पण डिकी त्या कामाला नकार देतो. 'तू-तू-मै-मै' होते. डिकीला याचा आनंद वाटतो. त्याचा उत्साह वाढतो. पण सुभेदार मणियार त्याची समजूत काढतो. डिकीला हा आपल्या आयूष्याचा टर्निंग पॉईंट वाटतो. पुढे बदली होऊन फौजी जीवनाचा तो त्याग करतो. लष्करी असऱ्याचा ज्या खाणाखूणा आहेत, त्यांनाही तो नदीत मूठमाती देतो. याबाबत डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, "शरीर - मन- समाज - व्यक्ती या आशय सूत्रांच्या पातळीवरील द्वंद्वांना 'रोबो' ने कथनात्मक संरचनेच्या पातळीवरही पेलून धरले आहे. आशयसूत्रे आणि संरचना यांच्यामधील या संबंधामुळे एक समग्रता म्हणून 'रोबो' विशेष अर्थपूर्ण झाली आहे." (पृ. ५६, मुक्त शब्द, जुलै २०१२) थोरात यांचे विधान अगदी रास्त वाटते.

शेवटी 'रोबो' मधील डिकीचे आस्तित्त्व असे विलक्षण आपल्याला दिसते. स्वतः दिनानाथ मनोहर म्हणतात, " 'रोबो' मधील व्यक्ती आणि अवस्था यातील जे नातं मी प्रतिकात्मक पातळीवर काहीशा बोल्ड स्ट्रोक्समध्ये रंगवल आहे, तेच नातं अजूनही बदललेल्या रुपात परंतु अधिक व्यामिश्रतेने, अधिक नागवेपणानं, अनुभवास येत असताना, ह्या सद्यकालीन वास्तवाच्या पाश्वर्भूमीवर. ह्या नात्याचा नव्यानं शोध घेणारं लिखाण करणे गरजेचे आहे." (पृ. ०५)

म्हणजेच मनोहर यांना डिकी अजूनही नव्या रुपात साकार झाला पाहिजे, असे वाटते.थोडक्यात 'मी' ला पारखा करणारा हा विलक्षण पिळदार अनुभव. त्याचं नाव आहे 'रोबो'. यातला मी वेगळा असेल, परिस्थिती वेगळी असेल, पण अनुभव मात्र सार्वत्रिक असेल या संवेदनाशून्य जगाचा, रोबोचा अगदी असाच.

## ३.४ संदर्भ

१)'पुन्हा रोबो' – मुक्त शब्द जुलै २०१३ – डॉ. हरिश्चंद्र थोरात.

२) दै. लोकमत – (नाशिक आवृत्ती) १३ मे २०१३.

३)'रोबो' – (तृ. आ.) जून २०१३ – दिनानाथ मनोहर.

❖❖❖❖

# ४. प्रवासवर्णन एक साहित्यप्रकार

# ४

# प्रवासवर्णन एक साहित्य प्रकार

## प्राचीन मराठीतील प्रवासवर्णन :
## प्राचीन मराठी साहित्यिकांची प्रवासविषयक भूमिका व दृष्टी

**घटक रचना :**

४.१ प्रस्तावना
४.२ महानुभावांची प्रमुख स्थळवर्णने
४.३ 'श्री ऋद्धिपूरवर्णन'
४.४ व्यक्तिमत्व : कवीचे व प्रदेशाचे
४.५ संतकवीच्या तीर्थयात्रा
४.६ रामदासांची 'भारतभ्रमंती'
४.७ दीन दत्तपदांकित मुकूंद कवीचे प्रवासवर्णन
४.८ निरंजन माधवाचे प्रवासवर्णन
४.९ प्रवास वर्णन एक वाङमय प्रकार
४.१० 'प्रवास' या गटकतत्त्वामुळे वेगळेपणा
४.११ प्रवासवर्णनातील काव्यात्मता व लालित्य
४.१२ प्रवासवर्णन : एक वेगळा वाङ्मयप्रकार
४.१३ 'प्रवासवर्णन' या वाङमय प्रकाराची प्रगल्भता
४.१४ 'प्रवासवर्णन' या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये
४.१५ मराठीतील प्रवास वर्णनाची परंपरा

## ४.१ प्रस्तावना

या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात डॉ. सुरेंद्र माथुर यांनी भारतीय साहित्यातील रेखाटलेली प्रवासपरंपरा इ.स.१२०० पर्यंत पाहता येते. ही परंपरा प्राचीन मराठी साहित्याच्या प्रारंभकाळाशी येऊन भिडणारीच आहे. आपल्या प्राचीन मराठी कवींच्या ज्ञानार्जनाचा एक भाग म्हणजे प्रवास होय. प्रवास करून सृष्टीतील विविध ज्ञान, मानवी स्वभाव व जीवनाचे, लोकांचे, समाजाचे निरीक्षण केल्यावर ग्रंथउद्दम करायचा हे ठरून गेल्यासारखे होते. महानुभावपंथाचा संस्थापक श्रीचक्रधर किती स्थळे फिरला हे 'स्थानपोथी' सांगते. नागदेवाचार्य, भास्करभट्ट बोरीकर यांची चरित्रे ब्रह्म जिज्ञासेकरता व आपली विद्वत्ता मिरवावी म्हणून प्रवास केल्याचे दर्शवितात. कवी मुकुंदराज भक्तांचे आर्त पुरविणयाकरता आंबेजोगाईस आल्याची कथा आहे. रवळो व्यासांचे 'सह्याद्रीवर्णन' आणि नारो व्यास बहाळिये यांचे 'ऋद्धिपूरवर्णन' हे दोन्ही ग्रंथ महानुभावांच्या प्रवासविषयक भूमिकेचे व विशाल दृष्टीचे स्वच्छ पुरावे आहेत, असे म्हणता येते.

संतकवींच्या तीर्थयांत्रांनी अध्यात्मप्रवण मनाच्या भुकेचे तर्पण केलेच, पण या पुरातन भारत देशाच्या वैश्विक संस्कृतीची गंगा राष्टपुरुषांच्या नसानसांतून खेळविली. नामदेव - ज्ञानेदवांनी केलेल्या तीर्थयात्रा याला प्रमाण म्हणून पुरे आहेत. संत रामदासांच्या चरित्रावरून त्यांच्या आयुष्याची बारा वर्षे म्हणजे पुरे एक तप या राष्ट्रपुरूषाच्या अवलोकनार्थ आणि सृष्टीचे अनुभवज्ञान गोळा करण्यात गेले. त्यामुळे अंगीकृत कार्याचा पाया भक्कम करण्यासाठी त्याची मदत झाली, याचाही पुरावा मिळतो.

पंडित कवींमध्ये वामन पंडित अध्यात्म प्रवण मनाच्या तृप्तीसाठी विजापूरच्या बादशाहाकडून बाटले जाऊ नये म्हणून तसेच विद्वत्तेच्या प्रदर्शनार्थ व विद्वतसभेमध्ये भाग घेण्यासाठी फिरले, असा पुरावा मिळतो. दत्तपंदाकित मुकुंद कवी व निरंजन माधव यांनी तर प्रत्यक्ष प्रवास केल्याचा व त्या आधारे ग्रंथलेखन घडल्याचा पुरावा स्पष्ट आहे. शाहीरकवींचा प्रवास कलगीतुऱ्यासाठी होणाऱ्या फडाच्या तमाशांसाठी होत असे. शाहीरकवींचे जीवन तमासगिरांचे जीवन असे तमासगिरांचे एक कुटुंबच असे ते कुटुंब कलंदर जीवन जगे, गावोगाव, भटके आणि कविता करून जीवनाचा ‘अर्थ’ मिळवी, याचे दाखले अनेक जागी मिळतात. शाहिरांच्या ‘स्थलवर्णनपर’ लावण्या याचा पुरावा आहेच. परंतु तंजावरचा राजा शरभेद्र उर्फ सरफोजी याच्या त्रिस्तळी यात्रेच्या लावण्या प्रवाससूत्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. या दृष्टीने आपला मराठी माणसाचा प्रवासप्रिय स्वभाव श्री. कालेलकरांनी वर्णन केला आहे. (पाहा-‘आपला स्वभाव ’, पान १, ‘हिमालयातील प्रवास’)

प्राचीन मराठी वाड्.मयाचे एक ख्यातनाम अभ्यासक, महाराष्ट्रभाषाभूषण श्री. ज. र. आजगावकर यांच्या खालील उद्‌गारांत आमच्या प्राचीन मराठी वाड्.मयसेवकांच्या प्रवासविषयक भूमिकेचे व दृष्टीचे दर्शन योग्य प्रकारे होत, व उद्‌धृत करणे आवश्यक वाटते ते म्हणतात :

“प्राचीन कवींचा व्यासंग मोठा जबर होता. आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या बहुतेक कवींच्या ग्रंथांचा अभ्यास ते लक्षपूर्वक करीत असत. तपच्या तपे अभ्यास करून, समकालीन थोर पुरूषांची दर्शने घेऊन, तीर्थयात्रेच्या निमित्ताने प्रवास करून, आणि तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचे सूक्ष्म दृष्टीने निरीक्षण करून बुद्धिप्रागल्भ्य संपादन केल्यावर ते कविता रचावयास बसत असत किंबहुना तशा स्थितीत त्यांचे उच्च मनोविकार इतक्या उत्कटत्वाने बाहेर पडत असत की, त्यांच्या तोंडून जे शब्द निघावे ते काव्यरूपानेच निघावे, असे होत असे.

`Poetry is a Spontaneoun overflow of powerful feelings. ‘

ही कवितेची व्याख्या, आमच्या बहुतेक जुन्या कवींच्या काव्यांस जी इतकी यथार्थत्वाने लावता येते, ह्याचे कारण हेच होय. ज्ञानदेव, नामदेव, मुक्तेश्र्वर, रामदास, जयराम, रंगनाथ, वामन, मोरोपंत, एकनाथ, कृष्णदयार्णव, सोहिरोबा, देवनाथ व अवचितसुत काशी या कवीनी बहुतेक सगळा हिंदुस्थान पाहिला होता, हे त्यांच्याच ग्रंथांवरून उघड होत आहे. ज्ञानदेव व नामदेव हे तीर्थयात्रेस गेले होते व त्या तीर्थयात्रेचे वर्णन नामदेवांच्या तीर्थावळीवरील अभंगात दिले आहे. मुक्तेश्वराने इंग्रज लोकांचे वर्णन आपल्या ग्रंथात दिले आहे. यावरून निदान सुरतेपर्यंत तरी त्याने प्रवास केला होता हे उघड होत आहे. जयराम व रंगनाथ हे तर हिमालयावरही जाऊन आले होते. वामन मोरोपंत, कृष्णदयार्णव व एकनाथ हे काशीस गेले होते.

यापैकी कृष्णदयार्णव कवीने तर इतके दिवस प्रवास केला होता की, तो प्रवास संपवून तो महाराष्टात आला, त्यावेळी राज्यक्रांतीमुळे महाराष्ट्राची स्थिती अगदी पालटून गेलेली त्याच्या दृष्टीस पडली व तशा प्रकारचे उद्‌गार त्याने आपल्या ग्रंथात काढले आहेत. सोहिरोबा राहणारे कोकणचे व देवनाथ वऱ्हाडात राहत होते. पण ते दोघेही ग्वाल्हेर येथे समाधिस्थ झाले, हे प्रसिद्धच आहे. अवचितसुत काशी तर 'दिल्लींद्राच्या बंधनापाशी' आपण सापडलो होतो हे स्वतःच आपल्या ग्रंथात सांगत आहेत. निरंजन माधव कवी तर पक्का राजकारणी असून त्याने कर्नाटकात प्रवास केला होता, हे त्याच्याच ग्रंथावरून सिद्ध होत आहे. राम जोशीबुवांनी संस्कृताचे अध्ययन केले ते कर्नाटकात केले व त्यांना पाचसहा भाषा उत्तम प्रकारे येत होत्या. एकंदरीत तात्पर्य काय की, जुने मराठी कवी चांगले विद्वान, व्यवहारचतुर, सदाचारी, प्रेमळ आणि हरिभक्त होत. व इतक्या सर्व गुणांचा त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणी ठसा उमटल्यामुळे ते काव्य सहजच निसर्गमनोहर उतरले आहे. शिवाय, त्यांचा अधिकार फार मोठा होता.'

('महाराष्ट्र कविचरित्रमाला' भाग १ ला, प्रस्तावना, पान ११-१२)

श्री. आजगावकर यांच्या वरील उताऱ्यात प्राचीन मराठी कवींना प्रवासाचे महत्त्व किती आणि कसे वाटत होते, याचे दर्शन सामग्र्याने होते. ही दृष्टी सिंधुबंदीच्या अनिष्ट चालीमुळे पुढे मावळत गेल्याचे दिसते.

दुसरी गोष्ट, ग्रंथलेखन करण्यासाठी ज्ञानार्जनाचे एक आवश्यक अंग म्हणून प्रवासाकडे पाहिले आहे. परंतु प्रवास हीच ग्रंथलेखनाची प्रेरणा झाल्याची उदाहरणे फारच थोडी सापडतात. प्रवासविषयक अनुभूती, जीवनसमृद्धी व जीवनानुभव व्यापक करीत असली तरी, व त्याचा अविष्कार अनेक ग्रंथांतून झाला असला तरी, निव्वळ 'प्रवासवर्णने' या संज्ञेला प्राप्त होणारे ग्रंथ त्यामानाने फारच दुर्मिळ असे हाताला लागतात. बऱ्याच ठिकाणी स्थलमहात्म्य कथन करावे, स्थळाशी निगडीत असलेल्या गोष्टी, व्यक्ती व तेथल्या देवदेवता यांची माहिती सांगावी हाच हेतू प्रधान आहे. या माहितीवरच लेखकांचे लक्ष केंद्रीभूत झाल्याने लेखकच हरवला आहे, असे दिसून येईल. याचे प्रमुख कारण प्रवासाची प्रमुख प्रेरणा धार्मिक किंवा आध्यात्मिक होती, किंबहुना "काव्य हे भक्तीचे, अध्यात्माचे अथवा नीतिशिक्षणाचे साधन होय, हीच जुन्या कवितेची बव्हंशी दृष्टी होती. (रा. श्री. जोग, 'अर्वाचीने मराठी काव्य,' 'दु. आ., प्रस्तावना, पान २४-२५) त्यामुळे प्राचीन लेखन सर्वसामान्यपणे साहित्याकडे भक्तीचे, धर्माचे वा अध्यात्माचे एक साधन म्हणून पाहत होते हे जसे खरे आहे, तसेच बरेच प्राचीन मराठी साहित्य धर्मपंथांच्या आश्रयाने वाढले आहे, ही गोष्ट निर्विवाद होय. उदाहरणार्थ, मुकुंदराजांपासून सुरू होणारी प्राचीन साहित्याची परंपरा नाथपंथ, महानुभावपंथ, भागवतसंप्रदाय, दत्तसंप्रदाय,चैतन्य, महाराष्ट्रधर्म, शैव, शाक्त, जैन, सुफीपंथ इत्यादी अनेक धर्मपंथाच्या आश्रयाने वाटचाल करीत राहिली. या धर्मपंथांच्या प्रवर्तकांनी आपला धर्मसंप्रदाय वाढीस लागण्याच्या दृष्टीने, सर्वसामान्य जनात त्यांचा प्रसार होण्याच्या दृष्टीने आणि 'इये मराठीचिये नगरी बह्मविधेचा सुकाळु' करावा म्हणून मराठी भाषेचा आश्रय केला आणि मराठीला अमृताचे बोल बोलायला लावले. पंडितकवींचा अपवाद वगळता केवळ 'काव्याकरता काव्य' ही भूमिका विरळ आहे.

प्राचीन मराठी साहित्याच्या प्रांरभापासून तो इ.स. १८०० पर्यत सुमारे सहाशे वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडात जे मराठी साहित्य निर्माण झाले, त्यात १) महानुभावपंथाचे लेखक, २) संतकवी, ३) पंडितकवीं, ४) शाहिरकवी, ५) बखरकार, ६) पत्रलेखन करणारे समाजकारणी

व राजकारणी धुरंधर अशा प्रकारचे लेखक येतात. सर्वसामान्यपणे संख्येच्या व गुणवत्तेच्या दृष्टीने पद्याचे दालन, समृद्ध परंपरा अभिमानास्पद आहे. गद्यशाखा गुणवान असली तरी उपलब्ध गद्यग्रंथ संख्येने कमी आहेत. गद्यलेखकांपेक्षा कवींची परंपरा मोठी आहे. प्राचीन पद्याची वा काव्याची वाढ होण्याचे प्रमुख कारण प्रतिभाशाली कवींची अविच्छिन्न परंपरा ( पाहा. गं. बा. सरदार, 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपिठीका' दु. आ., सामान्य निरूपण, पान १/२ ) आणि मुद्रणकलेचा अभाव. गद्द व्यवहारापुरता, शिवाय पद्द स्मरणात राहवयास सोयीचे. तत्कालीन समाजात, लेखनकलेचा व विद्येचा आश्रय करायचा तर तो समाजल्या मोजक्या लोकांनी सर्वसामान्याला विद्येचा वा लेखनकलेचा स्पर्श नाही असे चित्र दिसून येते. विद्यादान व पाठशाळांची वाढ हा इंग्रजी संस्कृतीने देलेला धडा आहे. तो इ.स. १८१८ नंतर पेशवाई बुडाल्यावर होय.

तेव्हा प्रारंभकालापासून तो इ. स. १८०० पर्यत म्हणजे मुद्रणकलेचा भारतात अवतार होईपर्यंत खालील काही थोडे ग्रंथ प्रवासग्रंथसदृश म्हणून दाखविता येतील.

अ)

(१) ऋद्धिपूरमहत्म्य - महेश्वर पंडित शके १२२४
(२) सह्याद्रिवर्णन अथवा सह्याद्रिमहात्म्य रवळो व्यास उर्फ राघवो पाध्ये, शके १२५४
(३) ऋद्धिपूरवर्णन - नारायण व्यास बहाळिये शके, १२८५
(४) ऋदद्धिपूरमहात्म्य - कृष्णमुनि विराटदेशे किंवा कवी डिंभ १६ वे शतक
(५) प्रतिष्ठानवर्णन - नागराज किंवा नागेन्द्रकृत.

आ)

(६) संतकवींच्या तीर्थयात्रा - (क) यात नामदेवांची तीर्थवळी प्रमुख (ख) एकनाथ, रामदास यांच्या तीर्थयात्रा

(७) दत्तपदांकित मुकुंद कवीचे प्रवासवर्णन शके १६०५ ते १६६२

(८) निरंजन माधवाचे प्रवासवर्णन

(९) सामराजाचे मुद्‌गलाख्यानातील - तीर्थयात्रा प्रकरण

(१०) चंद्रात्मज रूद्र यांचे गोकर्णमहात्म्य

(११) तंजावरच्या रंगनाथ कवीचे कावेरीमाहीत्म्य

(१२) समर्थशिष्यविरिधरस्वामी बीडकर - काशीयात्राकथन प्रकरण

(१३) कविवर्य मोरोपंतांच्या 'गंगास्तव'

(१४) 'त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या' - तंजावरचे दुसरे राजे 'सरफोजी यांच्या

(१५) स्थळांची माहिती देणाऱ्या बखरी : (क) 'महिकावतीची बख्रर' (ख) 'रालिकोटची बखर' (ग) 'महाबळेश्वरची जुनी माहिती' (घ) 'चेऊलची बखर', (च) 'साष्टीची बखर', यांपैकी काही ग्रंथ आहेत. काही नुसती प्रकरणे आहेत त्यांच्या नावारून त्यांचा आशय स्पष्ट होतो. अधिक कल्पना यावी म्हणून प्रथम महानुभावांच्या काही प्रमुख ग्रंथांकडे वळू.

## ४.२ महानुभावांची प्रमुख स्थळवर्णने

उपलब्ध साहित्यकृतींमध्ये (महेश्वर पंडिताचे 'ऋद्धिपूरमहात्म्य', (२) रवळो व्यासकृत सह्याद्रीवर्णन, (३) नारायणा व्यास बहाळियेकृत 'ऋद्धिपुरवर्णन', (४) कृष्णमुनि विराटदेशे किंवा डिंभकृत 'प्रतिष्ठानवर्णन' ही महानुभावांची प्रमुख स्थळवर्णने मानण्यात येतात. नावावरून त्या त्या स्थळाची प्रतिष्ठा मिरण्याच्या हेतूने कवींनी ती लिहिल्याचे स्पष्ट व्हावे आणि म्हणून त्यांना स्थळवर्णने म्हटली गेली आहेत. परंतु खऱ्या अर्थाने ही स्थळवर्णने होऊ शकतातच असे नाही. आणि या प्रश्नाचे उत्तर आपल्याला त्यांचा थोडक्यात परिचय करून घेतल्यास मिळू शकते.

महेश्वर पंडितांचे 'ऋद्धिपूरमाहात्म्य' हा ग्रंथ महानुभाव पंथाचे प्रथमाचार्य नागदेवाचार्य यांचा पुत्र महेश्वर पंडित याने रचला आहे. या ग्रंथाचा रचनाकाल शके १२२४ मानला जातो. ग्रंथ पद्य असून ओवीबद्ध आहे. एकंदर ९ प्रसंगांमध्ये कवीने आपले काव्य रचले आहे. ग्रंथांची संख्या ८२७ असून "ग्रंथाचा तोंडवळा स्थूलमानाने महानुभावांच्या साती ग्रंथांसारखाच आहे" असा अभिप्राय प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी व्यक्त केला आहे. म्हणजेच महनुभावांच्या पारंपरिक वर्णनशैलीने लिहिलेल्या या ग्रंथात, ग्रंथकर्त्या वडील व दीक्षागुरू नागदेवाचार्य, श्रीगोविंदप्रभु व श्रीचक्रधर यांची वर्णने महत्त्वाची ठरू पाहतात. हे नुसते ऋद्धिपूरवर्णन नाही, तर त्याबरोबरच नागदेवाचार्य, महानुभावपंथाचे मूळ पुरूष श्रीगोविंदप्रभु व पंथसंस्थापक श्रीचक्रधर यांची व्यक्तिवर्णनेही यामध्ये येतात. मंगलाचरणाच्या ओव्यांनी या काव्याला जशी विशेष शोभा प्राप्त झाली आहे. तशीच कवीने आपल्या रंकवृत्तीचे ग्रंथाच्या शेवटी जे प्रदर्शन केले आहे, तिथे त्याचा विनय, श्रोत्यांविषयीचा आदर व्यक्त होतो. वत्सल व करूण रसाच्या छटा यात व्यक्त होतातच, पण त्याबरोबर ज्ञानदेवांच्या शैलीशी त्याचे सादृश्यही आढळते.

अखंड 'ऋद्धिपूरमहात्म्य' धार्मिक भावनेने रचलेले असून त्याचा मुख्य रस भक्ती हा आहे. 'ऋद्धिपूर' ही महानुभावांची जणू काशी असून भागवत धार्मियांचे जसे पंढरपूर, तसे महानुभावांचे ऋद्धिपूर! किंबहुना ऋद्धिपूर म्हणजे त्यांचे 'परमेश्वरपूर' च होय.

"महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी श्रीगोविंदप्रभु यांचे अवतार कार्य रिधपुरात झाले. श्रीचक्रधर स्वामींनी त्यांच्याकडून ज्ञानशक्तीचा स्वीकार केला ती महत्त्वपूर्ण घटनाही येथेच घडली आणि शेवटी श्रीचक्रधरांच्या पश्चात पंथाचे पाहिले आचार्य श्रीनागदेव किंवा भटोबास आपल्या परिवारासह रिधपूरला येऊन राहिले व तेथूनच त्यांनी आपल्या पंथाचा प्रसार सर्वदूर केला." (शं. गो. तुळतळे, संपा. 'श्रीऋद्धिपूरवर्णन' प. आ. , प्रस्तावना पान ८)

"अशा या परमेश्वरपुराची प्रतिष्ठा मिरविणारी एकूण सुमारे दहा काव्ये अभ्यासकांनी नोंद केलेली सापडतात." (शं. गो. तुळतुळे, संपा. 'श्रीऋद्धिपूरवर्णन' प. अ., प्रस्तावना पान ८-९) उदाहरणार्थ, (१) 'ऋद्धिपुरीचे श्लोक' (भास्कर कवीकृत), (२) 'श्रीऋद्धिपूरवर्णन' (नारायण व्यास बहाळिये), (३) 'श्रीऋद्धिपूरचरित्र' किंवा 'श्रीगांविंदप्रभुचरित्र' (म्हाइंभटकृत), (४) 'ऋद्धिपूरमहात्म्य' (महेश्वर पंडितकृत), (५) 'ऋद्धिपूरमहात्म्य' ('भिष्माचार्यकृत ' ?) (६) 'स्थानपोथी' (बाईदेवबास व मुनिव्यास कोठी : संस्करण चिरडे महानुभाव - अनुपलब्ध), (७) 'ऋद्धिपूरमहात्म्य' (कृष्णमुनिविरचित) व त्याचा आधारभूत संस्कृत ग्रंथ (८) 'हेतुस्थळ' (न्यायबासकृत), (९) 'वस्तू - चंद्रिकास्थळ' (गोपीभास्करकृत), (१०) 'तीर्थमालिका' - (शारंगधर भोजनेकृत).

या ग्रंथाबद्दल तुळपुळे म्हणतात, "वरील दहा ग्रंथापैकी काही ग्रंथ सध्या अनुपलब्ध आहेत. व काहीच्या अस्तित्वासंबंधी शंका वाटते. (उदा. 'ऋद्धिपूरचे श्लोक' किंवा भीष्माचार्याच्या नावावर असलेले 'ऋद्धिपूरमहात्म्य') काही केवळ यादीवजा किंवा टिपणवजा असून ते संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त असले तरी त्यांचे स्वरूप एकंदरी फारच मर्यादित आहे. (उदा. 'स्थानपोथी' किंवा 'तीर्थमालिका) (तत्रैव, पाने ९-१०)'.

डॉ. तुळपुळे यांच्या विधानातील तात्पर्य लक्षात घेता 'ऋद्धिपूरमहात्म्य' हा महेश्वर पंडिताचा ग्रंथ व इतर ग्रंथ फारसे महत्त्वाचे ठरत नाहीत ते पारंपरिक वृत्तीतून लिहिलेले व स्थळाहून पारंपरिकरित्या व्यक्तिदर्शन रंगविणारे वाटतात. लेखक पंथीय दडपणाखाली लिहित असल्याने ग्रंथांना एक प्रकारच्या मर्यादा पडल्या आहेत. त्यामुळे व्यक्तिवर्णनपर ग्रंथ असे त्यांचे स्वरूप होते.

महानुभावांच्या 'साती-ग्रंथातील वर नमूद केलेले 'सहयाद्रिवर्णन हे रवळोबासाचे पुस्तक, डॉ. कोलते यांनी संपादित केले आहे. हा ग्रंथ महानुभावांच्या दत्तसंप्रदायाचा पहिला ग्रंथ आहे. महानुभावांचा हा दत्तसंप्रदाय महाराष्टातील दत्तभक्तीचे प्राचीनंतर स्वरूप दर्शवितो. ग्रंथ ओवीबद्ध असून साती - ग्रंथांतील आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिरवितो. हा ग्रंथ सूक्ष्म रीतीने अभ्यासल्यास एकाच वेळी तो (१) व्यक्तिवर्णने करणारा (उदाहरणार्थ, चक्रधराचे वर्णन व महात्म्य प्रभावी ठरते. त्या अनुषंगाने अनुग्रहाचे वर्णन येते.), (२) दत्तात्रेयाची लीळाचरित्रे सांगणारा (केवळ १६८ ओव्या याकरता आलेल्या दिसतात), (३) त्या अनुरोधाने मातापुर अथवा माहुर येथील सह्याचे व तेथील स्थानांचे वर्णन करणारा हा ग्रंथ आहे. यात १५२ ते १८० म्हणजे अवघ्या २८ ओव्यांत हे स्थळवर्णन येते. (४) कवीचे आत्मनिवेदन, स्वोद्धारार्थ तळमळ व्यक्त करणारा इत्यादी विषयांनी व्यापलेला हा ग्रंथ एकूण ५१७ ओव्यांचा दीर्घ काव्यरूप ग्रंथ आहे. या ग्रंथाचे नाव जरी 'सहयाद्रीवर्णन' हे असले तरी त्यात सहयाद्रीवर्णनासाठी फक्त २८ ओव्याच वाट्याला आल्या आहेत. दत्तसंप्रदायाचा पहिला ग्रंथ असला तरी दत्ताच्या लीळा व चरित्र १६८ ओव्यांत संपते. राहिलेला सर्व भाग कवीने श्रीचक्रधरस्वामींच्या वर्णनाला वाहिलेला आहे. तेव्हा साहजिकच प्रश्न असा पडतो की,'काव्याचा मुख्य विषय कोणता'? श्री दत्तात्रेय की श्रीचक्रधर?'तया श्रीचक्रपाणीचेन वरप्रसादे मी करीन मूर्तिलीळावर्णन श्रीदत्तात्रेयाचे'. असे कवी म्हणतो. (५) तुमचेनि प्रसादे पवित्रे : बोलैन श्रीद्त्ताची चरित्रे' (२०) असे कतीने आरंभी वारंवार म्हटले तरी, काव्याचा अधिकांश भाग त्याने उपसंहारात लिहिलेल्या खालील एका ओवीचा खूप उपयोग होतो. श्रीचक्रधरस्वामींची प्रार्थना करीत असताना तो म्हणतो -

"आडौ करूनि सैहयाद्रीचे । माहात्म्म बोलिलें अल्प वाचे ।
तेविचि अन्मोदन केले दोषांचे । अनुभवरूपा " ।। ५०६।।

डॉ. कोलते यांनी दिलेल्या अर्थावरून सह्याद्रीवर्णनात कवीला प्रामुख्याने परमेश्वराचे म्हणजे श्रीचक्रधराचे माहात्म्य वर्णन करावयाचे आहे आणि त्याबरोबर आपल्या दोषांचा पाढा वाचावयाचा, हे स्पष्ट आहे. या दोन्ही गोष्टी त्याने या ग्रंथात साधल्या आहेत हे स्पष्ट होय. म्हणूनच, हा ग्रंथ स्थलवर्णवपर नसून व्यक्तिवर्णनपर आहे यात संशय नाही.

या ग्रंथाचा पूर्वार्ध फारसा सरस नाही. उत्तरार्ध सरस आहे. त्यात आर्त भक्ताची तळमळ व्यक्त होते. आपण पतित आहोत, परित्यक्त आहोत, आपणाला परमेश्वरप्राप्ती व्हावी, त्याच्या गुणवर्णनात व श्रवणात आपले जीवन व्यतित व्हावे, असे कवी म्हणतो. (ओवी ९, १०)

म्हणून या कव्याची प्रमुख प्रेरणा भक्तीची. प्रमुख रस भक्ती. आर्त भक्ताचे व्यक्तिमत्त्व लक्षणीय. काव्य व्यक्तिदर्शनावर भर देणारे आहे. प्रवाससूत्राच्या अनुरोधाने कवी आणि 'सह्याद्री' चा स्थळप्रदेश दिसत नसल्याने तो प्रवासवर्णन ठरत नाही हे निश्चित होय.

## ४.३ 'श्रीऋद्धिपूरवर्णन'

महानुभावांच्या एकंदर साहित्यसंपदेत आपल्या प्रतिभाधर्माने व पृथगत्मतेने जे ग्रंथ मिरवितात, त्यात नारायण व्यास बहाळिय कृत 'श्रीऋद्धिपूरवर्णना' चा क्रम बराच वरचा लागेल. "ते जसे समविषय काव्यांत सर्वश्रेष्ठ आहे, तसेच महानुभावांच्या 'सातीग्रंथा' मध्येही त्याचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे, असे प्रा. डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात ते खरे आहे. (प्रस्तावना, पान १३) या ग्रंथाच्या वाड्.मयीन वैशिट्यांचा खालीलप्रमाणे थोडक्यात परामर्श घेता येईल : (१) हा ग्रंथ एक सलग दीघेकाव्य आहे. ते ओवीबद्ध असून एकूण ओव्या ६४१ किंवा ६४२ आहेत. (२) या काव्याची मागाहून कोणीतरी ४१ प्रकरणांत विभागणी केली आहे आणि ही विभागणी करणाऱ्याने, प्रकारणांना त्यातील आशयानुसार मथळेही दिलेले दिसतात. उदाहरणार्थ, प्रकरण १ - 'परावाचा महत्त्व' (ओव्या ३ ), प्रकरण २ - 'कृपामहत्त्व' (ओव्या ४) इत्यादी. (३) हे काव्य कवीने प्रत्यक्ष ऋद्धिपूरला जाऊन म्हणजे प्रवास करूनच लिहिले आहे. उदारहरणार्थ, "सासुररवासे सीन्नलीः तीये जेवि भेटे माऊली : आसो हें तैसीं परि जाली । श्री ऋद्धिपूर देखले या ।।" (ओवी ४८) असे कवी म्हणतो. (४) विशेष अपूर्वाईची गोष्ट म्हणजे, या काव्यात कवी स्वतः आणि ऋद्धिपुर येथील प्रदेश व परिसर या दोघांचेही एकात्म दर्शन जागोजाग होत. म्हणजेच कवीचे आत्मनिवेदन आणि कवीने भेट दिलेले स्थळ व तेथील वर्ण्यवस्तू या काव्यात बऱ्याच प्रमाणात एकजीव होऊन.

अवतरतात, असे म्हणता येईल. मुळात कवी ऋद्धिपूरकडे एका आर्त भक्ताच्या भावनेने वळला आहे. आम्हास महत्त्वाचे वाटते ते हे की, एका आर्त भक्ताच्या भूमिकेबरोबर कवी प्रवासी भूमिका व्यक्त करतो याचे. कवी ऋद्धिपूरपरिसरातील मंदिरे, तेथील एकंदर वातावरण, तेथील वृक्ष, सरोवरे, नगर, तिथले मठ, रायांगण, पटिशाळा, भीतभंग, उंबरवट, खांब, ओटा, मर्दनास्थान, आरोगणास्थान इत्यादी स्थांनांचे, त्या स्थानात शिरून त्यांच्याशी एकजीव होऊन वर्णन करतो. स्थळाशी किंवा प्रदेशाशी एकजीव होऊन त्याबद्धलची प्रतिक्रिया सलगपणे व तात्काळ वर्णन करणे या ठिकाणी घडते आहे. हे अर्थातच योजून घडलेले नाही. घडत नाही. अगदी स्वाभाविकरित्या घडून गेले आहे. त्यामुळे 'ऋद्धिपूरवर्णन' हे प्रवासवर्णनही ठरू शकेल असे आम्हांस वाटते. कारण प्रवाससूत्राच्या अनुरोधाने या ठिकाणी व्यक्तिमत्तवाचा आणि एकप्रकारे 'ऋद्धिपूर' ह्या प्रदेशाच्या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार या कव्यात स्पष्टपणे घडतात दिसतो.

## ४.४ व्यक्तिमत्व : कवीचे व प्रदेशाचे

कवीचे व्यक्तिमत्त्व या ग्रंथात सारीकडेच प्रत्ययाला आले, तरी खालील ओव्यांमधून त्याचा विशेष प्रत्यय यावा. 'ग्रंथकर्ता स्वात्मनिरोपण' (ओव्या ३१ ते ४३) 'स्तावकात्मनिवेदन' (ओव्या १६१ ते १८१), 'स्तावकरंकवृत्ति' (ओव्या २२१ ते २२६), 'जीवेश्वर भिन्नत्वदर्शक' (ओव्या २८४ ते २९२), 'आत्मनिर्वेद संवादभूत' (आोव्या २९४ ते ३५०).

तसेच प्रदेशाचे व्यक्तिमत्त्व दर्शविणाऱ्या काही खास ओव्या 'ऋद्धिपूरमहात्मय' (ओव्या ४४ ते ५७), 'बाह्यप्रदेशवर्णन (ओव्या ५८ ते ७०) ' 'बाह्यप्रदेश वृक्षादि महिमा' (ओव्या ७१ ते ८३), 'देऊळे वर्णन' (ओव्या ८४ ते ९०), 'सरोवरवर्णन' (ओव्या ९१ ते १०१), 'नगरप्रवेशवर्णन' (ओव्या १०२ ते १२०), 'तीनि मठांचे स्तवन' (आेव्या १२१ ते १२७), 'रायांगणस्तव' (आेव्या २०१ ते २०५), 'केवळ राजमढस्व' (ओव्या २२७ ते २४५), 'राजमढ पटिशाळेचे खांबवर्णन' (ओव्या ३५१ ते ३५५), 'भीतभंगवर्णन' (ओव्या ३५६ ते ३६१), 'राजमढद्वारवर्णन' (ओव्या ३६२ ते ३६९), 'उंबरवटवर्णन' (ओव्या ३७० ते ३७५), 'राजमढप्रवेश' (ओव्या ३७६ ते ४२२), 'भीतभंगवर्णन' (ओव्या ४२३ ते ४३६), 'देवळामधील खांबवर्णन' (ओव्या ४३७ ते ४३९), 'ओटावर्णन' (ओव्या ४५० ते ४५५), 'मर्दनास्थान' (ओव्या ४५६ ते ४८९), 'आरोगणास्थान' (ओव्या ४९० ते ५०४).

उपरोक्त उदाहरणांच्या आधारे, आपल्याला असे सहज दिसून येते की, ऋद्धिपूरवर्णनाच्या परिसराशी, तिथल्या वस्तूमात्राशी कवी अगदी एकजीव होऊन गेला आहे आणि त्यातून एका आर्त भक्ताचे विलोभनीय चित्र साकारले आहे. इतकी सरसता, कल्पकता व प्रवासवर्णनाकडे अभावित रीतीने वळण्याचा गुण दर्शविणारे काव्य दुसरे क्वचितच सापडते.

अभावितपणे म्हणायचे कारण, आपण प्रवासवर्णन लिहित आहोत या अर्वाचीन भूमिकेतून कवी ते लिहित नाही. तर मूळ धार्मिक व अध्यात्मिक भूमिकेतून तो लिहीत आहे. आपल्या पूर्वायुष्यात केलेल्या पापाचा व कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन कवी महानुभाव पंथात आला आहे. त्याच्या भक्तिप्रवण मनाची  तृप्ती व शांती त्याला तेथे प्राप्त झाली आहे. आणि एके दिवशी 'ज्ञानप्रबोध' कार विश्वनाथबास बाळापूरकर या मित्राला त्याच्या कवित्वशक्तिचा प्रत्यय येऊन त्याने महानुभावपंथातील 'काही स्वामींची स्तुतपूर्वक कवित्व करण्याविषयी सूचना केली. एकमेकांना हीच सूचना त्या दोघांनी केल्याने विश्वनाथबास बाळापूरकर याने 'ज्ञानप्रबोध' नावाचा 'साती - ग्रंथा' तील आपला ग्रंथ रचला. आणि नारायणबासाने हे 'ऋद्धिपूरवर्णन रचले आहे. डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात. त्याप्रमाणे "नारोबासाने हे काव्य 'ज्ञानप्रबोध'कार विश्वनाथभासाच्या प्रेरणेने लिहिले' म्हणजे, प्राचीन मराठी वाड.मयातील हे पहिले प्रवासवर्णन मानल्यास ते एका मित्राच्या प्रेरणेतून लिहिले गेले आहे असेच म्हणावे लागेल. वाड.मयसृष्टीत अभावितपणे घडणाऱ्या अशा गोष्टींना खूप महत्त्व असते.

ऋद्धिपूरवर्णनाच्या आणखी अनेक वैशिष्टयांत कवीची स्वतंत्र प्रतिभाशक्ती व तिची मौलिकता डॉ. तुळपुळे, प्रा. रा. श्री जोग, डॉ. अ. ना. देशपांडे इत्यादी मान्यावर संशोधकांनी मान्य केली आहे. उदाहरणार्थ, डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात, "या काव्यातील प्रत्येक वर्णन भावना व कल्पना, रस आणि अलंकार यांच्या जोडण्यावर आधारलेले आहे." .....

"नारायण कवीचा हा काव्यग्रंथ एकाच वेळी आत्मपर व वस्तूपर वाटतो..."

आत्मपरतेचे अधिष्ठान, त्यातून स्फुरलेली भावनिष्ठ स्थलवर्णने, त्यांना मधूनच दिलेली तात्त्विक विचारांची डब व पाश्वर्भूमीप्रमाणे साद्धंत उभी केलेली श्रीगोविंदप्रभूंची मुर्ती ह्यामुळे ऋद्धिपूरवरील सर्व काव्यांत प्रस्तुत काव्य आपल्या निराळेपणाने उठून दिसते....."

प्रा. रा. श्री. जोगांनी आपल्या 'मराठी वाड्.मयाभिरूचीचे विहंगमावलोकन ' करताना, पान नं. ५९-६० वर, या काव्याबद्दल अभिप्राय दिला आहे. आणि त्यातील 'अलंकारिता' हा

गुणविशेष 'राजमठ' च्या द्वाराच्या वर्णनाने सिद्ध केलेला आहे. हे उत्प्रेक्षामय वर्णन म्हणजे वस्तूचे वा स्थलाचे कल्पनीय रूप आहे. असा अभिप्राय ते देतात आणि म्हणतात, "स्थलवर्णनापेक्षा कल्पनाविलासाचाच भाग त्यामध्ये फार आहे आणि या कलप्नाविलासाला अध्यात्माचे अधिष्ठान आहे..." पुढे त्यांनी म्हटले आहे, ऋद्धिपूरवर्णनाकडे कवी नारायण व्यास हे स्थलवर्णन या दृष्टीने पाहतच नाहीत, काव्य म्हणून पाहतात... आणि 'तरीही आलंकारेविण । न मिरवे काव्यलक्षण ... ' अशी त्यांची कल्पना आहे. ..

"स्थलवर्णन असल्याने रसांचा परिपोष करणे अथवा होणे शक्य नव्हते. तेव्हा आलंकारिक वर्णनावरच भर देणे भाग होते... व वर्णनास काव्य म्हणावयाचे झाल्यास केवळ ह्याच अर्थाने म्हणता येईल," असे प्रा. जोगांचे थोडक्यात म्हणणे आहे.

वस्तुतः काव्यामधील अलंकरण हे सौंदर्य निर्माण करतात. या काव्यात अलंकरण बऱ्याच प्रमाणात आहे, यात वाद नाही. परंतू कवीचे व्यक्तिमत्त्व या स्थळपरिसराशी व तेथल्या प्रदेशाशी एकजीव होऊन आल्याने स्थल व कवी यांचे स्वच्छ प्रतिबिंब पडल्याने, आम्हास ते काव्य वाटते. शिवाय, या काव्यात भक्ति, करूण व वत्सल या रसांचा परिपोष साधल्याचा प्रत्ययही येऊन जातो. कवीच श्रद्धाभाव स्थळाशी निगडित झाल्याने हे सर्व घडले आहे. असेच म्हणावयास हवे. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी जोगांच्या उपरोक्त मताचा परामर्श घेऊन म्हटले आहे. "नरेंद्र, भास्कराप्रमाणे रस आणि त्यापासून साधलेले शब्द यांचा नारायण पंडितांनी आपल्या प्रबंधात घोळ घातलेला नसला तरीपण त्यांचा प्रबंध मात्र भावपूर्ण व रसमय उतरलेला आहे. कारण त्यांच्या अंतःकरणात रस आहे, उत्कट भाव आहे आणि तोच त्यांच्या प्रबंधात सर्वत्र अखंड अवतरला आहे!" (प्रा. म. वा. इ. खंड. पहिला, पान ४८७)

"... या प्रबंधात वस्तुनिष्ठा आणि आत्मानिष्ठा आणि यांचा सुंदर संगम सहज साधलेला" अशी कबुली डॉ. देशपांडे यांनी प्रारंभीच दिली आहे, ती लक्षणीय आहे.

तेव्हा या सर्व मान्यवर अभ्यासकांची या ग्रंथाबद्दलची विविध मते लक्षात घेता, "प्राचीन मराठी वाड्.मयातील, महानुभावपंथाच्या 'साती-ग्रंथा तील ऋद्धिपूर वर्णन' हे काव्य मराठी भाषेतील पहिले प्रवासवर्णन ठरू शकेल, " असे वाटते.

## ४.५ संतकवींच्या तीर्थयात्रा

संतकवीच्या तीर्थयात्रा प्रामुख्याने 'तीर्थमिसें केला जाणारा उद्धार' या परिसा भागवतांच्या उक्तीप्रमाणे वा 'नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।' या नामदेवांच्या उक्तीप्रमाणे किंवा 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक' अशा जगत्कल्याणाच्या भूमिकेले या दृष्टीने झाल्या आहेत. संत ही मानवतेची चालती - बोलती सजीव प्रतीके होती. 'विष्णुमय जग' मानणाऱ्या यांच्या डोळ्यांना आपपर भाव माहीत नव्हता. यांच्या तीर्थयात्रा म्हणजे केवळ सदाचरणाचे प्रत्यक्ष धडेच होते, असे महाराष्ट्र सारस्वतकारांनी म्हटले आहे ते सत्य होय.

या भूमिकेतून ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व रामदास या प्रमुख संतांनी भारतभर प्रवास केल्याचा पुरावा 'माहाराष्ट्र सारस्वता'वरून मिळतो. पण या तीर्थयात्रांची प्रकरणवजा वर्णने फक्त

नामदेव व रामदास यांचीच प्रसिद्ध आहेत. आणि त्या दृष्टीने या प्रवासामागील योजकता श्री समर्थांची अधिक नामदेवांची पहिली तीर्थयात्रा घडली ज्ञानदेवांमुळे. पण नंतरही नामदेव आपल्या उत्तर आयुष्यात पंजाबात वीस वर्षे जाऊन राहिल्याचा पुरावा त्यांचे अभ्यासक दाखल करतात. उदाहरणार्थ. खालील संशोधकांची मते याचा पुरावा म्हणून दाखल करता येतील.

१) "पंढरपूरच्या भक्तिमार्गाची लाट त्यांनी थेट पंजाबात नेऊन पोचविली आणि त्यातूनच पुढे रामानंद, कबीर, नाना, रैदास, पीपा इत्यादी संत निर्माण झाले." ('पाच संत कवी', डॉ. शं. गो. तुळपुळे, दु. आ., नामदेव प्रकरण, समारोप, पान १९१)

२) "महाराष्ट्राबाहेर जाऊन मराठी दैवातांची व मराठी भाषेची कीर्ती तिकडे पसरविणारे नामदेव हे पाहिलेच संत आहेत." ('प्राचीन मराठी साहित्य संशोधन। ले. वि. भि. कोलते. प. अ., प्र. ५, पान ८८)'

३) "दूरवर प्रवास करून विठ्ठलभक्तीचा प्रसार करणारे नामदेव हे पहिले संत होते. सौराष्ट्र राजपुताना, पंजाब, काशी वगैरे भागांत त्यांनी नाममहिमा गाऊन भक्तीचा प्रसार केला. ही त्यांची कामगिरी अतुलनीय आहे." (श्रीनामदेवदर्शन' शारदा गो. देशमुख, प. आ., नामदेवांचे तीर्थाटन प्र. ११. पान १३४)

नामदेवांच्या तीर्थयात्रांची दोन प्रकरणे उपलब्ध आहेत. परंतू ज्ञानदेवांच्या समवेत त्यांनी जो प्रवास केला, त्यांचे त्यांनी 'तीर्थावळी' (या ज्ञानदेवांच्या चरित्रपर प्रकरणाशी निगडित असलेल्या) प्रकरणाचा कालानुक्रमे विचार करणे उचित आहे असे वाटते. दुसरे तीर्थयात्रा प्रकरण प्रसतूत लेखकाला उपलब्ध झाले नाही. त्यामुळे त्याचा विचार प्रामुख्याने केला आहेच असे नाही. या ठिकाणी विचारात घेतलेली नामदेवांची 'तीर्थावळी' 'श्री सकलसंतगाथा' खंड पहिला संपादक - काशिनाथ अनंत जोशी, पान नं. १३६ ते १५७ वर छापलेली आहे. 'तीर्थवळी' असे नाव असलेले हे अभंगमय प्रकरण ९१६ ते ९७६ म्हणजे ६१ अभंगाचे आहे. या प्रकरणाचा थोडा सूक्ष्म विचार केल्यास त्याचे पाहिले वैशिष्टय असे की ते अभंगमय आहे. दुसरे म्हणजे ही 'तीर्थवळी' ज्ञानदेव व नामदेव यांच्या चिरित्रावर प्रकाश टाकणारी आहे. ती ज्ञानदेव, नामदेव व इतर संत यांची आदर्श भक्त म्हणून, विनयी संत व मित्र म्हणून व्यक्तिचित्रे रंगवते. उदाहरणार्थ,

"नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटागणा घातले नामदेवे
देऊनी आलिंगन प्रीतीच्या पडिभारें । पूजिलें आदरें यथविंधी ।।"

तशीच श्री विठ्ठल व रूक्मिणी यांचीही माणसासरखी चालती-बोलती शब्दचित्रे यात येतात. या दृष्टीने 'तीर्थावळी' प्रकरण एक अद्‌भुताचा आश्रय करणारे प्रकरण आहे. कारण या 'तीर्थावळी' त प्रत्यक्ष विठ्ठल देवच हाडामासाच्या माणसासारखा आपल्या दोन्ही स्त्रियांबरोबर वावरताना दिसतो.

तीर्थयात्रा करू या म्हणून ज्ञानदेव नामदेवांना सांगताहेत. का ? तर हेतू
"क्षण एक एकांती बैसोनी सहज । अंतरीचे गुज बोलो काही ।।
जीवनमुक्त ज्ञानी जरी जाले पावन । तरि देवतीर्थभजन न सांडिती ।।
... भक्तशिरोमणी धन्य तूं संसारी । परि एक अवधारी वचन माझें ।।

भूतळीची तीर्थे पहावी नयनीं । असे आर्त मनीं विष्णुदासा ।।
तुझिया संगतीचे नित्य सुख घ्यावें । सार्थक करावें संसाराचें ।।
ऐसी ही उत्कंठा बहुत माझे पोटीं ।। ”

म्हणून ज्ञानदेव आपले मनोरथ पुरविण्यासाठी तीर्थयात्रेला चल म्हणतात. नामदेवांना पंढरी आणि विठ्ठल प्रणाहुनी प्रिय वाटतो. म्हणून ते म्हणतात,

“रंक होऊनियां पंढरी चोहटा । राखेन दारवंटा महाद्वारी ।।
या सुखाकारणें शरीर कर्तती फोलिलें । दुर्जय तोडिलें मायाजाल ।।
त्रिभुवनींचे वैभव सांडोनिया दूरी । जालोंसे भिकारी पंढरीचा ।।”

असे स्वतः चे चित्र ते काढतात व ज्ञानदेवांसहित ‘आज्ञा मागों दोघे तीर्थयात्रे सत्वर उठोनी आले स्वामी जवळ

“ऐकोनी पंढरोरावो हांसिन्नले”
“हारोनि पंढरिनाथ पाहे नाम्याकडे
म्हणे नवल केवढें भाग्य तुझे ।।”
प्रत्यक्ष परब्रहा मूर्ति ज्ञानेश्वर
‘करितसे आदर संगतीचा ’.
“तेव्हा तू तीर्थीयात्रेला जा ” म्हणून पंढरीनाथ सांगतात, आणि,
“दाटले अवस्था दह्य माझे
आरूष साबडें नामें माझें वडें
मार्गी मागें पुढें सांभाळावे ।.
मग नामयाचा हातु धरोनी श्रीपती
देतु असे हाती ज्ञानदेवा”

या ठिकाणी प्रत्यक्ष विठ्ठलाचे माणसासारखे चित्र येते. अशी पुढे रूक्मिणी, निवृत्ती, सोपान, विसोबा खेचर, नरहरी सोनार, गोरा कुंभार, सावता माळी, जगन्मित्र नागा यांची शबदचित्रे येतात. उदाहरणार्थ

“रूक्माई आरती घेऊनी आली वेगें ओवाळिलें दोघे देवभक्त
कवतुके नाम्याची धरिली हनुवटी पाहे कृपादृष्टी घडीये ।”

या भक्ताची तीर्थयात्रा अभंग १३२ मध्ये संपली आहे. “तीर्थे करोनी नामा पंढरीये आला, ही तीर्थे कोणकोणती ? त्यांचा फक्त उल्लेख येतो. वर्णन येत नाहीत. आणि हेतूही सफल झाल्याचे कळते. उदाहरणार्थ,

पश्चिम प्रभास आदि करोनि द्वारका । पहिल्या सकळिका मोक्षपुऱ्या ।।
पंथी पावन तीर्थे करोनि सकळिकें । प्रक्षाळली पातकें वासनेची’ ।।

या संदर्भात डॉ. कानडे म्हणतात, “प्रभास, द्वारका, काशी अशा काही तीर्थांचा स्पष्ट निर्देशही मिळतो. परंतू त्यावरून नामदेवांच्या तीर्थाटनाची स्पष्ट निर्देशही मिळतो. परंतु

त्यावरून नामदेवांच्या तीर्थाटनाची संपूर्ण कल्पना येत नाही " हेच खरे आहे. ('श्रीनामदेवदर्शन' प. आ., नामदेवांचा जीनवपट : प्र. १३ पान १५५ )

पुढे, 'तीर्थयात्रा सफळ व्हावया संपूर्ण
करीं का उद्यापन विधियुक्त

असे देवच सांगतो आहे. देव त्याचे हे 'उद्यापन' कार्य विधीयुक्त ' आरंभतो. त्यात,

"आपुल्या दासाचा सिध्दि न्यावा पण ।
म्हणोनी यजमानु झाला देव"

अशी वर्णने येतात. रुक्मिणी, सत्भामा, आणिमादि सिद्धि या समारंभास सिद्धि आणतात आणि घरेलू वातावरणात ब्रह्मण, संत यांच्यासमवेत हा 'उद्यापन' कार्यक्रम पार पडला आहे. डॉ. मु. श्री. कानडे यांच्या भाषेत, तीर्थावळी प्रकरणात यात्रेपेक्षा या मावंद्याच्या सोहळयानच भरपूर जागा व्यापलेली आहे. त्या वर्णनात वस्तुस्थिती आणि अद्‌भूतता यांचे विलक्षण मिश्रण झालेले आहे.

('श्रीनामदेवदर्शन' पान १५६)

प्रा. न. र. फाटक 'तीर्थवळी' संबंधाने म्हणतात, "नामदेव – गाथ्यातील तीर्थावळीत तीर्थाची नावे फारशी नाहीत. यात्रेची वाट चालत असता ज्ञानेश्वरांनी नामदेवांशी केलेला भक्तिविषयक संवाद या तीर्थावळीत विस्ताराने गोवलेला आहे.
('ज्ञानेश्वर वाड.मय आणि कार्य' प. आ., उपसंहार, पाने ३३३ ते ३३५)

आमच्या दृष्टीने ही तीर्थयात्रा भक्तीचा महिमा गाते. ही भक्ती देवालासुध्दा मानवी भाव-भावना व मानसिक आचार-विचारांचे रंगरूप देणारी आहे. त्यामुळे वर म्हटल्याप्रमाणे ती अद्‌भुताचा आश्रय घेणारी ठरली आहे. भक्त नामदेव पंढरपूरमय व विठ्ठलाशीच एकरूप झाल्याचे ठायी ठायी दिसते. उदाहरणार्थ,

"तूं माझी जननी तूं माझा जनीता । तूं बंधु चुलता पंढरीराया ।
तूंचि इष्टमित्र तूंची गणगोत । तूंचि कुळदैवत आवडते ।।
तूंचि माझें व्रत तूंचि माझे तीर्थ । तूंचि धर्म अर्थ काम देवा ।। (९२१)

'तीर्थावळी' त नामदेवांचे चित्र हे असे आहे. तिच्यात नामदेवांचे एक निरागस भक्त म्हणून चित्र तर अप्रतिम असेच साकारलेले दिसते. त्यामुळे ज्ञानदेवांप्रमाणेच ती त्यांच्याही चिरत्राशी आपले नात स्पष्टपणे दाखविते आणि भक्तिरसाची कारंजी निर्माण करीत राहते. हा भक्तिरस तर अद्‌भुताच्या पातळीवर जाताना दिसेल, आणि ज्ञानदेवांसारख्या ज्ञानयोग्याने यांची कबुली

'पंढरीरायाचा तूं प्रेम भांडारी' - (९२५)
व 'भक्त भागवत बहुसाल ऐकिले ।
बहु होंऊनी गेले होती पुढे ।
छरी नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्व ।
हा रस अद्‌भूत निरोपमु ।।' (९२७)
अशी कबुली व साक्ष दिली आहे.
"अज्ञानाचा भाग होता माझो मनीं ।
हिंडविलें म्हणोनि देशोदेशीं ।।

परि पंढरीचे सुख पाहातां कोटिवाटे ।
स्वप्नींही परि कोठें न देखेची ।।
उदंड तीर्थाची ऐको जाय प्रौढी ।
परि चित्त माझे ओढी चंद्रभागा ।। " (९३२)

अशी नामदेवांना पंढरीची स्वाभाविक ओढ वाटते आहे. त्यामुळे या काव्यात . १) भक्तिरसाला आलेला पूर, २) त्याची चिरित्रपरता, ३) त्याची उत्कटता, ४) त्यात व्यक्त होणार श्रद्धावाद, ५) कवीने काढलेली शब्दचित्रे ६) संवाद चातुर्य इत्यादी गुण रसिक मनाला भूल घालणारे असले तरी ही नामदेवाची 'तीर्थावळी' प्रवासवर्णन ठरत नाही. कारण त्यात स्थलवर्णनांना क्वचित पंढरी किंवा काशी सोडली तर मुळीच वाव मिळालेला नाही. तीही वर्णने भक्तीची प्रौढी मिरविण्यासाठी आली आहेत. उदाहरणार्थ, काशीचे वर्णन ज्ञानदेवांचा भक्तीचा मोठेपणा कसा वर्णन करते पाहाः

'ज्ञानदेव आले काशी । विश्वेश्वर आडवे येती ।।
रामनगरा वेशीपाशी । भेटी झाल्या उभयतांशी ।।
परस्परें आलिंगन' (९७१) असे वर्णन येते.

हा भक्तिमहिमा आहे. प्रत्यक्ष विश्वनाथ नामदेवांचे यजमानासारखे स्वागत करतो आहे. बोलतो आहे. हा सर्व अद्भूतवत भक्तिरस आहे किंवा अद्भूत भक्तिरसच म्हणावा लागेल.

ज्ञानदेवांसहित नामदेव ही तीर्थयात्रा करतात. इतर संतांची शब्दचित्रे त्यात येतात. ज्ञानदेवांच्या चरित्राचा एक भाग म्हणून ती मानली गेली आहे. पण स्वतः नामदेव या लेखकाचे भक्त म्हणूनही ती चित्र काढते.चरित्रे सांगते. प्रत्यक्ष प्रवासाला जाऊन प्रवासी यात्रास्थळाचा वा प्रदेशाचा केवळ उल्लेख आल्याने म्हणजे ती स्थळे जिवंतरुपाने साकार न झाल्याने आणि तिच्या प्रवासविषयक अनुभवांचे चित्रण नसल्याने, तीर्थावळी प्रवासवर्णन ठरत नाही असे वाटते.

या संदर्भात डॉ. वि. भि. कोलते म्हणतात, "या अभंगांना 'तीर्थावळी' असे नाव दिलेले असले तरी, त्यात ज्ञानदेव-नामदेवादि संतांनी केलेल्या तीर्थायात्रेचे नुसते वर्णन आहे असे नाही. त्यासाठी काय तीनचार अभंग खर्ची पडले असतील तेवढेच." (प्राचीन मराठी साहित्य - संशोधन, प. आ., प्र. ५, पृ. ८०-८९)

म्हणजेच, कुणीही अभ्यासकाने या 'तीर्थावळी' ला स्थळवर्णनाचे किंवा प्रवासवर्णनाचे रूप येते असे आजवर सिद्ध केलेले नाही. करता येईल असे वाटत नाही. ती चरित्रपरच अधिक आहे.

## ४.६ रामदासांची 'भारतभ्रमंती'

नामदेवांप्रमाणेच प्राचीन संतकवीमध्ये रामदास हे प्रख्यात पर्यटनपटू वा प्रवासक. त्यांनी हा प्रवास आपल्या अंगीकृत कार्यास पोषक म्हणून मुद्दाम योजकतापूर्वक केलेला आहे. त्यांनी आयुष्याची बारा वर्षे भारतभ्रमंती केल्याचा पुरावा मिळतो. उदाहरणार्थ, डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या भाषेत, "शके १५५४ ते १५६६ या बारा वर्षांच्या तीर्थायात्रेत अनेक क्षेत्रांना पावन करून त्यांना तीर्थरूप देत रामदास अक्षरशः आसेतुहिमाचल हिंडले." ('पाच संतकवी', दु. आ., श्रीसमर्थचरित्र, पृ. ३५५)

या प्रवासाचे वर्णन त्यांनी 'तीर्थावळी' 'अस्मानी - सुलतानी आणि परचक्रनिरूपण या प्रकरणवजा दीर्घ कवितांतून मुख्यतः केले असले तरी, इतरत्र समर्थ वाड्.मयात त्याचा परिपाक उतरला आहे. रामदास हे समर्थ प्रवासी आहेत, पण समर्थ प्रवासलेखक आहेतच असे नाही. याचे कारण रामदासांची दृष्टी प्रवासामध्ये राजकीय व सामाजिक परिस्थितीवर अधिक खिळलेली आहे.

या संदर्भात डॉ. तुळपुळे म्हणतात, "या तीर्थयात्रेचे वर्णन त्यांनी 'तीर्थावळी' नावाच्या एका प्रकरणात केले आहे. पण त्याहीपेक्षा 'अस्मानी- सुलतानी' आणि 'परचक्रनिरूपण' या दोन स्फुटांत त्यांनी समाजस्थितीचा आढावा घेऊन तिचे घवघवित असे चित्र काढले आहे... " ('पाच संतकवी', दु. आ., श्रीसमर्थचरित्र पाने ३८८-३८९)

कोणकोणत्या स्थळाला आपण गेलो, त्या स्थळाच्या लोभाने ते हिंडले नाहीत. देवधर्माच्या लोभाने हिंडले व तेथील एकंदर सामाजिक परिस्थिती पाहण्यासाठी ते हिंडले. त्यामुळे या प्रकरणांतून स्थळांशी एकजीव होऊन आलेल्या सामदासांचे चित्र रसिकमनाला आढळत नाही. तर तिथली राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थिती लेखकाने सूक्ष्म निरीक्षणशक्तीने व प्रत्ययकारितेने रेखाटली आहे. उदाहरणार्थ,

"पदार्थ मात्र तितुका गेला । नुसता देशचि उरला ।
येणें करितां बहुतांला । कष्ट जाले ।।
लोकें स्थान भ्रष्ट जालीं । कितेक तेथेंचि मेली ।
उरली ते मराया आली । गांवावरी ।।
माणसा खावया धान्य नाही । आंथरूण पांघरूण तेंही नाही ।
घर कराया सामग्री । काये करिती ।
कांहीच पाहतां धड नाहीं । विचार सुचेना कांही ।
अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडिले लोक ।।
प्राणिमात्र जाले दुःखी । पाहता कोणी नाहीं सुखी ।
कठिण काळें वोळखी । धरीनात कोणी ।।"
('प्ररक्रनिरूपण', २४ ते ४०)

किंवा

"जन बुडाले बुडाले पोटेविण गेले । बहुत कष्टले कष्टले कितियेक मेले ।।
उदंड चाकरी चाकरी मिळेना भाकरी । लोक निलंड निलंड काढूनि नेती पोरी ।।
न्याय बुडाला बुडाला जाहली सिरजोरी । पैक्याकारणें कारणें होते मारामारी ।।
येक पळाले पळाले दूरी देशा गेले । बहुत कष्टले कष्टले तेथें नागवले ।।
येतो पाहुणा पाहुणा लौकरी जाईना । अन्न खातो रे खातो रे थोडेहि खाईना ।।
आहे वस्तीस वस्तीस चोरितो वस्त्रांस । खोटा अभ्यास अभ्यास हाणी महत्तवास ।।
लोक भलेसे दिसती खेटरें चोरिती । वस्त्रे धोत्रें पात्रे लपऊनि पळती ।।
दास म्हणे भगवंता किती पाहसीं सत्व । काय वाचोनि वाचोनी ने परतें जीवित्व ।।
('अस्मानी - सुल्तानी' १ ते १२)

त्यामुळे तत्कालीन सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थितीचे विदारक चित्र हा समर्थ वाड्.मयाचा विशेषच त्यांच्या प्रवासविषयक लेखनाचा विशेष ठरतो. यातून व्यक्त होणारे

लेखक रामदासांचे चित्र त्या परिस्थितीच्या अनुषंगाने आले आहे. ते एका प्रेषिताचे, समाजसुधारकाचे व भक्ताचे आहे, असे म्हणावयास हरकत नाही. वर नमूद केलेली परिस्थिती त्यांची प्रवासविषयक अनुभूति मानली तरी स्थलांचे वैशिष्टय व प्रवास केलेल्या प्रदेशाचे चित्र वरील तिन्ही छोट्या प्रकरणांतून व्यक्त होताना दिसत नसल्याने रामदासांची ‘तीर्थावळी’, ‘अस्मानी-सुल्तानी’, ‘परचक्रनिरूपण’ ही प्रवासवर्णने ठरत नाहीत असे दिसेल.

## ४.७ दीन दत्तपदांकित मुकूंद कवीचे प्रवासवर्णन

प्राचीन मराठी साहित्यात या मुकुंद कवीचे हे एक ‘प्रवासवर्णन’ आहे, असा गौरव ‘महाराष्ट्र सारस्वत’ कार करतात. उदाहरणार्थ, ‘महाराष्ट्र सारस्वत’ करांनी म्हटले आहे, “बुंदेलखंडापर्यंत प्रवास करणाऱ्या या कवीचे हे प्रवासवर्णन अनेक कारणांमुळे मोठे चित्तवेधक आहे.” (वि. ल. भावे - ‘महाराष्ट्र-सारस्वत’ ५ वी आ., ...

‘प्रवासवर्णन’ हा शब्दप्रयोग भूषविणारे महाराष्ट-सारस्वतातील हे पाहिले पुस्तक ! पण त्या पूर्वीच... “परंतु इतिहासाचेच एक प्रधान अंग, जे आत्मचित्र व प्रवासवर्णन... तसे आत्मचरित्र नुकतेच उपलब्ध झालेले या लेखाद्वारा आपल्यापुढे आज ठेवीत आहे.” म्हणून उपलब्ध सहा पानांच्या या ‘प्रवासवर्णनाचा व आत्मचरित्राचा सविस्तर परिचय’ ‘भारत इतिहास संशोधक मंडळ, इतिवृत्त श. १८३४, पृ. १८३) तसेच, याचा काही भाग त्यांच्या चिरंजिवाने लिहिलेला आहे. असेही त्यांनी म्हटले आहे.

संतांच्या आत्मकथांचे संपादन करणारे डॉ. रा. चि. ढेरे यांनीही ‘चार यात्रावर्णना’ चा परिचय करून देताना या मुकुंद कवीच्या ‘यात्रावर्णनाचा’ परिचय करून दिला आहे.(संताच्या आत्मकथा प. आ., प्रस्तावना पृ. ३३-३८) या सर्व गोष्टीचा विचार करता मुकुंद कवीचे हे उपलब्ध प्रवासवर्णन एकाच एक इतिहास व (५) एक स्थळवर्णनही आहे असे वाटते.

एक प्रवासवर्णन आहे म्हणजे कवीने प्रवाससूत्राच्या अनुरोधाने आपले प्रवास विषयक अनुभवांचे चित्रण केले आहे. हा प्रवास त्याच्या जीवनभ्रमंतीचा एक अविभाज्य घटक होऊन गेला आहे, म्हणून ते चांदोरकरांना व श्री. ढेरे यांना वाटते त्याप्रमाणे ते ‘आत्मचरित्र’ व आत्मकथा आहे. कवीने प्रवासवर्णनात आत्मचरित्र गोवल्यामुळे ते इतिहासाशी जसे जवळ येते, तसेच तत्कालीन देशोदेशींची लोकस्थिती दर्शविते व प्रत्यक्ष कवीने औरंगजेबाचा मोठा मुलगा ‘मोअज्जीम’ यांच्या पदरी नोकरी धरली आहे. म्हणून हे इतिहासाशी नाते सांगणारे ठरले आहे. जन्मगांव, भ्रमंतीतील अनेक गावे, तीर्थे, नद्या , पवित्र स्थळे यांची वर्णने व उल्लेख आल्याने ते ‘स्थलवर्णन’ ही ठरावे. उदाहरणअर्थ,

> “नमीयाड देशात खाडोवनासी ।
> असे जन्म माझा तया पौर देशी ।।”

असा पुरातन जन्मगावाचा उल्लेख आहे. कवीची मुंज पाचवे वर्षी झाली आहे. विवाहानंतर वडिलांचा मृत्यू नंतर कवी बागलाणात जैतापूर नावाच्या गावी जातो. “एकाकी पडलों प्रपंचविषयी देखोनी भांबावलो” व पुढे ‘आश्रय कोण कवी असणे हा काळ दुर्घष्ट कीं !.. विद्दया न ये नेटकी ।

असी त्याची स्थिती होते. पुढे या कवीला गुरूचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष दर्शन होते व प्रसाद मिळतो व तो यात्रेस निघतो.

“ओमकारेश्वर नर्मदा प्रथम ते संनिध सां पांच दा ।
जाले पूर्वजसंग आत्मगमने आणिक ऐका पदा ऽ
श्री तापीपुर येऊनि निजसुखे राहोनि पूढे क्रमे ।
केले मज्जम मोहना आणि तदा ते पूरणासंगमे ।।”

अशी स्थळे व नद्दयांची वर्णने येतात आणि चरित्रही येते.

भा. इ संशोध मंडळाच्या इतिवृत्तात............. हा कवी कोणकोणत्या यात्रास्थळांना गेला आणि फिरून कंगाल होऊन एका स्त्रीकडून १२ तुले कर्ज काढले यांची माहिती आली आहे.

मोअज्जीमकडे नोकरी धरल्याचा पुरावा नमूद केला आहे. (मुलतानवर्णन, पान १८९ वर आले आहे.) ‘मूलस्थान प्रसिद्ध नाम नगरी जैसी अयोध्यापुरी तिला भेट देऊन ‘संतोषलो अंतरी’ म्हणून कवी सांगतो.

धर्मशाळा, विहिरी, तीर्थे, भक्तिभावयुक्क श्रीमंती भोगणारे लोक असे अपूर्व पौरसौख्य भोगणारे कवीने जसे सर्व पाहिले आहे. तसेच, “स्त्रिया अलज्ज दूषणासि बोलिजे असे ।।” असा मूलस्थानच्या स्त्रियांविषयीचा प्रवाद तो नोंद करतो आहे. हा कवीच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा, उघड्या कानांचा व उघड्या डोळयांचा पुरावा समजावयास हरकत नाही.

पुढे कवीने नुरपूर, राजदुर्ग तेथील चित्रभिंत सुंदरचित्रे भर्तृहरीची गुहा मोहनदास नावाच्या वाटाड्याबरोबर रसिकतेने पाहिली म्हणून सांगितले आहे.

कवी पैशांसाठी अवंतीनाथ, रामश्रमी दयाराम इत्यादी धनिकांची स्तुति करतो आहे आणि ‘पोटार्थ भिक्षावृत्ती’ मांडली आहे जयसिंह नामक नृपतीची स्तुती खालीलप्रमाणे करतो.

“मी ही व्यापिली म्लेंछ राज्यानुसारे ।
जया रोधिले वेदधमोक भारे ।
तया हेतू हा इंद्र जन्मोनि देही ।
हरी भार छंदे भुजंग्यारव्य पाही ।”

अशी त्या जयसिंहाची १० तुलांसाठी स्तुती केली आहे. बुंदेलखंडी आल्यावर त्याला दुर्जनसिंहराजा, बलिभद्र उपाध्याय, किशोरदास दिवाण, रामपूरकर राजा रतनसी व त्याचा गुरू प्रयागभट यांच्या भेटी कवी घेतो आणि मांडवगडी येतो आहे. हा प्रवास, तीर्थयात्रा व त्याच्या प्रवासातील स्थळे, तीर्थे व व्यक्ती हयांविषयीच्या अनुभूतीमुळे या काव्यास प्रवासवर्णनाचे व आत्मचिरत्राचे रूप एकाच वेळी प्राप्त झाले आहे. त्यामुळे ‘आत्मचरित्रात्मक प्रवासवर्णन’ असेच या काव्याचे वर्णन करावे लागेल. हे प्रवासवर्णन अपुर्ण स्थितीत उपलब्ध आहे. त्यामुळे स्वरूप प्रतीत होत नाही. एक तीर्थयात्रापर प्रवासवर्णन म्हणूनही या काव्याकडे पाहता येईल.

वाड्.मयीन दृष्टीने विचार करता या सर्व विशेषांबरोबर कवीचे अनेक भाषांचे ज्ञान व छंदविषयक जाणिवही लक्षणीय आहे. तसेच, हे प्रवासवर्णन पद्मय आहे. त्याच्या उपलब्ध इतर रचनातूनही ही बाब अभ्यासकांच्या लक्षात आल्यावाचून राहात नाही.

'महाराष्ट्र सारस्वत कार या संदर्भात म्हणतात ते चिंतनीय आहे. "या कवीची बरीच कविता आहे. पैकी काही रचना ब्रिज, नेमाडी, अभीर, बागलाणी, खानदेशी, रणावर, गुर्जरी मारवाडी याही भाषांत आहे. म्हणजे त्या काळी प्रचलित असलेल्या अनेक भाषांत काव्यरचना करण्याईतके भाषाज्ञान या मुकुंद कवीस होते."

( वि. ल. भावे 'महाराष्ट्र सारस्वत' पृ. ३०९-३१० )

डॉ. रा. चिं. ढेरे यांनी "समर्थकालीन मुकूंदाचे हे यात्रावर्णन काव्यदृष्ट्या अतिसामान्य आहे... त्यांतून कवीच्या सामान्य व्यक्तिमत्त्वाची स्पष्ट कल्पना येते. असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

हा अभिप्राय मर्यादित अर्थाने खरा वाटतो. कवीचे व्यक्तिमत्त्व जसे आहे तसे व्यक्त झाले आहे. तो जरी भीकमाग्या बावळट असला तरी 'मोअज्जीम' कडे काही दिवस नोकरी करणारा, इतकी स्थळे हिंडणारा, आणि अशा प्रतिकूल प्राचीन मराठी साहित्यात अनेक छंदात्मक व अनेक भाषांचे ज्ञान मिळवून कविता रचली आहे. आणि विशेष म्हणजे 'प्रवासवर्णन' लिहण्याचा महत्त्वाचा प्रयत्न त्याने केला आहे. अर्थातच प्रतिभाधर्माने हा कवी सामान्य आहे यात संशय नाही. महानुभावांच्या 'ऋद्धिपूरवर्णन' कर्त्या नारायण व्यासापाशी जी नैसर्गिक लेखनशक्ती आहे, तशी या कवीपाशी निश्चितच नाही एवढे म्हटल्यास पुरे.

श्री चांदोरकरांनी 'कवी या दृष्टीने हे काशीकवी किंवा विठ्ठलकवी यांच्या तोडीचे आहेत' असे म्हटले आहे, तेच योग्य वाटते. विठ्ठलाचा रचनेचा खटाटोप व कृत्रिमता आणि काशीकवीची सरसता यांचा काहीसा मिलाफ मुकुदांमध्ये आढळतो आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

## ४.८ निरंजन माधवाचे प्रवासवर्णन

निरंजन माधव यांच्या प्रवासवर्णना चा परिचय सारस्वतकारांनी करून दिलेला आहे. त्याच्या आधाराने या काव्याची वैशिष्टये पाहता हे तीर्थयात्रापर आहे.

"याने सर्व हिंदुस्थानभर प्रवास व तीर्थयात्रा केल्या होत्या, याचा प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे. यात अनेक क्षेत्रांचे ठिकाणी हा गेला. तेव्हा जे जे याला दिसले व वाटले त्याचे त्याने यथातथ्य व सुंदर वर्णन केले आहे."

(महाराष्ट्र सारस्वत)

अलीकडील हे प्रवासयात्रेची सांगितलेली हकीगत कौतुकास्पद आहे. म्हणून या ग्रंथाचे कौतुक महाराष्ट्र सारस्वतकर करतात. त्यामुळे महाराष्ट्र सारस्वता तेच आढळणाऱ्या निरंजन माधवाच्या मानल्या गेलेल्या' म्हणण्याचे कारण हा ग्रंथ निरंजन माधवाचा नाही असे मानणारा श्री. रा. चि. ढेरे आदी संशोधकांचा एक पक्ष आहेच.

## - सुची -

## (आधारभूत प्रमुख ग्रंथांची सूची)

१. आचार्य, नारायण राम, संपा., सुभाषित रत्नभाण्डारम्' , निर्णयसागर प्रेस, मुंबई - २.८ वी आ., १९५२.
२. आजगावकर जगन्नाथ रघुनाथ, 'महाराष्ट्र कविचरित्र, भाग १ ला दामोदर सावळाराम आणि मंडळी मुंबई , १९०७.
३. आपटे, वासुदेव गोविंद, 'मराठी शब्दरत्नाकार', प्रकाशक : जोशी गो. ब., पुणे १९३२.
४. करंदीकर, गोविंद विनायक, भाषां. : 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, मौज प्रकाशनगृह, मुंबई, प. आ., १९५७.

## ४.९ प्रवास वर्णन एक वाड.मय प्रकार :

### 'प्रवास' हा मानवी जीवनाची एक मूलभूत प्रेरणा :

अगदी अलीकडे, श्री. काकासाहेब कालेलकरांनी, 'हिमालयातील प्रवास' या आपल्या पुस्तकात 'खाणे, निकणे, भिणे, लग्न करणे, इत्यादी विश्वजनीन क्रिया मनुष्य कोणत्या उद्देशाने करतो हे सांगणे सोपे नाही. पुष्कळ वेळा मनुष्य असेच सांगेल की, राहवत नाही म्हणूनच या सार्वत्रिक प्रवृत्तीच्या आम्ही पडतो. आतून एक अदम्य प्रेरणा अस्वस्थ करून सोडते म्हणून मुकाट्याने तिला वश व्हायचे लागते.

असे प्रवास प्रेरणेचे महात्म्य वर्णन केल आहे आणि म्हटले आहे, 'ज्या मनुष्याच्या वृत्ती विकृत झालेल्या नाहीत अशा मनुष्याच्या बाबवतीत प्रवाशाची वृत्तीही तितकीच स्वाभाविक असते.'

तसेच प्रवासही जीवनाशी किती निगडीत आहे, हे कथन करताना कालेलकर म्हणतात, 'वृध्दाश्रवा इंद्राने वैदिक संस्कृतीच्या प्रारंभकाळीच आदेश दिला की, जो बसून राहतो त्याचे नशिबही बसून राहते. जो चालू लागतो त्याचेच भाग्य लाभते. ' चराति चरतो भगः ही प्रेरणा घेऊन मेढपाळ चालले. या जगात सर्वच काही चालते आहे आणि मनुष्य जेव्हा चालून चालून कंटाळतो, तेव्हा स्थानवर होने राहण्याऐवजी या जगाला सोडून तो कायमचा चालताच होतो.

या परिच्छेदामध्ये प्रवास ही एक मानवी जीवनाची मूलभूत प्रेरणा आहे. या विधानाची सत्यता लपून राहत नाही. भारत भक्त काकांनी प्रवास हे व्यक्तित्वाच्या विकासाचे साधन तर मानले आहेच, तर दुसऱ्या दृष्टीने तो देश भक्तिच्या अनुभवाने थबथबलेला`क देशबक्तीचा प्रकार आहे असे मानतात.

## ४.१० 'प्रवास' या गटकतत्वामुळे वेगळेपणा :

'प्रवास' या घटकतत्त्वामुळेच स्थलवर्णनाहून व इतर वाड्.मय प्रकाराहून प्रवासवर्णन वेगळे ठरत आहे. हे प्रवासत्त्व सतत फिरते व केंद्रिभूत राहिल्याने त्याचा वेगळा गतिशील आविष्कार

प्रवासवर्णनात होत राहतो. प्रवासवर्णन स्थलवर्णनासारखे स्थाणू राहू शकत नाही. अशा गतिशील प्रवास विषयक अनुभूतीचे प्रदेशासहित चित्र प्रवासवर्णनात येत असल्यामुळे ती अनुभूती नेमकी शब्दात पकडणारा लेखक अव्वल दर्जाच्या गतिशील लेखन शैलीचा प्रत्यय येतो. उदा. 'उडता गालिचा' मधील 'अल्पसवरून उड्डाण' हे प्रभाकर पाध्यांनी लिहिलेले पहिले प्रकरण या दृष्टीने नमुना म्हणून पाहता येईल. प्रवासवर्णनकाराला 'प्रवास' असा शब्दात पकडता यावा आणि त्याचा प्रत्यय रसिकाला द्यावा या दृष्टीने ते अव्वल दर्जाचे ठरावे.

प्रवासवर्णनाचा वेगळेपणा त्यामुळे सतत ध्यानात येत राहतो. प्रवासी लेखक आणि त्याचा प्रवास हे घटक त्यात प्रदेशाशी एकजीव होऊन येत राहतात. असे दुसऱ्या कोणत्या लेखनाता घडत नसते. ते याच लेखनात घडते.

'प्रवास' ही मानवी जीवनाची एक मूलभूत प्रेरणा आहे. याचे दर्शन पहिल्या प्रकरणात घेतले आहेच. अशा प्रवासातील अनुभूतीचा कलात्मक आविष्कार प्रवास वर्णनात घडणे महत्त्वाचे आहे.

**प्रवासवर्णनातील प्रदेशाच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू :**

प्रवासवर्णनात साकार होणाऱ्या प्रदेशाचे व्यक्तिमत्त्व व त्याचे काही प्रमुख पैलू पाहिल्यावर, आपल्या असे निदर्शनास येते की, हे पैलू त्या प्रदेशाच्या भूगोलाने किंवा प्राकृतिक वैशिष्टयांनी निर्माण केलेले आहेत. कित्येकदा त्या प्रदेशाचा इतिहास, त्यांची संस्कृता। तेथील धर्म, राजकारण, अर्थकारण, व्यापार यांनीही त्या प्रदेशाला एक वेगळे व्यक्तिमत्त्व बहाल केलेले असते असे वाटते ; इतकेच काय तेथील माणसे, त्यांची घरेदारे, रस्ते, त्यांची विशिष्ट रचना व निसर्ग, तो प्रदेश वेगळा आहे असे जाणवायला लागतो. काही वेळा असा काही वेगळेपणा नसणे, हाही त्याचा वेगळेपणा असतो. त्या प्रदेशाचे प्रवाशाला एकंदर जाणवणारे असे संमिश्र वातावरण त्या प्रदेशाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय आणून देते. म्हणून प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात,

"प्रत्येक स्थळाशी संलग्न असे एक वातावरण असते. हे वातावरण भौगोलिक परिस्थितीने, इतिहासाने, दंतकथांनी, संस्कृती-प्रवाहांनी नानाविध माणसांच्या मनांनी आणि इतर नाना प्रकारच्या नामिक व अनामिक गोष्टींनी निर्माण केलेले असते. ह्या वातावरणाखेरीज त्या स्थळांची कल्पना निर्जीव ठरते. त्यानेच त्या स्थळाला त्याचे स्वतःचे असे एक जिवंत व्यक्तिमत्त्व लाभत असते, हे जणू त्याचे प्राणत्त्व बनते.""

## ४.११ प्रवासवर्णनातील काव्यात्मता व लालित्य :

या प्रतिभावान मनाची संवेदनाशीलता, तादात्म्य व तरलता या पैलूमुळे प्रवासवर्णनात काव्यात्मता व लालित्य अवतरते असे म्हणता येईल. एखाद्या उद्ध्वस्त विजयनगराचे अवशेष पाहताना श्री. गंगाधर गाडगीळ यांच्यामधला कवी उत्कट दर्शन देऊन जातो. अशा स्थळाशी, घटनांशी वा प्रसंगांशी प्रति भावना प्रवाशी लेखकाचे तरल व हळवे मन, कातर व उत्कट होऊन एकरुप होते व एक प्रकारची काव्यात्मता प्रवासवर्णनात अवतरायला कारणीभूत ठरते. प्रवासातील एखादे स्थळ, प्रसंग किंवा घटना वा दृश्यच मुळी इतके विलक्षण असते की, लेखक त्या ठिकाणी एकदम अंतर्मुख होतो, चिंतनशील बनतो, हुरहुरतो आणि पाहिलेल्या प्रत्यक्ष

स्थळाबद्दलची अगर प्रदेशाबद्दलची आपली भावगर्भ जाणिवच व्यक्त करत असतो. त्यामुळे प्रवासवर्णन एकाच वेळी उत्कट व ललित, काव्यात्म व चिंतनशील बनत असते. या दृष्टीने वर सुचविलेल्या विजयनगरच्या दर्शनात काळोख पडू लागला. अशा प्रदेशाच्या दर्शनात जीवनाची अपूर्णता आणि अपरिहार्यता लेखकाला वाटते. त्याला जीवनाचा खेळ भंगूर ही वाटतो. तसेच 'माझा प्रवास' या प्रवास वर्णनात श्री. गोडसे भटजीना आलेले अनेक जीव घेणे अनुभव सांगता येतील.

प्रवासवर्णनात जे लालित्य अवतरते ते वर म्हटल्याप्रमाणे प्रतिभाशक्तीच्या विलासामुळेच ते केवळ वर्ण्यविषयाच्या जिव्हाळ्यामुळेच निर्माण होत नसून प्रतिभाशक्तीचा वावर मुळात सुरु झालेल्या असतो, म्हणून निर्माण होत असतो. कारण प्रतिभावान प्रवासी लेखक प्रवास केलेल्या विशिष्ट प्रदेशाबद्दलचे अनुभव आपल्याला नव्याने सांगत असतो. त्यामुळे त्या प्रदेशाबद्दलची मुळात त्या लेखकाची जाणीव जशी विस्फारलेली आढळते. तसेच वाचकालासुद्धा त्या प्रदेशाचे वाचताना एक वेगळे दर्शन घडून जाते. उदा. काकासाहेब कालेलकरांची भारत भक्तीने ओथंबलेली, 'आमच्या देशाचे दर्शन', 'हिमालयातील प्रवास' किंवा 'जीवनलीला' ही प्रवासवर्णने स्वभावतःच एका वेगळ्या राष्ट्रवादी दृष्टीचा प्रत्यय देऊन जातात. ती त्या दृष्टीने लिहिलेली असली तरी कालेलकरांमधला 'कवी' लपून राहत नाही.

## ४.१२ प्रवासवर्णन : एक वेगळा वाङ्.मयप्रकार :

प्रवासवर्णनपर लेखन हा एक वेगळा वाङ्.मयप्रकार आहे. मागील प्रकरणात प्रवासवर्णनपर लेखन ज्या मूळ घटकतत्त्वानी साकारते असे म्हटले आहे. ती मूळ घटकत्त्वे १) प्रवासी प्रवास व प्रदेश ही होत. ही मूळ घटकत्त्वे एकमेकांत मिसळून प्रवासवर्णनच आकाराला येते. तसा इतर कोणताही वाङ्.मय प्रकार साकारत नाही हे निश्चित होय. प्रवासवर्णनाच्या वाङ्मयीन रुप सिद्धीच्या विचार करताना, प्रतिभाशक्ती हा जो सर्वच वाङ्.मयकलेचा निर्मितीमागील प्रेरक घटक मी मानला तो मानणेच भाग आहे. म्हणून या घटकाशिवाय कोणतेही 'वाङ्मयीन घटना' 'कला' होताना दिसत नाही. असेच तिचे महत्त्व आहे.

प्रवासवर्णनाची प्रारंभकालीन रुपसिद्धी ज्या या मूळ घटकांनी साधली जाते तेच मूळ घटक प्रवासवर्णनाला वेगळा वाङमयप्रकार बनवतात असे मला वाटते. प्रवासवर्णनात चित्रित होणाऱ्या त्याच्या अंतरंगातील आशय आणि भाषिक माध्यमातील त्याची आगळी अभिव्यक्ती १) प्रवासी लेखक, २) प्रवास व ३) प्रदेश यांच्याशीच निगडीत असते. हेच तीन प्रमुख घटक त्यांची रुपसिद्धी असतात. प्रवासर्वनात म्हणून वेगळा 'घाट' वा 'आकार' त्याला प्राप्त होतो आणि 'प्रकाराचे' सामर्थ्यही हे तीन घटकच आणतात. प्रवासवर्णनाला 'एक' वाङमयप्रकार म्हणून खास काही नावीन्य प्राप्त होते, त्याला त्याचा म्हणून वेगळेपणा येतो.

इतर कोणत्याही वाङ्.मयप्रकार अंतरंगाच्या व बहिरंगाच्या दृष्टीने 'प्रवासी' 'प्रवास' व 'प्रदेश' या मूलभूत घटकांनी तयार झालेल्या व अशा आगळ्या अनुभव विश्वाच्या अभिव्यक्तीने साकारलेल्या, रंगरुपाला आलेला आढळणार नाही. या वाङ्.मय प्रकाराच्या स्वरुपाची व्याप्ती निश्चित करण्यासाठी त्यातील नियमितपणा जाणून घेण्यासाठी याच घटकाची मदत होते. म्हणून प्रवासवर्णनातील या घटकाचे स्वरुप वाङ्.मयप्रकाराच्या दृष्टीने पुन्हा एकदा तपासून पाहणे

आवश्यक ठरावं, यावेळी मागील प्रकरणातील विचारांची काही मदत घेणे अपरिहार्य आहे. त्यामुळे विचारांची पुनरुक्ती होणे सहज शक्य असते. कारण प्रवासवर्णनाच्या वाङ्मयीन रुपसिद्धीच्या तात्त्वि चर्चेमध्ये 'प्रवास वर्णन एक वेगळा वाङ्मयप्रकार आहे', याचे अर्धे अधिक उत्तर येऊन गेले आहे, असे मला वाटते.

## ४.१३ 'प्रवासवर्णन' या वाङमय प्रकाराची प्रगल्भता

या दृष्टीने 'प्रवास वर्णन' हा एक प्रगल्भ वाङ्.मय प्रकार ठरतो. याचे प्रमुख कारण त्यात लेखकाच्या प्रगल्भ व समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार घडत असतो. हे व्यक्तिमत्त्व बहुढंगी आणि बहुरंगी असते. हे व्यक्तिमत्त्व प्रतिभाशाली लेखकाचे असून प्रवाशाचे असते. लौकिकात कुणी लेखक, कवी, पत्रकार, जादूगार, विद्यार्थी, धर्मोपदेशक असून एक फिरस्ता असतो. तो जे जे पाहिल, अनुभविल त्याबद्दलच्या क्रिया-प्रतिक्रिया त्यात व्यक्त होतील. अनोखे असे मनाचे पैलू व चिंतन दिसेल. कारण प्रवासी म्हटला म्हणजे पायाबरोबर डोक्यानेही प्रवास करावयाचाच, चालणाऱ्याचे डोके चांगलेच झपाट्याने चालू लागते आणि त्याला जगातील सगळे प्रश्न सुचू लागतात. यात्रेत तऱ्हे तऱ्हेचे लोक भेटतात, त्यामुळे पंचरंगी दुनियेचा अनुभवही येत असतो. त्यामुळे विचारांची धाव कोठेही वाहू शकते. असे श्री. काकासाहेब कालेलकरांच्या शब्दांत म्हणता येते. या विचारामुळेच लेखक संमिश्र रीतीने व्यक्त होतो.

ही प्रगल्भता त्याला त्याच्या शैलीमुळेही प्राप्त होते. शैलीचा विचार करताना शैली वर म्हटलेल्या विविध प्रकारच्या असते. तशीच ती शैली अभिव्यक्तीचा आश्रय घेताना एकाच वेळी निबंधकाराची, लघुनिबंधकाराची, गोष्ट सांगणाराची असते. शैलीच्या या वैशिष्ट्यामुळेच प्रवासवर्णनाला एक वेगळ्या प्रकारचे लेखन म्हणून या वाङ्.मय प्रकार म्हणून 'रुप' लाभते. असे संमिश्र वाङ्.मयीन लेखन शैलीचे स्वरुप दुसऱ्या कोणत्या वाङ्.मयीन प्रकाराला असल्याचे फारसे जाणवत नाही.

## ४.१४ 'प्रवासवर्णन' या वाङ्मयप्रकारची वैशिष्ट्ये :

प्रवासवर्णनपर लेखनात स्थळदर्शन, निसर्गदर्शन, व्यक्तिदर्शन, संस्कृतीदर्शन त्याचप्रमाणे लेखकाची जीवनदृष्टी व चिंतनपरता या घटकांना महत्त्वाचे स्थान असते. प्रवासवर्णन देशांतर्गत असो वा विदेशांचे असो, त्यामागे रसिकतेची दृष्टी नसेल तर लेखनात केवळ वृत्तांत कथनाचा वस्तुनिष्ठपणा येतो. असे लेखन माहितीवर असते. पण रसवत्तापूर्ण होत नाही. प्रतिभाशाली लेखक परिचिताचे अपरिचिताचे परिचित दर्शन घडविण्याची प्रत्ययकारी किमया करतो. सामान्य माणसाने टिपलेली ढोबळ माहिति व लेखकाच्या संवेदनशील मनाने टिपलेली त्या स्थळासंबंधी सर्वांगीण माहिती यात खूप अंतर असते. प्रवासवर्णनात स्थळवर्णन तेथील निसर्ग, ह्या बाह्यांगाप्रमाणे तेथील संस्कृती दर्शन, ऐतिहासिक या अंतरंगालाही महत्त्व असते. प्रवासातील विविध अनुभव व्यक्त करताना लेखकाचे त्यावरील चिंतन व भाष्य यालाही महत्त्वाचे स्थान असते. पूर्वानुभवांशी हे नवे, वैचित्र्यपूर्ण अनुभव लेखक ताडून पाहत असतो. तुलना करीत असतो. प्रवासातील अनुभवांनी बहुश्रुतता येते मन विशाल बनते, ज्ञानात भर पडते.

प्रवास करणे ही मानवी जीवनाची मूलभूत व प्राचीन प्रेरणा आहे. दैनंदिन जीवनातील तोच तोचपणाला उबलेला माणूस प्रवासातून नित्यनूतन अनुभव ग्रहणातून ताजा टवटवीत बनतो. अनोख्या अनुभवांना सामोरा जातो. पूर्वानुभवांशी मनोमन तुलना करीत राहतो. नवदर्शनेने जगाच्या विविधतेने, वैचित्र्याने विस्मित होतो. अंतर्मुख होतो. चिंतनशील बनतो व स्वतःला नव्याने घडवून घेतो. अशा संवेदनशील प्रवासवर्णनकाराच्या लेखनात त्याचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व स्वाभाविकपणे व्यक्त होत असते. परंतु यातील 'मी' चे दर्शन वाजवी असल्यास पांडित्य प्रदर्शनाचा दोष टाळला जातो. प्रवासातील विविध नित्यनव्या अनुभवांनी मनाचे कंगोरे तीक्ष्ण बनतात, मन ताजेतवाने होते. जीवनाकडे, त्यातील अनुभवाकडे पाहण्याची एक नवी व्यापक दृष्टी प्राप्त होते. प्रवासवर्णनात तो प्रदेश जड वस्तू नसून एक चैतन्यशील व्यक्तिमत्त्व लाभलेला भूप्रदेश असतो. प्रवासवर्णनकाराने संवेदनशील मनाने केलेल्या वर्णनात सरलता व मनाचा हळवेपणा या काव्य गुणांचे पैलू अवतरतात. प्रवासातील एखादे विशिष्ट स्थळ, विशिष्ट प्रसंग, घटना लेखकाच्या मनावर कोरले जातात. त्यातील विलक्षण अनुभूतीमुळे त्याच्या मनात भावतरंग उठतात. लेखकाचे संवेदनक्षम मन, निरीक्षण शक्ती, तीव्र स्मरणशक्ती या मानसिक गुणांमुळे त्याचे वर्णनात केवळ वृत्तांतलेखनाचे स्वरुप येत नाही. असें अनेक पदरी जीवन व जीवनाभूती यांचा उत्कट आविष्कार त्यांचा वर्णनात दिसून येतो. मनुष्य स्वभावाचे विविध कंगोरे जाणून घेऊन त्याचे दर्शन लेखक आपल्या लेखनातून घडवित असतो. हे एक प्रकारे मानवी जीवनदर्शन असते, स्थलांचे, तेथील निसर्ग सौंदर्याचे वर्णन करताना लेखक निसर्गाशी आस्वादक प्रक्रियेतून रंगून जातो. या एकरुपतेतून माणसामध्ये त्याच्या मनाचा सूक्ष्म, नाजूक भावभावनांतही नकळत समरस होतो. गुंतत जातो. आस्वाद घेण्याचा या तरल मनोव्यस्थेमुळे त्याच्या लेखनास जीवनाभुतीचे स्वरुप प्राप्त होते.

प्रवासाच्या व प्रवासलेखनाच्या प्रेरणा या प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंत भिन्न असल्या तरी त्यांच्या अभिव्यक्तीचे बीज माणसाच्या गोष्टी वेल्हाळपणात जीवनातील साऱ्या अनुभवात दुसऱ्याला सहभागी करुन घेण्याच्या प्रवृत्तीत आढळते. प्राचीन वाङ्मयात महाराष्ट्रातील संताचा हेतू लोकशिक्षण, लोकोद्धार, सामान्यजनांची धर्मप्रवणता, तीर्थयात्रा, ज्ञानार्जन, अर्थार्ज्न मनुष्य स्वभावातील कुतूहल असे विविध स्वरुप प्रवासाचे व प्रवास वर्णनाचे होते. कालापरत्वे यास उपदेशपर माहितीपर वृत्तांतपर असे स्वरुप येत गेले. इ.स. १९५० आसपास, कै. अनंत काणेकरांपासून प्रवासवर्णन या वाङ्.मय प्रकाराची आगळी वेगळी खास वैशिष्ट्ये लेखनातून जाणवू लागली. निसर्ग सौंदर्यावर धुंद होऊन ते केवळ वर्णन न राहता तो निसर्ग गुरु बनून मनात ठसला व त्याने शिकविलेल्या अनेक गोष्टींनी शब्दरुप घेतले. ते उपदेशपर नव्हे तर स्वानुभवाचे बोल, नवी जाणीव म्हणून माणूस हे जगातील सर्वांत मोठे आश्चर्य आहे याचा शोध प्रवास वर्णनात लागू शकतो.

## ४.१५ मराठीतील प्रवास वर्णनाची परंपरा :

माणसाची प्रवासाची हौस सनातन आहे. माणसाच्या जिज्ञासूवृत्तीत तिचा उगम आहे. कालानुरुप प्रवासाचे हेतू नकळत राहतात चौफेर जग न्याहाळण्याची माणसाची मनीषा अनेक मर्यादामुळे व्यावहारिक अडचणीमुळे पूर्ण होत नाही तरीही त्याची प्रवासाची धडपड सतत चालूच असते. प्राचीन काळी प्रवासाची साधने उपलब्ध नव्हती. असुरक्षितता, जिकीरीचा प्रवास चोर-लुटांरुपासून नित्य धोका. इत्यादी अडचणीचे डोंगर पार करुन प्रवासी प्रवास करीतच असत.

जीव धोक्यात घालून अशाप्रकारे करण्यात येणाऱ्या प्रवासामागील हेतू भिन्न होते. "धर्म प्रवणता" हा वेदकाळापासून चालत आलेला उद्देश प्रामुख्याने दिसून येत असे. गृहस्थाश्रमातून मुक्त होऊन 'तीर्थयात्रा' मजल दरमजल करीत केली जात असे. परंतु त्या काळीही केवळ "धर्मप्रवणता" हे एकच कारण नसून जगाच्या व जीवनाच्या वैचित्र्याबद्दलची माणसाची मूलभूत ओढ, कुतूहल हेही कारण होते. प्रवासाच्या वाटचालीतील अनुभवाची शिदोरी माणूस रसिकासमोर सोडू इच्छितो ही आविष्काराची उर्मीच प्रवासवर्णनपर लेखनामागील प्रेरणा असते.

मराठी साहित्यातील प्रवासवर्णनपर लेखनाची सलग परंपरा, मध्ययुगीन वाङ्.मयातील "तीर्थावळीचे अभंग" नित्य नवे यश, विजय संपादन करण्याच्या अभिलाषेने वारंवार मोहिमा काढणाऱ्या मराठ्यांच्या बखर वाङ्.मयातही आढळते. पुढे इंग्रजांच्या अमदानीत सोयी उपलब्ध झाल्याने प्रवास करणाऱ्यांनी आपल्या अनुभवाच्या नोंदी करण्यास सुरुवात केली. त्यातूनच प्रवासवर्णनपर लेखनाचे नवे दालन मराठी वाङ्.मयात उघडले गेले. जाणिवपूर्वक प्रवासनुभवाने लेखन करण्याचा पहिला मान वाईकर गोडसे भटजीच्या "माझा प्रवास" (१८५७) व नंतर गोविंदा आबाजी जोशीचे 'माझी प्रवांसाची हकीकत' या प्रवास वर्णनपर पुस्तकांना मिळतो. गोडसे भटजी हे वैदिक ब्राह्मण द्रव्यार्जनाच्या इच्छेने देशाटनास निघाले. त्यावेळी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रत्यक्ष हकिकतीचे चित्रण आले आहे. इंग्रज व एतूद्देशीय यांच्यामधील संघर्ष त्यांनी "माझा प्रवास" मध्य टिपला आहे. "इंग्लडातील प्रवास" हे भाषांतरित केलेले प्रवास वर्णन (१८३५) हा पहिला ग्रंथ मानला जातो. पत्ररुपाने लिहिल्या गेलेल्या या ग्रंथात माहिती, ज्ञान, मनोरंजन इंग्लंडातील लोक जीवनाचा सूक्ष्म साक्षेपी अभ्यास असून त्यात रंजकताही आहे.

मराठीतील पहिली प्रवासवर्णन लिहिणारी लेखिका म्हणून पंडिता रमाबाईचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. एका प्रदीर्घ पत्ररुपाने "इंग्लंडचा प्रवास" हा छोटा ग्रंथ त्यांनी लिहिला. एका भारतीय ध्येयवादी स्त्रीचा प्रवास, एका प्रवासवेड्या परंतु वनवासीनीचा प्रवास असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उत्कट जिवंत प्रवासवर्णनातून दिसते. तसेच इ.स.१९१९ च्या सुमारास लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय सभेच्या कामानिमित्ताने मद्रास, सिलोन, ब्रह्मदेश येथे केलेल्या प्रवासाचे वर्णन आहे. यामध्ये एक सामाजिक कार्यकर्ता, संशोधक आणि पंडित तसेच भाष्यकार म्हणून लोकमान्यांचे दर्शन घडते. जागतिक प्रवास करणारी पहिली स्त्री सौ. पार्वतीबाई चिटणीस यांनी 'आमचा जगाचा प्रवास' मधून जगाच्या दर्शन घडविले आहे. याशिवाय ग.स.मराठे यांनी आपल्या या 'थालीपिठा' या प्रवासवर्णनात रसिक वाचकांसाठी विनोदाची झालर निर्माण केलेली आहे. याशिवाय प्रा. गो.चि. भाटे यांनी प्रवासवर्णनाचे लेखन केले आहे.

मराठीतील प्रवासवर्णनाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा १९४० च्या पुढे अनंत काणेकरांच्या 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' पासून सुरु होतो. 'आमची माती आमचे आकाश', 'निळे डोंगर तांबडी माती', 'सोनेरी उन्हात पाचूची बेट', 'गुलाबी प्रकाशात बोलक्या लेखण्या', इत्यादी प्रवासवर्णने लिहिली या प्रवासवर्णनपर पुस्तकांच्या शीर्षकातच काव्यात्मकता, ज्ञानेंद्रियाने घेतलेला निसर्गाचा आस्वाद जाणवतो. त्यांच्या वर्णन शैलीतून रसिक कलांवत, पत्रकार, राजकारणी जाणवत राहतो. बहुश्रुतता, विनोद निर्मिती, मानवतावाद, रसनिर्मिती ही वैशिष्ट्ये काका कालेलकर यांनी हिमालयातील प्रवास, 'आमच्या देशाचे दर्शन', 'जीवन लीला', 'भारत दर्शन' ही राष्ट्रवादाच्या प्रेरणेतून लिहिलेली प्रवासवर्णने भारतीय संस्कृती, भारत भक्तीचा आविष्कार होत. स्पर्श, रस, गंध, स्वाद संवेदनानी व चिंतनशील मनाने केलेली ही जिवंत प्रवासवर्णने आहेत.

ना.गो.चाफेकर, कमला फडके, चिं.वि.जोशी, गो.नी. दांडेकर हे या कालखंडातील काही प्रवासवर्णनकार, १९५१ नंतर पु.ल.देशपांडे, प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ, इत्यादी प्रतिभावंत लेखकांनी प्रवासवर्णनास कलात्मक रुप देऊन हे दालन समृद्ध केले. या प्रवासवर्णनात रा.भि.जोशी यांनी वेगळी वाट चोखळली. त्यांच्या आस्वाद लेखनातून प्रवासवर्णनपर या वाङ्मय प्रकाराचे रुप बदलते. 'वाटचाल', 'मजल दरमजल', 'घाट शिळेवरी उभी', ही त्यांची प्रवासवर्णनपर पुस्तके गुणात्मक विपुलतेने समृद्ध मानली जातात. कलासक्त मनाने प्रभावी व प्रत्ययकारी खंडात अशी प्रवासवर्णन या काळात अनेक लेखकांनी या वाङमय प्रकारात प्रवासवर्णने लिहून या  मोलाची भर घातली. श्री. माधव गडकरी 'असा हा महाराष्ट्र', 'मुंबई ते मॉस्को व्हाया लंडन', सोनारे बंगला, शिरुभाऊ लिमये, कवी वसंत बापट यांचे अखंड भारत भ्रमंतीवर आधारित, प्रवासवर्णन, पु.ल.देशपांडे 'पुर्वरंग', 'अपूर्वाई', तर प्रभाकर पाध्यांचे 'तोकोनोमा', ही लेखकांच्या वैशिष्ट्यानुसार, व्यक्तिमत्त्वानुसार रेखाटली गेलेली प्रवासवर्णने मराठी वाङ्मयात मैलाचे दगड होऊन राहिली. गाडगीळांच्या 'साता समुद्रापलीकडे' ने रुढ पद्धतीहून लेखनाचे वेगवेगळे रुप घेऊन वेगळी लेखन पद्धती अवलंबिली यामुळे प्रवासवर्णन या साचेबंद, रुक्ष लेखन प्रकाराला कलात्मक स्वरुप आले.

मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनाचा हा प्रवास पुढील काळात प्रवाहित राहिला, अरविंद गोखले, जयवंत दळवी, डॉ. वसंत अवसरे, रमेश मंत्री, जादूगार रघुवीर, बाळ गाडगीळ, महादेवशास्त्री जोशी, आचार्य अत्रे, काकासाहेब गाडगीळ, श्रीपाद जोशी, ज्ञानेश्वर नाडकर्णी इत्यादी अनेक नामवंत लेखकांनी केलेल्या लेखनाने मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनास बहर आला प्रारंभ झाला धर्मप्रवणता, अध्यात्मिकता, या हेतूबरोबर अनुभव, ज्ञान, निरीक्षण यांचाही समावेश त्यात होता. प्राचीन काळापासून प्रवासविषयक भूमिका केवळ मनोरंजन नव्हते तर ज्ञानर्जन, अनुभव, जिज्ञासातृप्ती अशी विशाल दृष्टी दिसून येते. आधुनिक काळात मनोरंजन हे प्रवासाचे बाह्यांग असते. तरी मूलतः जगाचे वैचित्र्य जीवनाचे वैचित्र्य जाणून घेण्याची माणसाची सुद्धा इच्छा तो प्रवासाद्वारे पूर्णतेस नेण्याचा प्रयत्न सतत करीत असतो. प्रवासाने शरीर मन उल्हासित होते. विविध देश, चालीरिती मनुष्यस्वभाव यांच्या अनुभवांनी बुद्धी मन यांचा विकास होतो. बहुश्रुतता, रसिकता या गुणांनी व्यक्तिमत्त्व समृद्ध बनते. ज्या प्रतिभावंत लेखकांनी प्रवासाचे बोलके, जिवंत अनुभवाचे चित्रण केले त्यामुळे रसिक वाचकास प्रत्यक्ष प्रवासाचा, त्यातील अनुभवांचा साक्षात्कार होतो.

❖❖❖❖

# ५. तोकोनामा - प्रभाकर पाध्ये
# (प्रवासवर्णन)

# ५

# तोकोनामा - प्रभाकर पाध्ये
# - लेखक परिचय :

**घटक रचना :**

५.१ प्रस्तावना
५.२ प्रभाकर पाध्ये यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष
५.३ 'तोकोनामा' या प्रवासवर्णनातून जपानी संस्कृतीचे दर्शन
५.४ प्रभाकर पाध्ये यांची निवेदनशैली
५.५ संदर्भ

## ५.१ प्रस्तावना

प्रभाकर आत्माराम पाध्ये यांचा जन्म ४ जानेवारी १९०९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील लांजे या गावी झाला. त्यांनी रत्नागिरी, पुणे, मुंबई या ठिकाणी शिक्षण घेतले १९३२ साली मुंबई विद्यापीठातून इतिहास व अर्थशास्त्र या विषयात बी. ए. ही पदवी प्राप्त केली.

प्रभाकर पाध्ये हे पत्रकार, कथाकार, प्रवासवर्णनकार, ललित निबंधकार, सौंदर्यमीमांसक आणि विचारवंत अशा अनेक नात्यांनी संबध महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. पाध्ये यांनी सर्वप्रथम 'प्रतिभा' पाक्षिकात प्रूफरीडर म्हणून काम करण्यास सुरूवात केली. लवकरच ते 'चित्रा' साप्ताहिकाचे उपसंपादक झाले. १९३८ ते १९४५ या काळात 'धनुर्धारी साप्ताहिकात तर १९४८ ते १९५३ या काळात 'नवशक्ती' दैनिकांचे ते संपादक होते. प्रारंभीच्या काळात पाध्यांवर मार्क्सवादाचा खोल प्रभाव होता. पुढे तो नाहीसा झाला.

पाध्यांनी त्यांच्या जीवनात विविध महत्त्वाची पदे भूषविलेली आहेत. १९५० साली गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे १९५२ साली ते मराठी पत्रकार संमेलनाचे अध्यक्ष झाले. जून १९५३ ते जून १९५५ या काळात 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रिडम' मुबई चे कार्यवाह झाले. 'कॉग्रेस फॉर कल्चरल फ्रिडम' च्या आशियाई कार्याचे कार्यवाह झाले. १९६७ मध्ये पुण्याच्या 'सेंटर फॉर इंडियन रायटर्स' चे संचालक झाले. पुणे विद्यापीठाचे वृत्तपत्र व संज्ञापन विभागात मानद प्राध्यापक म्हणून दहा वर्ष काम केले. १९६३ साली अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापाठाता अभ्यासगत विद्यार्थी म्हणून त्यांना चार महिने वास्तव्य करण्याचीही संधी मिळाली.

प्रभाकर पाध्ये १९३५ सालापासून त्यांच्या मृत्युपर्यंत म्हणजे १९८४ पर्यंत एक अर्धशतकभर सातत्याने लेखन करीत होते. एक साक्षेपी संपादक म्हणून म्हणून जसे ते गाजले त्याप्रमाणेच नवकथेपूर्वीचा कथालेखक आणि पुढे नवे नवे देश, नवी नवी माणसे आणि वेगवेगळ्या संस्कृतीत त्यांनी नाव मिळविले. पाध्ये यांना माणूस आणि त्याचे विविध सांस्कृतिक आविष्कार यामध्ये मुळातच रस होता; म्हणून त्यांच्या हातून वेगवेगळ्या प्रकारचे ललित आणि वैचारिक लेखन झाले हे लेखन मराठीच्या साहित्य संभारात आणि संस्कृतीविषयक विचारात मोलाची भर घालणारी आहे.

आजकालाचा महाराष्ट्र (१९३५) हे श्री. दा. टिकेकरांच्या सहकार्याने लिहिलेले शिवाजीच्या काळापासून पहिल्या महायुध्दापर्यंतच्या काळाचा सामाजिक, बौध्दिक, राजकीय जीवनाचा वेध घेणारे पुस्तक. त्यानंतर 'पाकिस्तान की पन्नास टक्के ? (१९४१) 'समाजवाद्यांचा पुनर्जन्म' (१९५२), 'बर्ट्रांड रसेल', 'ट्रॉटस्की। 'मॅक्स ईस्टमन', वाम मल्हार जोशी, जयप्रकाश नारायण या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना आकर्षण होते. पाध्यांनी ललित लेखनाची सुरूवातही लवकरच केली. व्याधाची चांदणी (१९४४), 'कृष्णकमळींची वेल' (१९४५) हा कथासंग्रह झाला. 'संध्याकाळच्या सावल्या' (१९४५). 'चिवराची फुले' (१९७८), 'अगस्तीच्या अंगणात', 'मैत्रीण' (१९६५), तोकोनामा (१९६१), मर्ढेकरांची सौदर्यमीमांसा (१९७०), कलेची क्षितीजे (१९४२) या त्यांच्या पुस्तकाला मर्ढेकरांनी प्रस्तावना लिहीली होती. 'सौंदर्यानुभव' (१९७९) या ग्रंथास साहित्य अकाद्मी पुरस्कार प्राप्त झाला. त्यातून नैतिक मूल्यांचा आग्रह व्यक्त होतो आणि त्यामुळे त्या सर्वामध्ये एक प्रकारची आंतरिक सुसंगती आहे.

प्रभाकर पाध्ये यांना त्यांच्या साहित्य सेवेबद्दल अनेक पुरस्कारही लाभले. पाध्यांच्या "तोकोनाम", 'मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा' आणि 'व्यक्तिवेध' या पुस्तकांना उत्कृष्ट वाङ्‌मय निर्मितीबद्दलचे राज्यपुरस्कार मिळाले. 'सौंदर्यानुभव' या पुस्तकासाठी साहित्य अकाद्मीचा पुरस्कार लाभला. त्याचप्रमाणे मुंबई मराठी पत्रकार संघाचे सन्माननीय सभासदत्त्व (१९८०-८१) त्यांना मिळाले आणि बृहन्मुंबई महानगर पालिकेकडूनही त्यांना गौरवण्यात आले. अशा या अत्यंत प्रतिभावान साहित्यिकाचा मृत्यू २२ मार्च १९८४ साली झाला.

## ५.२ प्रभाकर पाध्ये यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष :

"तोकोनामा" वाचल्यानंतर प्रभाकर पाध्ये हे समर्थ, प्रतिभाशाली लेखक आणि जवळजवळ अर्धे अधिक जग फिरणारा फिरस्ता केवळ सौंदर्यगानाच्या प्रेरणेतून आपले अखंड लेखन करतो, असे रसिकाला आढळल्यावाचून राहत नाही. पाध्ये म्हणतात, "एखादा देश तुम्हाला आवडतो त्याचे कारण तेथले नैसर्गिक वा मानवनिर्मित सौंदर्य, पण एखाद्या देशाच्या प्रेमात तुम्ही पडता त्याला कारण मात्र तेथले लोक. फिलीपिन्सवर माझे प्रेम जडले आहे." (अगस्तीच्या अंगणात - 'मनिला')

अशा अनेक देशांच्या प्रेमात पडून, त्या देशांच्या सौंदर्याने प्रेरित होऊन प्रभाकर पाध्यांनी आपले प्रवासलेखन इ.स.१९५४ पासून इ.स.१९६४ पर्यंत सतत केले आहे. 'नवे जग नवी क्षितिजे' (१९५४), 'अगस्तीच्या अंगणात' (१९५७), 'उडता गालिचा' (१९५९), "तोकोनामा" (१९६१) 'हिरवी उन्हें' (१९६४) या सर्व प्रवासवर्णनांवरून पाध्ये युरोपातील

मार्शल टिटोचे युगोस्लाव्हिया व इतर देश, कोलंबो, पाकिस्तान, जपान, उत्तर भारत, बँकॉक, हाँगकाँग, कारिओका, रिओ, ब्रासीलिया इ. देशांमध्ये फिरल्याचे स्पष्ट कळून येते.

पाध्यांची प्रवासवर्णने त्यांच्या नावावरून त्यांची सौंदर्यदृष्टी व्यक्त करणारी आहेत. सौंदर्यात्मक रूपाच्या जाणिवने प्रवासलेखन करणाऱ्या लेखकांत पाध्ये एक अग्रगण्य लेखक वाटतील. पाध्यांनी तर नमूद केलेले सर्व देश फिरून त्यांचे तेथील माणसे, तेथील स्थळे, हॉटेले, झाडे, रस्ते, वास्तू, शिल्पे, यांचे दर्शन प्रत्ययकारी रीतीने घडविले आहे.

त्यातून अनेकदा एखाद्या थोर कवीचे दर्शन होऊन जाते. अनेकदा त्यांच्यातला विशुध्द माणूस दिसतो. अनेकदा त्यांच्यातला कथाकार भेटतो. तसेच पत्रकार, भाष्यकार, सामोरा येतो आणि अनेक कलांचा जाणता चिकित्सक, सौंदर्यपिपासू, रसिक, एक प्रवासी म्हणून या सर्वच प्रवासलेखांतून जाणवत राहतो. “तोकोनामा” ही त्याला अपवाद नाही.

“तोकोनामा” हे प्रवासवर्णन जपानवरील प्रवासवर्णन आहे. त्याची एकूण पंधरा प्रकरणे आहेत. परंतु त्यापैकी सात प्रकरणांचाच अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत. (१) आतामी (२) संक्षिप्त गेशा (३) भेट (४) चंद्रोत्सव (५) किओटो (६) टोकिओ (७) चेरीचा मोहर.

“तोकोनामा” या नावातच त्याचा प्रदेशातला आहे, या पुस्तकाचे नाव “तोकोनामा” आणि तो शब्द जपानच्या गृहरचनेतील सौंदर्यदृष्टीचे प्रतीक वाटावा असा आहे. याबाबत पाध्ये म्हणतात, “जपानी घरांच्या खोल्यांत, निदान आगतस्वागताच्या खोलीत कोनाकडे भिंतीला, एखाद्या लांबरूंद कोनाड्यासारखा भासणारा, एक भाग असतो. त्यांत खाली एका चौरंगावर अगर पाटावर एक पुष्पपात्र असते. पुष्पपात्रांच्या मागे, भिंतीला, त्या त्या ऋतुला योग्य असे एखादे निसर्गचित्र अगर चित्ररूप काव्यचरण टांगलेला असतो. या भागाला “तोकोनामा ” म्हणतात.

हे पुस्तक सौंदर्यदृष्टीने लिहिलेले आहे याची चुणूक या नावातच मिळते आणि या पुस्तकाच्या प्रकरणांची नावेसुध्दा काव्यात्मक, तसेच सूचक व त्या त्या प्रदेशाचा आत्मा सुचविणारी असून, एकूण प्रवास वर्णनातून जपानचे व त्या जपान मध्ये हरवून गेलेल्या पाध्यांच्या उत्कृष्ट चित्र इथे पाहयला मिळते.

या पुस्तकाच्या प्रकाशकांचे प्रारंभीचे पत्रही खूप बोलके आहे. या पुस्तकाच्या कवितेसारख्या  धुंदीत झालेल्या निर्मितीवर ते प्रकाश पाडून जाते. श्री. भटकळांच्या या पत्रातून प्रवासवर्णनाची निर्मिती ही इतर कलांच्या निर्मितीसारखीच आंतरिक प्रेरणेतून आणि पाहिलेल्या प्रदेश प्रत्ययाच्या विलक्षण धुंदीतून दोन-तीन वर्षे सतत होत राहते याचा स्पष्ट पुरावा मिळतो. प्रवासवर्णन ही एक कला निर्मितीच असते यावर प्रकाश पडतो आणि नावाचाही उलगडा होतो.

स्वतः पाध्ये या पुस्तकातील लेखनप्रक्रियेबद्दल म्हणतात, “या पुस्तकात काही मित्रांचा आणि मैत्रिणींचा उल्लेख आहे. या उल्लेखांतला प्रत्येक शब्द आणि अभिप्राय परमार्थाने घेतला जाणार नाही अशी आशा आहे. तर लेखनाच्या प्रक्रियेत मूळचे उद्गार आणि मूळचा स्वभावरेखा यांचे संक्रमण झालेले असणार.”

इ. स. १९६१ साली पाध्ये प्रवासवर्णनातील, निर्मितीप्रक्रियेबद्दल वरील उद्‌गार सहज काढून जातात, हे लक्षणीय आहे. प्रवासवर्णन या वाड.मयप्रकारात निर्मितीच्या वेळी 'प्रत्यक्षावर कल्पकतेचे कलम' होत असते, त्याचा हा स्पष्ट पुरावा होय.

या पुस्तकाचे रूप लेखरूप प्रवासवर्णन असेही होऊ शकते आणि एक मोठे प्रदीर्घ लेखरूप प्रवासवर्णनही वाटू शकते. याचे प्रमुख कारण जपानवरील अनुभूतीने ह्या प्रवासवर्णनाचे सर्वच पट विणलेले आहेत. परंतु 'चेरीचा मोहर' हे प्रकरण या पुस्तकात उपरे वाटते. बाकीच्या प्रकरणात एक प्रकारची सलगता व अंतःस्थ सूत्रबध्दता सतत जाणवत राहते.

या पुस्तकाचा प्रत्येक लेख क्वचित 'टोकिओ' वगळता एक एक स्वतंत्र कलाकृती होईल आणि सर्वच पुस्तक एक मोठी, सूत्रबध्द सलग आकाराची कलाकृती म्हणून उभी राहू शकेल. इतके या कलाकृतीचे पोत एकमेकांत दाटपणे मिसळलेले आढळून येतील. उदा. 'अतामी', 'भेट' इ. प्रकरणे प्रत्येकी एक स्वतंत्र कलाकृती म्हणून उभी राहू शकतात. तशीच ती एकंदर पुस्तकाचा भाग वाटून जातात. एखादी खंडाखंडातील प्रदीर्घ कविता असावी तसे हे प्रवासवर्णन आहे.

'तोकोनामा' तील प्रवास हा घटक त्याचा एक अविभाज्य घटक आहे. पाध्यांनी जपानच्या अंतरंगात शिरून तेथील पाहिलेल्या रस्त्यांच्या वळणाचे, बाजाराचे, चिडाच्या वृक्षांचे, हॉटेलांचे, स्नानगृहांचे, खाणावळींचे, बार व गर्दी आदींचे चित्र काढले आहे. हा प्रवास कसा केला, कोणत्या गाडीने केला, केव्हा केला याची फारशी माहिति देत किंवा प्रवासाची तयारी वगैरे सांगत पाध्ये बसत नाहीत. ते साक्षात फिरतात. तेथील अनुभवलेला प्रदेशच त्यांच्या वैशिष्ट्यांसहित चित्रित करतात. त्यामुळे वर्णनाला जी सूक्ष्मता व कलात्मकता येते ती लक्षणीय होय. हा जपान बराचसा प्रा.हर्बार्ड पासीन या जपानी मित्राबरोबर ते फिरले आहेत. भाषेच्या अडचणीला दाद न देता ते फिरत असतात आणि आपल्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीने दृश्ये टिपत जातात. कारण, प्रवास हा त्यांचा स्थायीभाव वाटावा अशी प्रवासी वृत्तजी ते "तोकोनामा" त व्यक्त करतात.

## ५.३ 'तोकोनामा' या प्रवासवर्णनातून जपानी संस्कृतीचे दर्शन

जपान तिच्या सौंदर्यातून जसा जाणवतो, तसाच तिच्या स्वैराचारी जीवनाच्या विरोधाभासातूनही जाणवतो, "तोकोनाम" च्या संदर्भात या विधानाचा परामर्श.

आजवरच्या 'प्रवास वर्णन' या वाड्.मयप्रकाराच्या वाटचालीतील 'तोकोनामा' हे सौंदर्यवादाचे एक शिखर आहे, असे वसंत सावंत यांनी म्हटले आहे. 'तोकोनामा' हे जपानवरील प्रवासवर्णन असून ते प्रास्ताविकाचा भाग सोडून २१० पानांचे आहे. त्याची एकूण पंधरा प्रकरणे आहेत.

जपानी घरांच्या खोल्यांत, निदान आगतस्वागताच्या खोलीत, कोनाकडे भिंतीला, एखादा लांबरूंद कोनाड्यासाखा भासणारा एक भाग असतो, त्यात खाली एका चौरंगावर अगर

पाटावर एक पुष्पपात्र असते. पुष्पपात्राच्या मागे, भिंतीला, त्या त्या ऋतूला योग्य असे एखादे निसर्गचित्र अगर चित्ररूप काव्यचरण टांगलेला असतो. या भागाला ‘तोकोनामा’ म्हणतात.

हे पुस्तक सौंदर्यदृष्टीने लिहिलेले आहे, याची चुणूक या नावातच मिळते आणि या पुस्तकाच्या प्रकरणांची नावेसुध्दा काव्यात्म, तसेच सूचक व त्या त्या प्रदेशाचा आत्मा सुचविणारी असून, एकूण प्रवासवर्णनातून जपान, जपानी माणूस, त्याची सौदर्यदृष्टी, कलेची आवड, जपानी संस्कृती, तिथला निसर्ग यातील संगती-विसंगती यांचे उत्कृष्ट चित्र इथे पाहयला मिळते. या संदर्भात चंद्रकांत वर्तक म्हणतात.

“‘तोकोनामा’ मधला जपान हा देश राहिला नसून एक स्वभावचित्र बनला आहे. त्या स्वभावचित्रांचा आविष्कार त्याच्या अनेकविध प्रवृत्तीसकट-निसर्ग, धर्म, पौर्वात्य प्रकृती, श्रध्दा, क्रौर्य, जुगुत्सा, ह्या सर्वासकट झाला आहे. माणसाचा स्वभाव जसा संगती-विसंगतीने भरलेला असतो, त्याप्रमाणे सारा जपानही आहे, आणि तोच संगतीविसंगतीसह ह्या पुस्तकात रूपाला आला आहे. ”

‘तोकोनामा’ तील जपान हा वस्तुनिष्ठ रीतीने व भौगोलिक रीतीने सांगितलेला जपान नव्हे. तो तेथील प्रवासात जाणवलेला जपान आहे आणि हे जाणवणे लेखकाने या प्रवासवर्णनात प्रत्येक प्रकरणात चित्रित केले आहे. हा जपान मधुचंद्राचे अभिजात ठिकाण असलेल्या ‘अतामी’ च्या सौंदर्यातून जसा जाणवतो. तसाच तिच्या स्वैराचारी जीवनाच्या विरोधाभासातून जाणवतो. ‘अतामी’ वर मानवी भावनांच्या आरोप साधून लेखकाने तिला जणू सुंदर स्त्रीरूप बहाल केल्याचे दिसून येईल जपानचे अतिथ्य, जपानची व्यापारी वृत्ती, जपानची वास्तूकला व रचनावृत्ती याचेही दर्शन इथे होते.

“तोकोनामा” तील जपान संस्कृती-विकृती, सुंदरता-कुरूपता अशा संगती विसंगतीने भारलेला आहे. तसाच जपानी माणूस हा उद्यमशील, राजभक्त, हाडाचा रचनाकार, निसर्गभक्त अबोल कळला तरी न कळणारा, अनुकरणप्रिय, जात्याच फिरस्ता, व्यापारी वृत्तींचा, रसिक, कलाप्रिय, गर्दीचा प्रियकर, जाहिरात बाजी करणारा, साहित्यभक्त। देवभोळा, भूतवेडा, कुस्ती खेळणारा, आतिथ्यशील, कचित वेश्यावृत्तीचा, दारू, स्त्री पाचिको, जुगार अशी व्यसने असलेल। तरीही या व्यसनांकडे उदात्त वृत्तीने पाहणारा, पैश्याचा लोभी, परमभंगादी दुःखाने व स्वाभिमानार्थ आत्महत्या करणारा, भोगी तसाच त्यागी म्हणून या पुस्तकात जाणवत राहतो. आणि जपानी माणसाचे चित्र या प्रदेश प्रत्ययातून समोर येते.

अशा प्रकारे ‘तोकोनामा’ या प्रवासवर्णनातील जपान, जपानी माणूस, जपानी सस्कृती तिच्या सौंदर्यातून जशी जाणवते, तशीच तिच्या स्वैराचारी जीवनाच्या विरोधाभासातूनही जाणवते, असे म्हणता येईल.

## ५.४ प्रभाकर पाध्ये यांची निवेदनशैली :

प्रभाकर पाध्ये यांचे ‘तोकोनामा’ त होणारे दर्शन म्हणजे ते एक रंग, रूप, स्पर्श, गंध, नाद या संवेदना तीव्रतेने जागृत करणारे उत्कट कवी वाटतील, श्रेष्ठ निवेदक व कथाकार

वाटतील, व्यक्तिचित्रकार वाटतील, रसिक फिरस्ते वाटतील आणि वास्तूशिल्पांचे जाणकार, भाष्यकार असा एक वेगळ पैलू या व्यक्तिमत्त्वात असल्यामुळे पाध्यांची निवेदनशैली एकाच वेळी कवीची, कथाकाराची, भाष्यकाराची वाटते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. या व्यक्तिमत्त्वात राजापुरी कोकणी माणसाचा एक सहज मिळाला आहे. आणि या माणसाला जात्याच माणसाइतकी निसर्गाची स्वाभाविक ओाढ आहे. असे या प्रवासवर्णनात सतत जाणवत राहते. पाध्यांना 'तोकोनामा' त जपानचा निसर्ग व त्याची जपानी कलादृष्टीतून केलेली विशेष जोपासना, रचना व त्यातील त्यांची सौंदर्यसृष्टी बरोबर शब्दांत प्रकट केली आहे.

पाध्येंची निवेदनशैली एका उत्कट कवींची वाटते याची असंख्य उदाहरणे 'तोकोनामा' त जागोजाग सापडतात. उदा. 'अतामी' चे वर्णन.

'अतामी' हे मधुचंद्राचे अभिजात ठिकाण आहे. निसर्गानेच अतामीची तशी योजना केलेली आहे. आपल्याकडून तिला काही कमी पडू नये अशी त्याने शक्य तितकी काळजी घेतली आहे. जपानचा रिव्हिएरा म्हणून प्रसिध्द असलेल्या भागांतील एक नितांतसुंदर खोऱ्यात अतामी वसलेली आहे. तीन बाजूंना तीन तऱ्हांनी पसरलेल्या डोंगरांनी तिला कुशीत घेऊन कुरवाळीली आहे आणि चौथ्या बाजूला समुद्र तिच्या पायाशी येऊन चूर झाला आहे. या डोंगरावरील वनश्रीकडे टक लावून अतामी पाहते तेव्हा तिचे डोळे हिरव्या स्वप्नांनी मुग्ध होतात आणि ती समुद्राच्या निळ्या विस्तारावर दृष्टी फेकते तेव्हा तिची नजर विस्फारते. एकीकडे डोंगरावरील आकाशरेषेबरोबर ती आंदोलित होते तर दुसरीकडे क्षितीजावरील जहाजंबरोबर ती स्थिरावते. समुद्र आणि डोंगर यांच्याबरोबर नजरबंदीचे खेळ खेळ असतानाच मधल्या ओढ्यांच्या काठांनी ती आपला व्यवहार मांडते आणि मग या व्यवहाराने थकलेले शरीर उष्ण झरयांच्या हौदात आरामाने झोकून देते. उन्हाळी झरे हे अतामीचे वैभव आहे. बारा महिने तेरा काळ या वैभवाच्या विलासात ती दंग असते. त्यांच्या दरवळलेल्या उन्मादक गंधात मस्त असते.

अतामी ही एखादी मानवी स्त्रीरूप व्यक्ती आहे असा भास निर्माण करून तिचे रूप रेखाटले हे कवीच्या शैलीशिवाय अशक्य होय. पाध्यांची सतत सौंदर्य टिपणारी लेखणी 'चंद्रोत्सवा' च्या वेळी छाया प्रकाशाचा खेळ टिपते त्यामध्ये निसर्गाशी एकजीव होणारे पाध्ये यांचे कवीमनच दिसून येते. छायाप्रकाश शब्दांत पकडण्यांचे लेखकाचे सामर्थ्य इथे दिसते. त्यामुळेच पाध्ये एक उत्कृष्ट शब्दचित्र रेखाटणारे निवेदनक म्हणून लक्षात येतात. पाध्यांची भाषाशैली अभिजात संस्कृती साहित्याच्या परिशीलनाने नटली आहे हेही सहजगत्या कळून जाते.

पाध्यांच्या मनात जपानचे स्थान 'तोकोनामा' सारखे आहे. सगळे देश पाहिले, पण जपानने मनात हे स्थान निर्माण केले. जसे काय त्यांच्या मनात भिंतीवर जपानचे मानचित्रच रेखाटले आहे. हे चित्र रेखाटताना विविध तऱ्हांनी कलात्मकतेचा अविष्कार झाला आहे. काय सांगू आणि किती सांगू अशा भावनेने पाध्यांचे निवेदन ओथंबून आले आहेत. आधीच्या प्रवासवर्णनात त्यांचा चिकित्सक स्वभाव काकनभर अधिक, जावणतो. सौदार्ह निर्माण झाल्यावर चिकित्सा थोडीफार बाजूला पडते आणि त्यामध्ये दोषही नसतो. ह्या ओथंबलेल्या भावनेमुळे त्यांचे हे प्रवासवर्णन कधी लघुकथेचे रूप घेते, तर कधी मानवाच्या विविध प्रवृत्तींच्या मुळाकडेच छेद, घेतघेत जाण्याचा हट्ट करताना दिसते. कधी उल्हासित वृत्तींचा प्रत्यय येतो तर कधी विमनस्कतेचा चटका देते. कधी उदावससाणे होते, तर कधी ज्वालेसारखे धगधगते. संथ लयीचा अनुभव देतादेतानाच द्रूत लय धारण करून सूक्ष्म निरीक्षणाची आवर्तने घेत फिरते.

वर्णनाचा सोपा, पसरट पाल्हाळीक मार्ग धरताधरतानाच सूक्ष्म, कठीण, आडवळणी निवेदनाच्चा रस्त्याने जाऊ लागते. संवादी विसंवादी लयीचा फेर धरतानाच वाचकांच्या मनात ते काठोकाठ भरते.

उदा. "अतामी हे मधुच्रदांचे अभिजात ठिकाण आहे" अशी साधीसुधी पण मनात उत्कंठा निर्माण व्हावी अशी सुरूवात करून 'अतामी' ची एकंदर प्रवृत्तीच पिंडच मधुचंद्राला जाणाऱ्या जोडप्याला अनुकूल असा आहे ह्याचे ते वर्णन करतात. डोंगरांनी कुशीत कुरवाळलेली पायाशी चूर झालेल्या समुद्राकडे आणि वनश्रीकडे टक लावून पाहता पाहता मुग्ध झालेली, आकाशरेषेबरोबर नजर विस्फारणारी, उन्हाळी झऱ्यांचे वैभव लूटून विलासात दंग होणारी 'अतामी' डोळ्यासमोर येते, तोच तिथला आठवड्याअखेरच्या दोन दिवसात उभा राहणारा हॉटेलातला संसार, त्याचे व्याप व चेष्टिते नेत्रांच्या मासोळ्यांनी गोड परिचारिकांकडून होणारे स्वागत, साऱ्या गावात होणारा प्रकाशाचा उत्सव ह्यांनी आपल्याला उंच नेतानाच पाध्ये, "अतामी मी अशी जोडप्याने पाहिली नाही, अतामीचा अस्सल अनुभव मला नाही". असे म्हणून एक कलाटणी देतात आणि अधिक उत्कंठा निर्माण होते. लेखाला विरोधीलय मिळते. ह्या विरोधीलयींच्या आवर्तनाच्या फेऱ्यातले अनुभव सामोरे येतात. चहापानाचे निमंत्रण देणारी भासमान, रवीन्द्रनाथ टागोर वाचणारी मुलगी, जिनतानच्या गोळ्या वाटणारे पाध्ये जपानी संस्कृतीचा लोपलेला निर्मळपणा आणि आलेल्या भ्रष्टतेबद्दल कावून बोलणारी वृध्द जपानी प्रोफेसर, असे अनुभव सांगतानाच, वेड्यावाकडया चिडाच्या झाडाजवळ पाध्ये आपल्याला आणतात. ओमिया कानिंगची कहाणी सांगतात - स्मृतिशिलेबद्दल सांगतात, 'अतामी' हा एक ललितनिबंधच होतो. पण त्याचे एवढेच महत्त्व नाही. कारण 'अतामी' मधूनच 'चिडाचा वृक्ष' सारखी एक सुरेख लघुकथा ह्या प्रवासवर्णनात जन्माला येते.

पाध्यांची  निवेदनशैली कवीची आहे तशीच ती प्रवासवर्णनकार, ललितनिबंधकार आणि कथाकाराचीही आहे, तशीच ती एका चिकित्सक भाष्यकाराचीही आहे. 'तोकोनामा' मध्ये ही पाध्यांच्या इतर प्रवासवर्णनात आढळणारी वैशिष्ट्ये हेतच. त्यांच्या मनाला बाजार, दुकाने, हॉटेल्स ह्यांचे एक सदैव जागते असे कुतूहल आहे. ते कुतूहल परिपूर्ण करण्याचा प्रयत्न येथेही आहे. 'टोकिओ' लेखामध्ये त्यांनी व्यवस्थित वस्तीवार पेयगृहे, कॉफीगृहे, आहारगृहे, जुना बाजार, थिएटर्स, सामुराईचे जग, स्ट्रीप चीज् ग्न देहचेष्टिते, सुशीची दुकाने इ. चे दिलखुलास पण चिकित्सक भाष्यपूर्ण वर्णन केले आहे. टोकिओ आणि किओटो या तुलनेचा हा एक छोटा उताराच ते वर्णन कसे आहे हे कळायला पुरेसे आहे.

"गिंझा हे टोकिओचे प्रतीक मानले, तर जिऑन हे किओटोचे प्रतीक मानावे लागेल. रस्त्यातल्या कर्कश गलक्याने टोकिओचे कान किटतात. तर देवळातल्या मंत्र-जागदाने किओटोचे कान ताजेतवाने होतात. टोकिओच्या रंगपटावर जिवंत व्यक्तींची वस्त्रे टरकावून त्यांना बाहुल्या बनविण्याचा उद्योग चालतो, तर मातीच्या बाहुल्यांना जिवंत माणसाची कला आणण्यात किओटोला समर्थक वाटते. अणुस्फोटाच्या विखारी राखेने प्राणास मुकलेल्या एका कोळ्यावर एका दमात सातशे कविता लिहून टोकिओ अमेरिकेचे उपकार फेडते, तर आपली खानदानी दौलत वैमानिक माऱ्यापासून वाचविल्याबद्दल किओटो अमेरिकेच्या लँग्डन वार्नरचे समारक उभारते. टोकिओची टूम अद्ययावत आहे, तर किओटोच्या चाली सनातनी लकब आहे".

**जपानचा निसर्ग व निसर्गभक्ती :** जपान हा अत्यंत निसर्गसंपन्न असा देश आहे. निसर्ग सौंदर्याने नटलेला देश आहे. अशा जपानचे पाध्यांना झालेले पाहिले दर्शन म्हणजे - "झगमगणाऱ्या रत्नांचा गालीचा, किंवा प्रकाशणाऱ्या फुलांचा गालिचा - म्हणजे खरोखर विद्युतदीपांच्या उजळत्या केसरांनी विणलेला गालिचा." जपानच्या निसर्गसौंदर्याचे वर्णन 'तोकोनामा' तील विविध प्रकरणात आले आहे.

'अतामी' च्या निसर्गसौंदर्याचे वर्णन करताना पाध्ये म्हणतात - "अतामी हे मधुचंद्राचे अभिजात ठिकाण आहे. निसर्गानेच अतामीची तशी योजना केलेली आहे. आपल्याकडून तिला काही कमी पडू नये अशी त्याने शक्य तितकी काळजी घेतली आहे. जपानचा रिव्हिएरा म्हणून प्रसिध्द असलेल्या भागांतील एका नितांतसुंदर खोऱ्यात अतामी वसलेली आहे. तीन बाजूंना तीन तऱ्हांनी पसरलेल्या डोंगरांनी तिला कुशीत घेऊन कुरवाळली आहे आणि चौथ्या बाजूला समुद्र तिच्या पायाशी येऊन चूर झाला आहे. या डोंगरावरील वनश्रीकडे टक लावून अतामी पाहते तेव्हा तिचे डोळे हिरव्या स्वप्नांनी मुग्ध होतात आणि ती समुद्राच्या निळया विस्तारावर दृष्टी फेकते तेव्हा तिची नजर विस्फारते. एकीकडे डोंगरावरील आकाशरेषेबरोबर ती आंदोलित होते तर दुसरीकडे क्षितीजावरील जहांजाबरोबर ती स्थिरावते. समुद्र आणि डोंगर यांच्याबरोबर नजरबंदीचे असे खेळ खेळत असतानाच मधल्या ओढ्यांच्या काठांनी ती आपला व्यवहार मांडतो आणि मग या व्यवहाराने थकलेले शरीर उष्ण झऱ्यांच्या हौदात आरामाने झोकून देते. उन्हाळी झरे हे अतामीचे वैभव आहे. बारा महिने तेरा काळ या वैभवांच्या विलासात ती दंग असते - त्याच्या दरवळलेल्या उन्मादक गंधात मस्त असते."

'चंद्रोत्सव,' 'किओटो' यासारख्या प्रकरणांतही जपानच्या समृध्द निसर्गाचे दर्शन घडते. अशा या सुंदर निसर्गावर जपानी माणूस लुब्ध होऊन त्यांच्याशी संधान साधतो, त्याच्याशी युती करतो. यासंदर्भात पाध्ये म्हणतात -

"कियेमिझ्ु हिगाशीयामाच्या अगदी कुशीत आहे. एखाद्या पाखराने आपल्या पिलांना पंखाखाली घ्यावे तसे हिगाशीयामाने कियोमिझूला घेतले आहे. देवळामागचा डोंगर आपले वनराजीने शृंगारलेले हात उभारून उभा असतो आणि तोच, तुमचा आधार असतो. पण एकदा तुम्ही बरा पोचला, देवळासमोरच्या लाकडी कट्टयावर उभे राहिला, मागे वळून चांदई छपरांनी शोभलेल्या वास्तूचे दर्शन घेतले त्याच्या मागे डोलणाऱ्या शेड्यांची टीप घेतली, निसर्गाने दुतर्फा सोडलेल्या पडद्यांची शोभा न्याहाळतील, खालच्या खोऱ्यांत पसरलेल्या मेपलपर्णावर नजर टाकतील, आणि समोर जरा दूर असलेल्या किओटो शहराच्या भव्य विस्तारावरून नजर फिरवतील, कि मद्याची निराशा कोठच्या कोठे पळते, आणि मन शांत, तुष्ट, संतुष्ट होते. स्तब्ध होते. जरा वेळ मुळीच चाळवत नाही. पण मग नजर कट्टयाखालच्या लाकूडकामावर खिळते आणि माणसाने तेथे निसर्गाच्या सानिध्यात केवढे कसब दाखविले आहे याचा बोध होतो. या कट्टयाला आधार देताना जपानी कारागिरांनी आडवे उभे खांब आणि बारे यांचा कसा अजब सांगाडा रचला आहे ते ध्यानात येते आणि तो तयार करताना त्यांनी निसर्गावर मात करण्यापेक्षा निसर्गाशी संधान बांघण्याची दृष्टी कशी वापरली आहे याची साक्ष पटते निसर्गाची किमया आणि मानवाची कामगिरी यांची ही निर्मळ संगती पाहून निसर्ग आणि मानव यांच्या युतीची एक नवीनच प्रतिति येते."

निसर्ग आणि मानव यांच्या युतीचीही प्रतिती पाध्यांना येते कारण जपानी माणूस हा निसर्गभक्त आहे म्हणूनच या आधुनिक युगातही तो चंद्रोत्सव आणि वसंतऋतूतील चेरीचा मोहोराचा उत्सव साजरा करतो. त्यातही पाध्यांना सुंदर आणि कुरूप अशी दोन्ही रूपे पाहयला मिळतात पण तरीही त्यामागची जपानी माणसाची निसर्गभक्ती मात्र सारखीच वाटते.

चेरीच्या मोहोराचे वर्णन करताना पाध्ये म्हणतात - "खरोखरच मंदिराच्या समोर चेरीच्या फुललेल्या फांद्यांच्या अप्रतिम मंडप दृष्टीस पडला. आम्ही त्या मंडपात शिरलो. तर गुलाबी छटांच्या शुभ्रसफेद फुलांचे छत, पायाशी पांढऱ्या स्वच्छ पाकळ्यांचा खर्च आणि मध्ये आमच्या अंगावर चेरीच्या लहरत्या पाकळ्यांचा हिमाच्या भुरभुरत्या वर्षावासारखा वर्षाव! क्षणभर परिकथांच्या विश्वात आल्यासारखेच वाटले."

अशा सुंदर निसर्ग सहवासाची ओढ आपल्या लोकांना नाही. याउलट जपानी माणूस मात्र निसर्गाला आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग मानून आपल्या जीवनात सामावून घेतो अशी तुलना पाध्ये करतात. ते म्हणतात.

"पण क्षणभरच! कारण लगेच मन विचारू लागले. हे दृश्य खरोखरच सुंदर आहे. फुलांच्या नैसर्गिक मंडपाचा, मंडपाच्या लहरत्या तरल वातावरणाचा अनुभव अपूर्व आहे. पण खरोखरच हे दृश्य इतके असामान्य आहे का? आपल्याकडची गुलमोहराची झाडे अशी मोहराने अक्षरशः भरून जात नाहीत काय? जकरंदच्या झाडाचे वसंतात असे संपूर्ण रूपांतर होत नाही काय? अर्थात गुलमोहराच्या ज्वालामय पुष्पसंभाराचे वातावरण निराळे जकंदराच्या निळ्या माथेचे वस्त्र वेगळे. पण चेरीच्या झाडाभोवती जपान्यांनी आनंदाचे, उत्साहाचे, नृत्यगीताचे जे एक वातावरण निर्माण करून ठेवले आहे तसे गुलमोहराभोवती वा पारिजातकाभोवती निर्माण करण्याची आवश्यकता आम्हाला वाटली आहे काय?

आपल्या वाड.मयात वसंतोत्सवाची भरघोष वर्णने आपण वाचलेली आहेत. आपल्या प्राचीन जीवनांतल्या निसर्गप्रीतीची साक्ष त्यातून मिळते. पण ही निसर्गभक्ती जीवनांतून नष्ट होऊन ग्रंथातरी जाऊन बसली आहे, आणि उलट जपान्यांनी निसर्गाचे हे वातावरण जीवनात ओतले आहे, आणि राष्ट्रीय आत्म्याला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांनी त्याला प्राप्त करून दिले आहे."

अशी ही जपानी माणसाची निसर्गभक्ती चेरीच्या मोहराच्या उत्सवाच्या निमित्ताने उएनो पार्कमध्ये व पार्कमधील शिष्टो मंदिरात पाहायला मिळाली पण दोन्ही ठिकाणच्या उत्सवाचे रूप मात्र वेगवेगळे होते. पार्कमधील निसर्गोत्सवात करमणूक, बेदरकारपणा, स्वैराचार पाहायला मिळाला तर मंदिरातील उत्सवात जपानच्या अभिजात संस्कृतीचा आत्मा नांदत आहे असे वाटले. यांचे वर्णन करताना पाध्ये म्हणतात.

"पण बाहेरच्या बेदरकरीचा या आतल्या संस्कारशीलतेशी काही संबंध नव्हता - निदान दिसत नव्हता. जपानी जीवनाची ही दोन रूपे होती. ती परस्परविरूध्द होती. परस्परांशी फटकून वागत होती. जपानी जीवनात अनेकांना आज एक फट पडलेली दिसते, त्याला भेग गेलेली दिसते. त्याचेच हे प्रमाण म्हणावे का? पण उलट या आतल्या आणि बाहरेच्या दृश्यांत एक आंतरिक नाते नाही काय? चेरीच्या अभिमानानेच ही दृश्ये प्रेरित झालेली नाहीत काय? सारांश,

जपानी माणसाला, जपानच्या लाभलेल्या समृध्द निसर्ग सौंदर्याचा अभिमानच आहे, तसेच पाध्यांना सुचवायचे आहे. आणि हा चेरीचा मोहोर जणू जपानी (निसर्ग) सौंदर्यभक्तीला आणि कलात्मकतेला अधिकच मुक्त अवसर देतो.

**जपानी स्त्री :** 'तोकोनामा' या प्रवासवर्णनात जपानच्या साऱ्या प्रदेश प्रत्ययातून जाणवणारा जपानी माणूस जो पाध्यांनी शब्दात पकडला आहे तो विशेष लक्षणीय आहे आणि त्यात वेगळी उठून दिसणारी जपानी स्त्री ही तर त्यांना राष्ट्राची मूर्तिमंत संस्कृतीच वाटते. जपानी स्त्री चे सौंदर्य, तिची चारूता. आदरातिथ्य, शालीनता पाध्यांना खूप भावली आहे. ही गुणवैशिष्ट्ये घरंदाज जपानी स्त्रियांमध्ये आढळून येत असली तरी अशा घरंदाज जगण्यापासून वंचित असणाऱ्या, पेयगृहे, आरामगृहे, गेशागृहे मध्ये आढळणाऱ्या स्त्रियांमध्येही पाध्यांना सेवेची मोहिनी घालण्याची वृत्ती आढळून येते, त्यामगचा त्यांचा उद्देश केवळ पैसा मिळविणे हा आहे, त्यामुळे पूर्वीच्या गेश्या संस्कृतीला आलेले रूप पाहून त्या संस्कृतीबद्दल व या स्त्रियाबद्दलही पाध्यांना कणव वाटते.

जपानी स्त्रीबद्दल वर्णन करताना पाध्ये म्हणतात - "ही किओटोची दृष्टी आहे आणि तिची उभारणी निसर्गावर झालेली आहे. चारूता हाच स्त्रींचा सर्वश्रेष्ठ नैसर्गिक गुण आहे. हेच तिचे मोठे वैभव आहे. पुरूष कितीही शिकला सवरला, सुधारला, शिक्षणाच्या सुधारण्याच्या हेतूने त्याच्या बुध्दीचे कंगोरे पाहून त्याने स्त्रीला कितीही शिकविले, सुधारले, पंडिता करून सोडले तर तिचे नैसर्गिक मार्दव, हास्य यांचाच त्याला खरा मोह असतो. याच गुणांच्या जोरावर स्त्री त्याला धरून ठेवते. जपानने हे नीट ओळखले आहे आणि नेमक्या याच गुणांचा परिपोष त्याने केला आहे. म्हणून तर जपानी स्त्रीचे आकर्षण इतके जबरदस्त आहे. पण त्यातली खरी दृष्टी नैसर्गिकतेची आहे. जपानी स्त्रीच्या या गुणांचा किओटोमध्ये असताना पाध्यांना आलेला अनुभव वर्णन करताना ते म्हणतात - "संस्कृत कवींनी स्त्री ची लतेबरोबर केलेली तुलना किओटोला एकदम मान्य आहे. स्त्री सौंदर्याची शालीनता, विनयशीलता, समर्पितता यांचा त्याने मुद्दाम परिपोष केला आहे. किओटोला एकदा पाच मिनिटांपूर्वी आमच्याशी सुंदर इंग्रजीत भाषण करणारी एका प्राध्यापकाची पत्नी, एकदम दरवाज्याशी जाऊन आम्हांला कष्ट पडू नये व म्हणून आमच्या बुटांची टोके बाहेरच्या दिशेला करू लागली तेव्हा आम्हाला कसेसेच वाटले, आणि आम्ही काही तरी म्हणालो. तेव्हा प्राध्यापकाने विचारले, "तुम्हाला आमच्या जपानमध्ये विशेष काय आवडले?" क्षणभर स्तब्ध राहून मी उत्तरलो, "स्त्रियांची चारूता" ठिक प्राध्यापक उत्तरले, "तुमच्या बुटांची टोके फिरवून ठेवण्यास ज्या शिस्तीने त्यांना शिकविले तिनेच ही चारूता निर्माण केली आहे."

जपानी स्त्रीचे सौंदर्यही पाध्यांना भुरळ घालते. तिचे मासोळीसारखे डोळे, तिचा पेहराव किमोनो, तिच्या हातातील पंखा, तिची चाल, तिचे नेत्रकटाक्ष, याबद्दल पाध्यांनी भरभरून वर्णन केले आहे. एका पेयगृहातील जपानी स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन करताना ते म्हणतात - "वेधक रंगसंगतीच्या पोषाखातील तिची मूर्ती खरोखर सुबक दिसत होती. जपानी स्त्रियांचे गाल गोबरे असतात आणि पाय-पावले बोजड असतात. पण ही मात्र याला अपवाद होती. तिची लहानशी शरीरयष्टी काहीशी किरकोळ होती आणि चेहरा हाडकुळा चौकोनी पण विलक्षण आकर्षक होता. तिची मान जरा उंच होती. पण किमोनोच्या कॉलरने ती काहीशी झाकली होती आणि खाली रूळणाऱ्या तिच्या कुरळ्या केसामुळे तिला खरोखर एक सौंदर्यच प्राप्त झाले होते. जपानी स्त्रियांचे आकुंचित बदामी डोळे गोबऱ्या गालांमुळे आवळले जातात. पण हिच्या डोळ्यांना

हा त्रास होण्याचे कारण नव्हते. तिच्या डोळ्यांच्या निळसर बाहुल्या मोठी तरल हालचाल करीत. या हालचालीबरोबर फडफडणाऱ्या तिच्या पापण्यांची फडफड पाहण्यात आपण एका स्त्रीच्या चेहऱ्याकडे टक लावून बघत आहोत याचा विसर पडे. अशी जाणीव झाली की माझी नजर चोरटी बने आणि ती अभावतःच खाली वळे आणि मग तिची पावले देखील तिच्या चेहऱ्याप्रमाणेच सुंदर आहेत हे ध्यानात येऊन आनंद वाटे."

जपानी स्त्रीची चारूता, तिचे सौंदर्य जसे पाध्यांना भुरळ घालते तशीच एखाद्यावर भरभरून प्रेम करण्याची, सगुण भक्ती करण्याची जपानी स्त्रीची वृत्तीही पाध्यांना गुंतवून टाकते. अशी ही सगुण भक्ती व प्रेम मिसा कियो साकुरायच्या मैत्रीतून व तिच्या भेटी देण्याच्या आणि घेण्याच्या वृत्तीतून पाध्यांना अनुभवायला मिळते. तिने भेट म्हणून दिलेली किओटीची बाहुली, त्या राजस स्त्रीच्या स्नेहाचा सुगंध पाध्यांची स्मृति दरवळून टाकतो आणि त्या दोघांमध्ये एक निर्मळ स्नेहाचा धागा निर्माण करतो.

एकूणच, जपानी स्त्रीच्या सौंदर्याचे पाध्यांना आकर्षण वाटते, तसेच तिच्या गुणांबद्दल आदरही वाटतो आणि म्हणूनच 'चंद्रोत्सव' मध्ये भेटलेल्या एका भाषांतरकर्ती, घटस्फोटीत स्त्रीच्या चारित्र्यावर दुसऱ्याने उडविलेल्या शिंतोड्याने पाध्ये तिच्याविषयी गैरसमज निर्माण करून घेतात. स्वतःचे मन मलिन करून घेतात, त्याबद्दल त्यांची त्यांनाच लाज वाटते, ते स्वतःचीच निर्भर्त्सना करू लागतात, स्तःशीच कुढू लागतात.

जपानमधील आरामगृहामध्ये, गेश्यागृहांमध्ये भेटणाऱ्या स्त्रियांबद्दल ही पाध्ये 'तोकोनामातील' लेखांतून सांगत राहतात - हॉटेलात आल्याबरोबर तेथील गोड परिचारिका तुमचे स्वागत करते - म्हणजे तोंडभर हास्य फुलविते, नेत्रांच्या मासोळ्या नाचविते, कमरेत लवून नमस्कार करते आणि लगेच तुमच्या बुटांचे बंद सोडू लागते. मग पायात घालण्यासाठी सपाता पुढे करते आणि तुम्हाला तुमच्या खोलीत घेऊन जाते... तिच्या समर्पित सेवेची मोहिनी अनिवार ठरते. थोडक्यात अशा या स्त्रियांमधील समर्पित सेवाभाव पाध्यांना आढळतो. अशा अनेक अनुबधातून, प्रसंगातून जपानी स्त्रीचे विविध गुणवैशिष्टयांनी युक्त असे चित्र पाध्यांनी 'तोकोनामा' या प्रवासवर्णनातून उभे केले आहे, जे विलक्षण आहे.

## ५.५ संदर्भ :

१) प्रवास वर्णन - एक वाड्.मय प्रकार - डॉ. वसंत सावंत.
२) मावंदे - चंद्रकांत वर्तक.
३) प्रभाकर पाध्ये - वाड.मयदर्शन-संपा. गंगाधर पाटील, म.सु. पाटील.

❖❖❖❖

# ६. घाटशिळेवरि उभी

: रा. भि. जोशी

# ६

# घाटशिळेवरि उभी प्रवासवर्णनातील निवडक लेख

**घटक रचना :**

६.१ प्रस्तावना
६.२ आहे कुठे स्वर्गाक्षम
६.३ वेरूळच्या वाटेने.
६.४ रोजनिशी अहमदनगर.
६.५ ओम् नमोजी आद्या.
६.६ परतीचा प्रवास.
६.७ घाट शिळेवरी उभी.
६.८ पुढची मजल.
६.९ थोडं मायेचं.
६.१० रोजनिशी रत्नागिरीची.
६.११ काळे शिलारत्न
६.१२ 'घाटशिळेवरि उभी' या प्रवासवर्णनातील भारतीय संस्कृतीचे दर्शन
६.१३ सरावासाठी प्रश्न

## ६.१ प्रस्तावना

रा. भि. जोशी यांचे 'घाटशिळेवरि उभी' हे अश्वमेघ प्रकाशन डोंबिवली यांनी सन १९९४ मध्ये प्रकाशित केले प्रवास वर्णन आहे. या आधी 'वाटचाल' (१९४३) 'मजल - दरमजल' (१९६७) 'उधव' (१९७८) आणि 'स्वर्गनगरी' (१९८६) ही प्रवासवर्णन प्रकाशित झाली आहेत. प्रवासवर्णन म्हणजे प्रवासाचे वर्णन अशी ढोबळ संकल्पना आहे. पण प्रवास म्हणजे काय तर एका ठीकाणाकडून दुस्या ठिकाणाकडे जाण्याची क्रिया. ही क्रिया कधी सहज तर कधी हेतूपूर्वक केलेली असते. आणि जेव्हा हेतू नक्की असतो तेव्हा त्या ठिकाणची असलेली माहिती किंवा स्थकमहात्म अधिकच सुस्पष्ट जाणवते. लक्षात भरते. अशा प्रवासाबाबतचे लेखन म्हणजे प्रवासवर्णन म्हणता येईल. प्रवासवर्णन हे जेव्हा नुसते केलेल्या प्रवासांचे आणि पाहिलेल्या स्थळांचे वर्णन असते तेव्हा त्याचा लेखनप्रकार म्हणून विचार करणे अनावश्यक ठरते. कारण तो एक प्रकारचा अहवाल असतो. अशा प्रकारच्या वर्णनात्मक किंवा वृत्तांतात्मक लेखनाला महत्त्व नसते. म्हणून प्रवासवर्णन या लेखनप्रकाराची मीमांसा करणे महत्त्वाचे ठरते.

'घाटशिळेवरि उभी ' या पुस्कात एकूण वीस लेख आहेत यापैकी 'पुढची मजल' हा १९६० साली आणि 'गोवे सदैव सुंदर राही' हा १९६६ साली नियतकालिकातून प्रकाशित झालेले आहे. तर उर्वरित अठरा लेख १९७८ ते १९८४ या सहा वर्षात वेगवेगळ्या नियतकालिकातून किंवा मासिकातून प्रकाशित झाले आहेत. या संग्राहातील लेख उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवे ह्या प्रदेशातील काही स्थलासंबधी व्यक्तिसंबधी आहेत. खरे तर ते तसे वृत्तांतात्मक स्वरूपाचे आहेत. पण लेखक जेव्हा संवेदनक्षम, सुसंस्कृत, जिज्ञासू, जगरहाटी डोळसपणे पाहणारा असला तर त्याचे लेख प्रदेशाच्या इतिहासाची, तत्कलीन समाज व्यवस्थेची, राजकीय जीवनाची जाणीव करून देणारे ठरतात. आणि मग त्यामध्ये आपोआप मूल्यात्मकता प्राप्त होते. रा. भि. जोशी. यांच्या ' घाटशिळेवरि उभी' या लेखांना ती प्राप्त झाली आहे.

फक्त वृतांतात्मक आणि भाहायुक्त अशा दोन्ही प्रकारच्या प्रवासलेखनाला ऐतिहासिक, चारित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक महत्त्व मिळण्याची शक्यता असते. ऐतिहासिक प्रकारात विश्र्वासनियता आणि माहितीचे महत्त्व आणि स्पकाचे कालानुरूप महत्त्व जितके सत्याच्या अधिक जवळ जाईल तितके त्या लेखांना महत्त्व प्राप्त होते. चरित्रात्मक / आत्मचरित्रात्मक प्रकारात लेखकाचे व्यक्तिमत्त्व रहिलित सुसंस्कत , संवेदनाक्षम असेल त्या प्रमाणात त्या त्या वर्णनाला महत्व राहील. ललित निबंधाचा विषय लेखकाच्या व्यक्तित्वाशी एकरूप झाला आणि लेखकासह तो सुस्पष्ट झाला तर तो प्रवासवर्णनाचे रूप धारण करतो आणि त्यावरून प्रवासवर्णनाला महत्व – मूल्यात्मकता प्राप्त होते.

**'घाटशिळेवरि उभी' प्रवासवर्णनातील लेखांचा आशय.**

## ६.२ आहे कुठे स्वर्गश्रम

हा या लेखसंग्रहातील स्थळमाहत्म्य स्पष्ट करणारा लेख आहे.'दीपावली' या दिवाळी अंकात १९७८ ला प्रथम प्रकाशित झाला आहे. हिमालयाचा परिसर सोडून गंगा जिथे सपाटीवर आली ते हरिद्वार त्याला हरद्वार देखील म्हणतात. हिमालयातून गंगा उगम पावली पण तिचे प्रगटरूप पाहण्यासाठी किंवा तिचे स्वागत करण्यासाठी ब्रह्मादिक देव जिथे आले होते ते 'हर - हरिद्वार' किंवा 'हरिकी पैडी' या नावाने ओळखली जाते. हे स्थान पवित्र आहे. गंगेत स्थान करून कुशावर्तात पिंडदान केल्याने पुण्य प्राप्त होते हे कळल्यानंतर यात्रेकरूचे ठिकाण म्हणून व्यापारी आले. बाजारपेठा निर्माण झाली आणि त्याद्वारा हरिद्वार हे गाव निर्माण झाले.

प्रारंभीचे हरिद्वारचे स्वरूप अतिशय प्रसन्न, निसर्ग सौंदर्याने नटलेले होते. देशभरातील विविध यात्रेकरू लोकांची गर्दी येथे येऊ लागल्याने गंगातीरावर अनेक घाटांची रचना केली गेली. घाटाला लागून गंगेचा प्रवाह आणि पलीकडे झाडीने झाककेले हिमालयातील लहान मोठे डोंगर गंगेचा विस्तीर्ण प्रवाह, गंगेच्या प्रवाहाकडे पाठ करून उभी राहीलेली छोटी-छोटी घरे, येथील बाजारात कृष्णाजीने, रूद्राक्षांच्या - स्फटिकांच्या माळा, सापासारख्या वळणदार काठ्या गुरूकूल कांगडीची औषधे, कमंडलू किंवा अस्वलांची कातडी विकणारी छोटी-छोटी दुकाने होती. पण लेखक जेव्हा पंचवीस वर्षानी पून्हा हरिद्वारला भेट देतात तेव्हा त्यांना जाणवलेला बदल या लेखातून व्यक्त करतात. पंचवीस वर्षात बैठी घरे, दुकाने, ढाबे यांच्या जागी सिमेंटच्या

इमारती उभ्या राहिल्या. छोट्या दुकानांची जागा मोठ्या दुकानात परवर्तित झाली तर ढाब्यांचे भव्य हॉटेल झाले. जुन्या अतिशय दुर्गम रस्त्यांच्याऐवजी खूप रूंद रस्ते झाले. ही रस्ते यात्रेकरूसाठी रूंद झाली नसून हरिद्वार ऋषीकेशच्या वाटेने चिनी सरहद्दीपर्यंत सैन्य, लष्करी वाहने, रणगाडे ट्रक्स, जीप्स इ. अवजड वाहने जाण्यासाठी रूंद आली होती. शांत हरिद्वाराला एक प्रकारे बाजारू रूप प्राप्त झाले होते.

भारतीय यात्रेकरूंसाठी प्रसिध्द असलेल्या हरिद्वारमध्ये पूर्वीप्रमाणे मिळणारी वस्तू आजही मिळत असल्यातरी यात्रेकरूचे स्वरूप बदलले होते. मौजमजा करण्यासाठी येणारे यात्रेकरूच अधिक दिसतात त्यांच्यातील देवाभावपेक्षा आनंद भाव अधिक प्रमाणात जाणवत होता. भारतीय यात्रेकरूप्रमाणे विदेशी पर्यटकांनी ही जागा अधिक व्यापली होती. पण त्या गोरे पर्यटकांचा पोशाख मात्र केलेले, कफनी घातलेले, डोक्याचे मुंडण करून शेंडी राखलेले, परदेशी पर्यटक सहजपणे घाटावर, रस्त्यातून, गर्दीतून वाट काढीत फिरत होते. हे दृश्य आनंद देणारे असले तरी बदलाचे स्वरूप स्पष्ट करणारे होते.

या लेखात हरिद्वारपासून जवळ असलेल्या 'कनखल' स्थळाचे महत्त्व स्पष्ट झाले आहे. दक्ष प्रजापतीने आरंभलेल्या यज्ञाला आमंत्रंण नसताना 'सती' आली आणि तिथे बहिर्णीनी व बापाने तिचा अपमान केला शंकराचार्यांनी अपमान केला हे 'सतीला' सहन न झाल्याने तिने योगाग्नीने आपला देह नष्ट केला ते स्थान म्हणजे 'कनखल'. या कनखलला 'दक्षांचा शिरच्छेद होऊन त्याला बोकडाचे शिर मिळाले. पुढे यज्ञात शंकराला मानाचे स्थान मिळाले व आर्य अनाथ यांच्यामधल्या घोर संघर्षाचे आणि समन्वयाचे स्थान म्हणजे 'कनखल' हे कनखलचे पौराणिक महत्व लेखक सांगतात आणि 'हरिद्वार' देवलोकासाठीचे गाव होते याची जाणीव करून देतात. हरिद्वार ते कनखल या गावात आमूलाग्र बदल झाला आहे. कनखलच्या वाटेवर पंचवीस वर्षापर्वी असलेल्या वाड्या, मंदिरे, दसणाभी, सत्नाभी निरंजनी, निर्वाणी, उदसी अशा वेगवेगळ्या पंथाची आखाडे होती तिथे आता फक्त अंगाला राख फासलेली, लंगोटी लावलेली उग्र मुद्रेचे गोसावी दिसतात. 'आश्रमभूमय' असलेले हरिद्वार आता 'नगरभूमय' झाले आहे. यज्ञभूमीच्या जागी भव्य दशेश्र्वर मंदिर उभे राहिले आहे. यज्ञभूमीच्या फरसबंदची जागा आता नवीन बांधकामाने, घरांनी वेढलेली आहे. यज्ञातील सतीच्या आत्मदहनाचे स्मारक, तिचे न राहता, ज्याने मंदिर बांधले त्याचे ते स्मारक झाले आहे.

हरिद्वार ते ह्रषीकेश यातील बदल या लेखात स्पष्ट होतो. ह्रषीकेशलाही पूर्वी जे आश्रम नव्हते त्या ठिकाणी नवीन आश्रम यांची, धर्मशाळांची उभारणी झाली. ह्रषीकेशचे प्राचीन सौदर्य, निसर्गरम्य रूप जाऊन रस्त्यावरील माकडेही दुर्मिळ झाली आहे. लछमन झुला ओलांडून पलीकडच्या गंगेच्या तीरावर जेव्हा जेव्हा पर्यटक, यात्रेकरू जातो तेव्हा उजव्या हाताकडील सगळ्या तीर-भागाला स्वर्गाश्रम म्हटले जात होते. तिथे बदरी निशालजीचे छोटे मंदिर होते. आज लछमन झुला ओलांडून आले की रस्त्याच्या दोन्ही बाजूला उंच-उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत. आणि इमारतीच्या भितींवर नवीन नवीन जाहिराती व गीतेतील श्र्लोक किंवा धार्मिक वचने रंगवलिलेली दिसतात. पूर्वी तीरावर असणारी दाट साडी, छोटी-छोटी झोपडी होती. त्याऐवजी शीतल, प्रसन्न, सुखसुविधांनी संपन्न हॉटेल, आत्माप्रकाशजीचा आश्रम व इतर धर्मशाळा उभ्या राहिल्या आहेत. हॉटेल व्यवसायामुळे सर्व पर्यटनाच्या सुविधा ह्या परिसरात मिळत आहेत म्हणूनच लेखाला समर्षक शीर्षक मिळाले की "आहे कुठे स्वर्गाश्रम"? या लेखात हरिद्वार आणि आजूच्या - बाजूच्या भौगोलिक चित्रणाबरोबर होणारा मानवी बदल स्पष्ट होतो.

आणि स्वर्गाश्रय कोठे आहे तो गंगेच्या पवित्र पाण्यात आहे. पर्यटकांच्या मौजेत आहे की हॉटेल, आश्रयातून मिळणाऱ्या सुखात आहे. स्वर्गातून मिळणारे सुख हषीकेश - हरिद्वारामध्ये आता नाही हेच खरे. प्रवास करतांना सामाजिक अभिसरणाची जाणीव या लेखातून होते.

## ६.३ 'वेरूळच्या वाटेने'

औरंगाबाद ते वेरूळ प्रवासादरम्यान लागणारे प्रेक्षणिय स्थळे व गावे यांना भेटी देत तेथील ऐतिहासिक स्थळांचे व ऐतिहासिक व्यक्तींचे काही चित्रण या लेखात केले आहे. औरंगाबादवरून निघाल्यानंतर खुलताबाद व दौलताबाद ही दोन्ही ऐतिहासिक ठिकाणे रा. भि. जोशी पाहतात व त्या त्या ठिकाणाचे वर्णन इथे करतात. दौलताबाद 'मोमीन आरिफचा दर्गा आहे मोमीन आरिक हा दिल्लीहून दख्खनला आलेला. त्यावेळी दौलताबादला केल नावाचा राजा होता त्याला इला नावाची बहीण होती तिनं एका रात्रीत सगळ कुराण पाठ केले आणि इस्लामधर्माचा स्वीकार केला तीची कबर आहे. म्हणजे त्याकाळी हिंदू स्त्रियांनी सुध्दा इस्लामधर्म स्वीकारला होता. ईल राजा मात्र इस्लाम विरोधी होता म्हणून दूला रहिमानशहा गझनीहून सैन्य घेऊन युध्दाला आला त्या युध्दात ईला रहिमानशहा यांचा मृत्यु झाला त्या दोघांचे देह नदीकाठावर पुरले गेले त्यांच्या कबरी इथे आहेत. अंजळपूरच्या मनू नावाच्या राजाला एक नावाचा मुलगा होता त्याने जे नगर बसविले ते म्हणजे एकापूर. एकापूरचे एकौर - एकूर - वेरूळ झाले. अशी पुराणातली कथा. मुसलमानांच्या इतिहासात एक राजाचे अनेक उल्लेख आहेत.

दौलताबादला 'चाँद बोधल्याची समाधी' आहे. या चाँद बोधल्याकडे जातोपंत, जर्नादनपंत किल्लेदार होते व हेच जातोपंत उर्फ जर्नादनपंत संत एकनाथ उर्फ येकोपंत यांचे गुरू. मराठीतील शेख मंहमद यांनी चाँद बोधले - जातोपंत - येकोपंत यांचे वर्णन आपल्या लेखनात केले आहे. जर्नादनपंताना श्री दत्तत्रेय प्रभू मलंगाच्या रूपात भेटले दोघानी एका ताटात जेवण केले तेव्हा अध्यात्मात तरी हिंदू-मुस्लिमांमध्ये सायुज्य-सामंजस्य होते हे संत एकनाथ अनेक ठिकाणी नमूद करतात त्या राजा चाँद बोधलेची समाधी दौलताबाद किल्याच्या पायथ्याशी आहे. या सभाधीचे वर्णन महिपतीबुवांनी भक्तलिलामृतात पुढीलप्रमाणे केले आहे. ।। जैसी अविंधाची मदार जाव। तैसेंच वर रचले स्थान।। हिंदू आणि भवन । समाधान पावले.।। जेथे हिंदू-मुस्लिम दोन्ही समाजाचे लोक एकत्र येतात. उरूस साजरा करतात.

खुल्ताबादच्या आलीकडे 'परियोंका तलाब - पप्रांचा तलाव आहे या तलावाबाबत दोन आख्याथिका आहेत. एक पूर्वी कदाचित यादवांच्या राजस्त्रिया आणि मुस्लिम सुलतानांच्या - नबाबांच्या बेगमा जलाविहाराला येत असतील. त्या येईनाशा झाल्यानंतर, अआणि आसमंत निर्मनुष्य झाल्यानंतर चांदण्यारात्री जलविहाराला पत्रा येत असतील दोन्हीही लावण्यवती असल्यामुळे या तलावाला 'परिंयोका तालाव' हे नाव पडले असावे. तेरा - चौदाव्या शतकात उत्तरेकडून दक्षिणेकडे इस्लामचा प्रसार करण्यासाठी जे सूफी आले त्यांचे मुख्य केंद्र खुल्ताबाद होते खुल्ताबादला पहिला मोठा सुफीसंत म्हणजे 'मुंतखिबुद्दीन जरजरी' आले. तो धर्मप्रसारासाठी खूप धन देत असे म्हणून त्याला द्रव्यदाता 'जरबरब्श' असे म्हणत. हळूहळू खुल्दबाद इस्लामचे धर्मक्षेत्रच झाले. त्यामुळे अनेक सुफीसंताच्या कबरी-मकबरे येथे आहेत. त्यामध्ये शेख बुरहानुद्दीन, मलिक अंबर, अब्दुला तानासाह, राजूकत्ताल अशा नामवंत संत आणि राजेलोकांची

भूमी म्हणून 'खुल्ताबाद' (स्वर्गलोक) चे नामभ्रश होऊन खुल्ताबाद पडले आहे. असे लेखक म्हणतो.

वेरूळला पस्तीस लेणी आहेत तर अजिठ्याला तीस असे वेरूळचे वर्णन करून वेरूळच्या लेण्यांचे वैशिष्टये रा. भि. स्पष्ट करतात. वेरूळची लेणी दीड मैलाच्या डोंगरात कोरलेल्या आहेत आणि त्यामध्ये बौध्द, हिंदू जैन या तिन्ही धर्माच्या लेणी आहेत. बौध्दधर्माच्या बारा, हिंदू सोळा आणि जैनांच्या सात अशा सलग लेण्या आहेत. त्यामध्ये पाचव्या सातव्या पासून बाराव्या - तेऱ्याव्या शतकापर्यतंचा भारतीय शिल्पशैलीचा संगम आहे. या सगळ्याच्या मेरूमणी म्हणजे कैलास लेणे. बौध्द लेणी भव्य आहेत पण त्या साधारण अंलकृत आहेत. हिंदू लेण्यांमध्ये विष्णू लक्ष्मी, शंकर पार्वती यांच्या सौम्य व प्रसन्न मूर्तीबरोबरच कालभैरव व महिषासुरमर्दिनीच्या प्रंचड व भव्य मूर्ती आहेत. याशिवाय गंगा, यमुना आणि सरस्वती ह्यांच्या बांधेसूद मूर्तीचे दर्शन इथे घडते. वरपासून खालपर्यंत खडक फोडून चारी बाजुंना मोकळी जागा सोडून तयार केलेले कैलास लेणे हे शिल्पकलेचा अप्रतिम नमुना आहे. सभामंडपात, भिंतीवर, खांबावर ज्या अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत, त्यात शंकरपार्वती, मातृकांत्रीलिंगोद्‌भव, रामायण - महाभारत पुराणांतल्या प्रसंगाच्या इतक्या मूर्ती आहेत की, त्या वेगवेगळ्या काळाचे दर्शन घडवितात. प्रत्येक मूर्तीच्या अंगसौष्ठत्वाचे, त्यांच्या डौलाचे, त्यांच्या वळणदारपणाने आणि जिवंतपणाचे भाव सहज लक्षात भरतात.

कैलासमंदिराचे जवळच बारा तीर्थपैकी एक घृष्णेश्वरांचे तीर्थस्थान आहे. या मंदिराचे आधीचे नाव माणकेश्वर होते. त्याची एक आख्यायिका आहे की, उकपूरला एका राजाला पूर्व जन्मीचा एक शाप होता त्यामुळे त्याचे शरीर रात्री कृत्रीमय होत असे. त्याची पत्नी माणकावती त्यामुळे दुःखी होती. ती रात्रभर आपल्या पतीचे (राजाचे) शरीर राखण करी. एकदा तिला दिसले की एकाचे नेहमी प्रमाणे शरीर कृत्रीमय झाले आहे पण तोंड, हात-पाय मात्र चांगले आहे. तिने पतीला (राजाला) आदल्या दिवशीच्या दिनचर्याबद्दल विचारले तेव्हा तिला कळले की, घृष्णेश्वराशेजारी गाईच्या खुरामुळे पडलेल्या खड्‌डयात साठलेल्या पाण्याने त्याने हात-पाय व तोंड धुतले होते. त्यामुळे ते रात्री कृत्रीमय झाले नाही. तिने राजाला त्या खुरांच्या ठिकाणी नेले व तिथे विहीर खणायाला लावली. आणि ती अन्नोदक ग्रहन न करता शंकराची प्रार्थना करत बसली. साठव्या दिवशी विहिरीला अभाव पाणी लागले त्या पाण्याने तिने (राणीने) राजाला स्थान घातले. तेव्हापासून रात्रीला राजाचे शरीर कृत्रीमय झाले नाही. राणीने तेव्हाच घृष्णाश्र्वराचे सात दिवसात मंदिर बांधवून घेतले. पण ते डोंगरातून तयार झाल्यामुळे त्याला माणकेश्र्वर मंदिर असे नाव पडले. घृष्णेश्र्वराचे ते एक पीठ झाले. आजही त्याचा लौकिक आहे. असे वेरूळच्या लेण्याचे व तेथील मंदिराचे वैशिष्टचे रा. भि. जोशीनी या लेखातून वर्णन केले आहे. या लेखात ऐतिहासिक व पौराणिक संदर्भाचे योग्य दाखले सादर केल्यामुळे हा लेख माहितीवजा व प्रवासवजा आहे.

## ६.४ रोजनिशी अहमदनगर

रा. भिं. चा हा लेख डायरी स्वरूपाचा म्हणजे वृतांतात्मक स्वरूपाचा आहे. २० मार्च १९७८ ते २४ मार्च १९७९ असे पाच दिवसाचे पर्यटन अहमदनगर परिसरात लेखकाने केले आणि या पाच दिवसात त्यांनी पाहिलेल्या स्थळंची माहिती या लेखातून मांडलेली आहे. २० मार्च ला लेखक पूणेमार्गे अहमदनगरला पोहचले. अहमदनगरचे वैशिष्टये खास नसले तरी अहमदनगर शेजारी असलेल्या भिंगारला ऐतिहासिक महत्त्व आहे. १६८२ ला औरंगजेबाने भिंगारला तळ

ठोकला आणि १७०७ मध्ये भिंगारलाच औरंगजेबाचा मृत्यू झाला. तेव्हा त्याचे दक्षिणेतले कुतुबशाही आणि आदिलशाही आणि मराठ्यांचे राज्य समूळ नष्ट करणे त्यास शक्य झाले. या औरंगजेबाचे काळीज भिंगारला करण्यात आले तर त्याचा इतर देह खुल्ताबादला नेऊन समाधीस्त करण्यात आले. ते 'भिंगार' लेखकाने पाहिले. भिंगार गावचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री  चक्रधर या गावी अनेक दिवस राहिले होते त्यामुळे या गावात अनेक मंदिरे उभारली गेली. अहमदनगरमध्ये २१ मार्च १९७९ ला रे. टिळकाचे घर पाहण्याचे ठरविले. त्यासाठी ओळखीचे तरूण ख्रिस्ती कार्येकर्ते श्री सुधीर शर्मा यांची मदत रा. भि.ना. मिळाली. नगरला लोकमान्य टिळकांच्या अस्थीची समाधी आहे तिचे दर्शन घेऊन लेखक शर्माबरोबर मोडकांच्या घराकडे जातात. मोडक नगरमधील अतिशय प्रसिध्द व प्रतिष्ठीत आणि अगदी जुने कुटुंब. रे. रामकृष्ण पंत यांचे चिरजीव म्हणजे शाहूराव मोडक हे मोडक एकेकाळी मुंबई प्रान्ताचे पोलीस कमिशनर होते. या मोडकांच्या शेजारीच केळकर, वैशंपायन, डोंगरे, केळकर, करमरकर, टिळक, गोरे, सावरकर, गद्रे आणि आठवले असे कितीतरी म्हणून ब्राहमणांनी गेल्या शतकात  ख्रिस्तीधर्म स्वीकारला होता त्यांचे वास्तव्य अहमदनगर मध्येच. श्री संसार नावाच्या गृहस्थाच्या मालकीची चाळीवजा खोल्या त्यातील मधल्या तीन खोल्या म्हणजे रे. टिळकांचे निवासस्थान रस्त्यापासून साधारण दोन तीन फूट उंच, दहा बाय बाराच्या तीन खोल्यात रे. नारायण वामन टिळक त्यांच्या धर्मपत्नी मराठीतील आद्य चिरत्रकार लक्ष्मीबाई टिळक आणि महाराष्ट्राचे मुला - फुलांचे कवी बालकवी व इतर गोतावळ असे. राहत आज त्या खोल्यांचे मालक श्री संसार आहेत. त्यांनी त्या खोल्या भाडेकरूंना दिल्या असल्यातरी दारावर फक्त रे टिळक इथे राहत होते अशी पाटी लावलेली दिसते. पण त्याच्यापढे थोड्या अंतरावर रे. नारायण टिळकांची समाधी आहे. वाड्.मयातील आणि धार्मिक क्रांतीतील बदलांच्या खुणा पुसल्या गेल्या याची जाणीव रा. भि. ना. इथे होते.

२२ मार्च १९७९, रोजी औरंगजेबाला जिथे मृत्यू प्राप्त झाला ते ठिकाण औरंगजेबाचा दर्गा पाहण्यासाठी लेखक जातात. अहमदनगर ते भिंगार गाव रस्ता तसा रहदारीचा पण गाडीवाटेचा भिंगारला जिथे औरंगजेबाचे निधन झाले ती जागा आता एका भदरसाल्या मिळाली आहे. तिथे काम करणारा एक मुस्लिम तरूण म्हणतो की, यहा औरंगाजेबका निधन हुआ लेकीन बादशहाच्या शवाला स्नान घातल्यानंतर ते शव खुल्ताबादला नेले. इथे बदाशहाका कलेजा या आतडी कुछ नही" हे ऐकूना रा.भि.ना औरंगाजेबाच्या कारकिर्दीची जाणीव होते की  चौदा भावंडापैकी एकच सम्राट झालेल्या औरंगजेबाला साधी कबर इथे तयार करता आली नाही. भिंगारला ज्या ठिकाणी बादशहा औरंगाजेबास मृत्यू आला त्या ठिकाणी फक्त एक मस्जिद आहे पण तिचे भारताचा भूगोल, भारताचा इतिहास न शिकवता फक्त कुराणांच व इस्लामधर्माचं शिक्षण देणारी मदरसा उभी आहे. १९६२ ला भिंगारला ही मदरसा स्थापन झाली आणि त्यामध्ये भारतातील वेगवेगळ्या प्रातांतील मुलं शिक्षण घेतात त्यांचा खर्च वक्फ बोर्डकरत पण ज्या मुस्लिम राजाने वक्फबोर्डासाठी जागा दिली त्या राजांची माहिति इथे नाही. एवढच काय भौलाद आसाद यांचे कारणावर भाष्य करणारे एकही पुस्तक नाही. पण इराण - इराक मधील कुराणाच्या प्रती या मदरसामध्ये आहेत.

१४९० मध्ये बहमनी सलतन खीळी होऊन जुन्नरचा सुभेदार मलिक अहमदी याने सवता सुभा निर्माण करून नगरला किल्ला बांधला तो नगरचा किल्ला बघणे आवश्यक आहे असे लेखकास वाटते. सुभेदार मलिक यांचे वडील म्हणजे पाथरीचे कुलकर्णी त्यांनी मुस्लिमधर्म स्वीकारून बहमनी दरबारात सवता सुभा (स्वतःचे राज्य) निर्माण केले. त्या राजाने राज्यकर्ता

म्हणून नगरला आपले केंद्र बनविले. १८०३ मध्ये जनरल वेलस्लीने नगरचा हा किल्ला ताब्यात घेतला पण त्याला त्यासाठी खूप झुंज दयावी लागली. अखेरीस भिंगारच्या देशमुखानेच नगर किल्ला जिंकण्यासाठी जनरल वेलस्लीला मदत केली होती. त्याने राजा मलिक अहमदीला फसवून जनरला मदत केली. आजही किल्ल्याशेजारी मलिकतोफ अस्तित्वात आहे. त्याअगोदर चाँदबिबीने मोठ्या हिंमतीने चार महिने मोगलाविरूध्द हा किल्ला लढविला व जिकला होता. असा इतिहास आहे. याच चांदबिबिच्या सुलतानी राजवटीस कंटाळून तिच्याच माणसांनी तिचा खूण केला होता असा इतिहास आहे. पेशवेकालात मोरोबादादा फडणवीस यांना बावीस वर्षे कैद याच किल्लात भोगावी लागली. एवढेच नव्हे तर नाना फडणविस यांना ही काही महिन्यासाठी या किल्ल्यात कैद केले होते. अगदी अलीकडच्या काळात स्वातंत्र्ययुध्दात भाग घेणारे पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, शंकरराव देव यांना राजकीय कैदी म्हणून इंग्रजांनी या किल्ल्यात बंदी बनविले होते. अशी नगरच्या किल्ल्याची माहिती इथे लेखक देतात.

या लेखात नगरमध्ये वास्तव्य करणाऱ्या अनेक थोर विभूती व पंडित होत्या त्यांचा उल्लेख करतात. त्यामध्ये विठ्ठलराव घाटे, रा. ब. लोकहितवादी, रा. बा. शंकर पांडूरंग, रा. बा. लालशंकर उमियाशंकर, ब्राह्मधर्मावर शिकागोत भाष्य करणारे बळवंत भाऊ नगरकर,'गावगाडा' चे लेखक त्रिंबक नारायण अत्रे इ. या सर्व लोकांनी महाराष्ट्राच्या सामाजिक - सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाला वेगळे वळण दिले आहे. आज अहमदनगरचा हा ऐतिहासिक इतिहास आणि सामाजिक इतिहास पडद्याआड जात आहे. पण नगरचे साम्राज्य त्यामुळे पडद्याआड करणे शक्य नाही असे या रोजनिशीचे महत्त्व आहे.

## ६.५ ॐ नमोजी आद्या :

रा. भि, जोशी यांचा 'ॐ नमोजी आद्या' हा लेख म्हणजे संत ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाने, वास्तव्याने पुणीत झालेले गाव 'नेवासे' या ठिकाणची पौराणिक व ऐतिहासिक माहिती यात आहे. हा सर्व कथनात्म व वर्णनात्म स्वरूपाचा लेख आहे. नेवासे गावाचे पौराणिक माहात्म्य स्पष्ट करतांना रा. भि. म्हणतात की हे गाव आद्य आहे. समुद्रमंथन झाले तेव्हा समुद्र त्याच्या अगदी जवळ होता. सागर-मंथनात चौदा रत्ने निघाली त्यात सूरा आणि अमृत ही होते. त्याची वाटणी करावयाचे ठरले. देवाची व दैत्यांची समोरासमोर पंगत बसली. अर्थात वाढण्याचे काय स्त्रिया करत होत्या. तेव्हां विष्णूने मोहिनीच्या रूपाने एका हातात सूरा व एका हातात अमृतकुंभ घेतले व देवांना अमृत व दैत्यांना सुरा वाढणे सुरू केले. तेव्हा राहू हा चंद्र आणि सूर्य यांच्यामध्ये बसल्यामुळे त्यालाही अमृत थेंबे मिळाले ही चूक जेव्हा लक्षात आली तेव्हा विष्णूने अर्धरूप पुरूषांचे धारण करून राहूवर चक्र सोडले, राह्यचा शिरच्छेद झाला पण त्याचे शिर आकाशात उडून गेले त्याचा केतू झाला  व राहूचे बाकी शरीर समुद्राकडे धावू लागले तेव्हा शंकराने त्याचा पाठलाग केला त्याच्या शरीरातून शंकराने जे अमृत बाहेर काढले तीच अमृतवाहिनी नेवाश्याजवळून वाहणारी प्रवरा झाली अशी नेवासे गावाची पौराणिक कथा आहे.

तारकासुराने स्वर्गातून देवांना हाकलले तेव्हा विष्णूच्या कृपने देवांना निवासक्षेत्र - नेवासे झाले ही दुसरी आख्यायिका पण त्यातील काही देव तारकासुराच्या वधानंतर स्वर्गात परत गेले आणि त्यापैकी  मोहनीराज तेथेच राहिले त्याचे वर्णन ज्ञानेश्वरांनी त्रिभुवनैकपवित्र / अनादि पंचकोश क्षेत्र असे केले. ते नेवासे पाहतांना रा. भि. नी देवांचे निवासस्थान, महालयक्षेत्र कोठे दिसले नाही. परंतु नेवासेत 'मोहिनीराजाचे' प्राचीन दगडी मंदिर जवळपास पुरूषभर उंच दगडी

जोत्यावर बांधलेले दिसले. या मंदिराचा सभामंडप प्रशस्त आहे. आहिल्याबाई होळकर यांचे दिवाण सरदार चंद्रचुड यांनी दोनशे वर्षापूर्वी हे मंदिर बांधले आहे. त्यामुळे विष्णूने धारण केलेल्या अर्धतारी रूपाची सूंदर मूर्ती आहे. राहूवर चक्र सोडण्यासाठी धारण केलेल्या रूपाची शंख, चक्र, गदा आणि अमृतकुंभ हातात असलेली म्हणजे नेवासे गावाचे स्मारक रूप जाणवले.

संत ज्ञानदेवांनी जिथे 'ज्ञानेश्वरी' सांगितली ते मंदिर म्हणजे भव्य सभामंडप आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात देव नाही पण ज्ञानदेवांनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली तो खांब तीनचार हात उंचीचा आहे. हा खांब तिरका आहे. त्याची कोणतीही बाजू समग्र दिसत नाही पण तिरक्या खांबाचे गुपीत लक्षात येत नाही. आणि त्याबाबतीत कोणतीही माहिती उपलब्ध नाही. या मंदिराच्या बाहेर डाव्या बाजूला एका मोठी शाळुंका आणि पिंडी ठेवलेली आहे. ती मुळचीच असावी इतकी प्राचीन आहे. उजव्या बाजूला अलीकडे नव्याने बांधलेले विठ्ठल-रूक्मिणीच्या मूर्तीचे छोटे मंदिर आहे. निजामकाळात या मंदिरातील काही भाग उध्वस्त करून मुसलमानांनी तिथ मशिद बांधली पण ही मशिद ज्ञानेश्वराच्या खांबाच्या पाठीमागे आहे. त्यामुळे हिंदूनी निजामसरकारशी कोर्ट कचेऱ्या करून हिंदूचा हक्क परत मिळविला त्यामुळे याच मंदिरात समोर हिंदू व पाठीमागे मशिद असे चित्र दिसते. ज्ञानेश्वरांनी मराठी वाङ्.मयाला जो महान ग्रंथ दिला त्याची साक्ष नेवासे गावला याला आजच्या मराठी वाङ्.मयातही मानाचे स्थान आहे. कारण गोविंद वासुदेव कानिटकर आणि त्यांच्या धर्मपत्नी काशीबाई कानिटकर यांचे खूप वास्तव्य नेवासे स्थळी होते आणि त्यांच्याकडे हरिभाऊ आपटे काही काळासाठी राहिले. त्यामुळे हरिभाऊ आपट्यांना साहित्य, साहित्यशास्त्र, इतिहासशास्त्र, समाजसुधारणा, स्त्री शिक्षण यांचे बाळकडू काशीबाई कानिटकरांकडून नेवास्याला मिळाले. नेवासे हे त्याचे साक्षी आहे म्हणून रा. भि. जोशींनी या गावाचा प्रवास करून त्याचा इतिहास व वर्तमान सांगितला आहे. एवढेच या लेखात जाणवते.

## ६.६ "परतीचा प्रवास"

या लेखात मारूती चित्तमपल्ली कडून म्हणजे नवेगावबंधाच्या तळ्यातील काही बदके बघून नागपूरकडे उलट प्रवास करतांना आलेल्या अनुभावाचे कथन केले आहे. त्यामुळे कथनात्म लेख आहे. लवेगावबंध ते नागपूर बस (एस टी) बंद झाल्याने पुन्हा लाखनी साकोली मार्गे नागपूर असा प्रवास करावा लागला. नवगावबंधला बस स्थानक नाही त्यामुळे रस्त्यावर उभे राहून व ड्रायव्हर मर्जिने कोठेही बस थांबत असल्यामुळे ती पकडणे म्हणजे एक दिव्यच. नवेगावात त्याकाळीही दोन चार श्रींमत आसाम्याकडे मनोरंजनाचे साधन म्हणून काहीकडे टान्सिस्टर (रेडिओ) दिसले. जंगल प्रदेशाचा भाग असूनही आधुनिकता गावात शिरली होती. कॉलेजमध्ये जाणारी तरूण मुले र. भि. जोशीना बसमध्ये चढण्यास मदत करतात. मध्यंतरी कोणत्यातरी गावात यात्रा तिथे अर्धा तासा थांबून बस पुढे साकोलीला निघाली. पण बस सरळ बसस्थानकात न जात मध्येच थांबली सर्व प्रवासी चालक-वाहक नेमके कोठे आहेत हे बघतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते की चालक बसच्या हौद्यातून सर्पणाची (जळणाची) लाकडे काढून व्यवस्थित सायकल रिक्षामध्ये ठेवत आहे ती ड्रायव्हरची जणू खाजगी मालमत्ता आहे. अशा थाटात ड्रायव्हर वागत होता. तसाच वाहकही प्रवाशांच्या पेरू, कांदे, शेगा, भाजीपाल्याच्या गाठोड्यातून किलो-दोन किलो प्रत्येक भाजी काढून घेण्यात तल्लीन होता पण एकही प्रवासी त्यांना काहीही विचारत बोलत नव्हता. एकदाची बस लाखनी स्थानकात पोहचली. तिथे साकोली

जाण्याच्या प्रवाशांची प्रंचड गर्दी आणि एक लग्नाचे वऱ्हाड यामध्ये आपल्याला बस मिळेल का? ही शंका लेखकाच्या मनात भीती निर्माण करते पण नवेगावबांधची मुले पुन्हा उपयोगी पडतात. एस टी चे ब्रिद वाक्य "प्रवाशांच्या सोयीसाठी" हे मी केव्हाच विसरलो होतो. पण सरकारी सर्व खातीच जनतेच्या सोयीसाठी नाहीत. आधुनिकता गावागावात एस. टी. च्या रूपाने आली पण त्याचा फायदा गरीब जनतेला न होता कर्मचारीवर्गालाच होतो आहे असे चित्र रा. भि. जोशीना जाणवले व तेच कथन या'परतीचा प्रवास' मध्ये केले आहे.

हा लेख कथनात्म असला तरी तात्विक विचारांना प्रवृत्त करणारा आहे. भारत / महाराष्ट्र स्वतंत्र झाला, लोकशाही मूल्य व्यवस्था स्वीकारल्या गेली पण ती खेड्यात, नवेगावबांध लाखणी, साकोली या प्रश्नांचे उत्तरे वाचकाला शोधावे लागते.'दुरदेशाचे पाहुणे'-आणि'परतीचा प्रवास' हे दोन्ही लेख वाचकाला चिंतन करण्यास भाग पाडतात एवढे मात्र सत्य.

## ६.७ "घाटशिळेवरि उभी"

"घाट शिळेवरि उभी" या लेखात रा. भि. जोशींनी महाराष्ट्रातल्या दोवीचे वर्णन केले आहे. आणि देवीचे इतिहासातील, आख्यायिकातील स्थान, महाराष्ट्रच्या संस्कृतिक परंपरेतील महत्त्व स्पष्ट केले आहे. या लेखांना आध्यात्मिक व भावनिक महत्त्व आहे. महाराष्ट्रतील माहूर हे क्षेत्र भारतातील अनेक तीर्थापेक्षा अधिक श्रेष्ठ तीर्थक्षेत्र आहे. या क्षेत्रात नऊ कोटी पाचशे अडुसष्ट तीर्थ आहेत. माहूरचे माहात्म्य काशीक्षेत्रापेक्षा कणभर अधिक आहे. माहूरला रेणुकामातेचे दर्शन घेतले कि, सर्व तीर्थक्षेत्राचे दर्शन घडते असे म्हटले जाते. पण या लेखात तुळजापूरला केलेले पर्यटन व तुळजापूरच्या प्रभू रामचंद्राच्या वरदायीनीचे महत्त्व समर्थ रामदासांची कुलस्वामिनी, छत्रपती शिवाजी महारांजांची भवानी आणि सगळ्या महाराष्ट्राच्या तुकाईचे वर्णन आहे.

तुळजापूरला असलेले हे श्री भवानीमातेचे मंदिर व देवी वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते तिची वेगवेगळी नावे का पडली हे या लेखात सांगितले आहे. त्याचबरोबर तुळजापूरच्या मंदिराचे वर्णन आहे. कर्दम मुनींच्या निधनानंतर त्याची तरूण आणि सुंदर पत्नी 'अनुभूती' तपश्र्चर्येला बसली तेव्हा तिच्या रूपावर लब्ध घेऊन कामांध कुकर दैत्याने तिला आलिंगन देण्याचे धाडस केले. राणी अनुभूतीने भवानीला आवाहन करताच त्वरीत तूरजा तुळजाभवानी यमुनाचलावरून प्रकट झाली आणि कुकर दैत्याचा वध केला ती महिषारुरमर्दिनीच्या रूपात तुळजापूरला राहिली असे श्री भवानीचे - तुळजाभवानी - महिषासुरमर्दिनी नावे पडली.

कैकयीने पतीवचनाच्या साहाच्या प्रभू रामाला सीता लक्ष्मणासह वनवासाला जायला लागले. तेव्हा रावणाला सीतेला पळवून नेण्यायाचे फावले. तेव्हा सीतेच्या शोधासाठी राम ठिकठिकाणी भेटी देऊ लागला तेव्हा रामाची दया येऊन भवानीने त्यास दर्शन दिले आणि सीता दक्षिणेला गेली असे सांगून दक्षिणदिशा दाखविली म्हणून तिला 'रामचरदायिनी' हे नाव प्राप्त झाले. याच रामवरदायिनीने रामाचे खरच सीतेवर प्रेम आहे का याची परीक्षा घेण्यासाठी राम थोडे अंतर चालून गेल्यावर घाट शिळेवर सीतेचे रूप धारण करून उभी राहीली. पण हिला रामाने तात्काळ आणि तू का आई? असे मराठीत विचारले. रामाने असे म्हटल्यापासून ती महाराष्ट्रची 'तुकाई' झाली.

शहाजीराजे भोसले, शिवाजीराजे, शाहूराजे आणि नंतरच्या काळातील पेशवे यांची आराध्य देवी म्हणून याच देवीला सन्मान प्राप्त झाला आहे. श्री शिवाजी माहारांजाना दृष्टांत देऊन स्वराज्य स्थापनेसाठी स्वहस्ते भवानी तलवार देणारी देवी म्हणजे श्रीभवानीमाता असे तिला शिवकालीन नाव मिळाले. तर समर्थ रामदासांनी "दुष्ट संहारिले मागे। ऐसे उदंड ऐकिले। परंतु रोकडे काही। मूळ सामर्ध्य दाखवी।" अशी मातेची आळवणी केली आणि तिने ऐकली व शिवाजी राजा घडविला, वाढविला. अशी ही महाराष्ट्रची लाडकी देवी 'कुलस्वामिनी' असे नाव धारण केले. महाराष्ट्रतील सर्व जातीची देवी म्हणून तिला वरदामिनी नाव मिळाले. जो जो वर मागेल त्या त्या व्यक्तीच्या नवसाला (वराला) पावणारी म्हणून वरदामिनी असे नाव पडले असावे असे रा. भि. लिहितात.

भवानी मातेने हिमालयातून महाराष्ट्रत राहवयचे ठरविले तेव्हा गंगा, यमुना, नर्मदा, कावेरी इ. नद्या इथे आल्या आणि तीन सर्वच एकत्र येऊन जो कल्लोळ झाला त्याचे तिथे कल्लोकतीर्थ झाले व भारातील सर्व पवित्र नद्यांचा तीर्थ संगम म्हणून याच देवीला 'कल्लोकतिर्थी' नाव पडले. अशा या भवानी मातेचे मंदिर एका विरूंद खोऱ्यात जवळजवळ अर्ध्या उतारावर आहे. पायऱ्याच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीवर दगडात हत्ती कोरलेले आहेत. समोर होमकुंड आहे. मंदिरासमोर सभामंडप आहे सभामंडपाच्या आडव्या भागावर शिन्देशाही पगडी घातलेला पितांबर नेसून उपरणे घेतलेला गणपती लोडाला रेलून बसलेला आहे. त्याच्या शेजारी ऋध्दी किंवा सिध्दी बसली आहे. गणपतीचे हे मंदिरातील रूप अप्रतिम आहे. होमकुंडाच्या गायमुखातून पडणारे पाणी काशीच्या गंगेतून इथे येते अशी आख्यायिका आहे. ती गरीबनाथाची आख्यायिका आहे. देवीचा परमभक्त गरीबनाथ देवीला म्हणाला, 'मला काशीला जावयाचे आहे.' देवी म्हणाली 'काशीला कशाला जातोस?' काशीची गंगा इथे गायमुखातून बाहेर पडते आहे पण नाथाने हट्ट धरला तेव्हा देवीने त्याला एका काठीला लिंबू बांधून ती दिली आणि म्हटले, ही काठी काशीला गंगेत टाक. गरीब नाथ काशीला गंगेत ती काठी टाकून परत तुळजापूरला आला तेव्हा त्याने टाकलेली काठी गायमुखातून बाहेर आली. म्हणून गायमुखातून पडणारे पाणी गंगेचे पवित्र पाणी आहे असे मानले जाते.

तुळजापूरात मातंगी देवीचे हेमाडपंती रचनेचे आणखी एक भव्य मंदिर आहे. मातंग नावाच्या असूराचा वध करण्यासाठी याच देवीने मातंगीचे रूप धारण केले, मांतगी मंदिरात 'चिंतामणी' म्हणून एक मोठा दगड आहे. या मंदिराची भव्यता व्यापक आहे व यात्रेकरू भक्तांची गर्दीही अधिक आहे. म्हणून तुळजापूर क्षेत्र सर्व जातीधर्मांचे पवित्र क्षेत्र मानले जाते. मातंगी देवीचीसंबध मूर्ती दिसत नाही. पण ही देवी अष्टभूजाधारक असून सहा हातात निरनिराळे आयुधे आहेत. एका डाव्या हातात मानवरूपी महिषासुराचे मुंडके केसांनी धरलेले आहे आणि एका उजव्या हातातील त्रिशूल त्याच्या शरीरात खुपसलेला. एक पाय महिषासुराच्या देहावर ठेवलेला. देवीच्या शिरावरच्या मुकुटात योनीसह शिवलिंग आहे. तिच्या उजवीकडे मार्कडेय मूनी आहेत. देवीच्या डाव्या-उजव्या खांद्यावर चंद्र-सूर्य आहेत. अशी अप्रतिम छोटेखानी मूर्ती गाभाऱ्यात दिसते. पणतीचे तेज व करारीभाव सहज लक्षात भरतो. या देवीच्या अनेक लिलया आहेत. (विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष लेख वाचावा) त्याचे वर्णन लेखकाने केले आहे.

लेखाच्या शेवटी सामान्य भक्ताला न येणारा अनुभव रा.भि.जोशींनी ती कथन केला आहे की, माझ्या मनात देवीचे दागदागिणे बघण्याची सुप्त इच्छ होती. तेव्हाच कोणतरी मोठे सरकारी अधिकारी दर्शनासाठी आले होते. त्यांना दाखविण्यासाठी दागिणे बाहरे काढले होते पण

सामान्य व्यक्तीला भक्ताला तिकडे जाण्यास मज्जाव होता. मी माझी ओळख करून दिली तेव्हा देवीचे दागिने बघण्याची संधी मिळाली. देवीच्या बोटांत, मनगटांत, दंडात, कानांत, नाकांत, गळ्यात घालवयाच्या सोन्याच्या, मोत्यांच्या रत्नांच्या असंख्य अंलकारच्या राशी तिथे आहेत. तुरीच्या डाळीएवढ्या आकारापसून बोराएवढ्या, त्याहून काही मोठ्या वेगवेगळ्या आकारांचे, पैलूचे हिऱ्या-माणका-पाचूचे दागिने त्यात होते. शिरपेच, किरीट, टिका, ढुशी, सरी, चंद्रहार, बोरमाळ, वाकी, पोच्या, अंगठ्या, मोत्यांच्या दुहेरी-तिहेरी अनेक माळा दागिन्याच्या राशीत दिसले. श्री भवानी मातेला अर्पण केलेल्या दागिन्याचे मोल अमूल्य आहे पण त्या दागिन्याच्या कलाकुसरामध्ये चवथ्या शतकापसून ते ग्रीक संस्कृतीतील व मध्यभारतातील स्त्रियांच्या दागिन्यांचे जे. जे. प्रकार आहेत ते ‘स्त्रीलंकार’ या खजिन्यात आहेत हे मला जाणवले. छ. शिवाजीराजांनी देवीला अर्पण केलेले अंलकार व त्यानंतर श्री भवानी मातेच्या भक्तांनी अर्पण केलेले अंलकार त्यांना स्पर्श करण्याची मिळालेली संधी हेच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे सुख आहे अशी कृतज्ञता व्यक्त करून लेखकाने तुळजापूरच्या प्रवासातील व मंदिरातील देवीच्या रूपाचे वर्णन केले आहे.

## ६.८ “पुढची मजल”

“पुढली मजल” हा रा. भि. जोशी यांनी प्रवासवर्णन लेखात सर्वात आधी लिहलेला लेख आहे. या लेखाचे प्रकाशन ‘धनुधारी’ या दिवाळी अंकात १९६० ला झाले असले तरी त्याचा लेखन काळ १ जानेवारी १९२६ ते ते ३ जानेवारी १९२६ असा आहे. हा लेख नोंदी स्वरूपाचा आहे. अगदी तरूण वयात मित्रासमवे इंदूर - मुंबई -ठाणे - पुणे असा सायकलवरून केलेला प्रवास. इंदरूवरून रात्रीच्या वेळी पोहचलो ती रात्र म्हणजे १ जानेवारी १९२६ त्या रात्री काहीही पाहणे झाले नाही. मुंबईतील स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रेक्षणिय स्थळे म्हणजे सेंट टॉम़सचे कोटातले कधीड्रल, फांऊटन, प्रिन्स ऑफ़ वेल्स म्युझियम, अपोलो बंदर, राजाबाई टॉवर, हायकोर्ट इ. इमारती पाहून गिरगाव - गिरगाव भायखळ्याचा राणीचा बाग, लालबाग, परळ या मुंबईच्या परिसरात सायकलवरून दोन दिवसात करता येईल तेवढा प्रवास केला त्या वेळी असलेल्या माटूंगा - शीवच्या पोलिसांनी सायकल प्रवास करतात म्हणून केलेले सहकार्य महत्त्वाचे ठरले. सोबत आलेला मित्र श्री कीर्तीकर मुंबईतच राहणारा होता म्हणून दुसरा मित्र बापू सोबत कुर्लामागे निघालो तेव्हा प्रथम विद्युतवर चालणारी रेल्वे बघितली. ही बिन एंजिनाची गाडी एकदम थांबते व एकदम गती घेते एवढीच तिची माहिती त्यावेळी मिळाली.

ठाणे हे प्राचीन काळातील ‘श्रीस्थानक’ मार्को पोलोच्या काळातील एक बंदर, पोर्तुगीज राजवटीत ‘ख्रिस्तीधर्माच्या’ प्रसारांचे ठाणे घरे जवळजवळ अरुंद रस्ते या ठाण्यातील किल्ल्यातून ‘त्रिंबकजी इंगळे’ ब्रिटीशांच्या कैदेतून पळाले होते त्या किल्याला भेट दिली. अतिशय झाडा-झुडपांच्या मागे मुंब्र्याच्या खाडी किनारी असलेला किल्ला भग्न अवस्थेत दिसला. पुढे खोपोलीला बापूच्या नातेवाईकाकडे रात्रीच्या मुक्काम होता. सकाळी खोपोलीत नाना फडणविसांनी बांधलेला तलाव बघितला. हा तलाव भव्य व अष्टकोणी आहे तलावाच्या शेजारी एक छोटसे देऊळ. त्याच दिवशी ब्रिटीश काळात टाटांनी उभारलेला विजेचा कारखाना बघितला. पाण्यापासून वीज निर्माण करणारे तंत्रज्ञान तेथील महाराष्ट्रीयन इंजिनिअर समजावून सांगतात की “डयूक्स नोजजवळ फोशअर - बे आहे. तिथंपाणी मोठ्या नळात शिरत आणि एकदम सतराशेचाळीस फूट खाली कोसळत. ते ज्या चाकांवर कोसळत ती चाक हत्तीच्या कानासारखे द्रोण केले की जशी दिसतील तशी होती आहेत. त्यांना टर्बाइन्स म्हणतात. त्या तीस

हजार अश्वशक्ती निर्माण करतात आणि पायलन्सवरून ही वीज एक लक्ष व्होल्ट्सची तयार होते ती परळच्या रसिव्हिंग स्टेशनमध्ये नेली जाते व त्याचा पुढे शहरांना पुरवढा होतो. " अगदी तरूण वयात हे वीजकेंद्र बघावयास मिळाले याचा आनंद रा. भिं. ना. होतो. व तो अनुभव वाचकाला प्राप्त होते हे याचे वैशिष्ट्ये म्हणावे लागेल. दापोली सोडल्यानंतर अगदी उंच उंच चढाचे डोंगर लागतात ते खंडाळा- लोणावळ्याचे आहेत अशी बापू माहिती देतो. या चढातून सायकल चालवतांना तर कधी ढकलतांना सृष्टीचे सौंदर्य आनंद देते. त्यामुळे चढणीच्या प्रवासाचा शीण येत नाही. लोणावळ्याला इग्रंज आणि मराठ्यांचा तह झाला अशी माहिती होती पण तहाचे ठिकाण माहीत नव्हते म्हणून सरळ पुण्यात शिरलो असे नमूद करून पुणे म्हणजे काय फक्त माझ्यासाठी एक गाव / शहर नव्हते तर छत्रपती शिवाजीराजे लहाणपणी जिथे खेळले वाढले ते गाव. शिवाजींनी शाहिस्तेखानाची बोटे कापली ते शहर, पेशव्यांचे पुणे, नाना फडणविस थोरले बाजीराव, नारायणराव पेशवे, सवाई माधवरावांचे पुणे, याशिवाय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाला कारणीभूत ठरलेल्या (चिपळूकरांचे, टिळक-आगरकरांचे, सनातनी ब्राहमणांचे पुणे, विद्येचे माहेरघर पुणे, अशी पुण्याची माहिती रा. भि. करून देतात. याशिवाय पुण्याचे विद्वान लोक, पुण्याचे शिष्ट लोक, पुण्याचे लोक हुशार तेवढेच लबाड अशा पुण्यातील चांगली आणि वाईट प्रवृत्तीबद्दल रा. भि. लिहितात. शनिवार वाडा, कसबापेठेतील जिजाबाईचा लालमहाल, बुधवार पेठेतील नाना फडणाविस यांचा वाडा, माणकेश्र्वराचा वाडा ही फक्त नावे शिल्लक राहिली या थोर व्यक्तीच्या सहवासातील कोणत्याही खूणा इथे नाहीत. अशी जाणिवपूर्वक नोंद लेखक करतात.

पुण्यातील शिक्षणक्षेत्रात मानाचे स्थान असलेले फर्ग्युसन कॉलेज बघितले तसेच हरिभाऊ आपट्यांचा आश्रम, दादासाहेब गायकवाड (कोल्हापूरचे) यांचा वाडा आणि ब्राहमणांचे तसेच ब्राहमणेतरांचे ओंकारेश्र्वराचे मंदिर बघितले पण पुण्याजवळून वाहणारी मुठानदी, आणि तिच्या मागे चढत जाणारी पर्वतीची टेकडी बघून पुण्याला नुसते मन गुंतवून ठेवणारा इतिहासच नाही तर डोळे गुंतवून ठेवणारा मुळा-मुठाचा संगम आहे.

पुण्याची मंडई प्रसिध्द आहे असे ऐकूण रा. भि. मंडई बघणयासाठी जातात व वर्णन करतात की, चाकांच्या आखांसारखी आत गेल्यासारखी व नवख्या माणसाला बाहेर कसे पडावे हे समजू न देणारी ही मंडई गिऱ्हाईकाला मागेपुढे करावयास लावते. एकूण पुण्याचा माझ्या मनावर फारसा परिणाम झाला नाही. पुण्यात सायकल चालविणे मुंबईपेक्षा कठीण आहे. सायकलवाल्याच्या दृष्टीने रस्त्याने जाणाऱ्या गाई-म्हशी तशी पुणेरी माणसं वाटसरूचे साम्राज्य असलेले. एकूण पुणे अलौकिक व लैकिक वाटते पण नावीन्याचे असे नाही.

या तीन दिवसांच्या सायकल प्रवासातील अनुभवांचा, ज्ञानाचा आणि ऐतिहासिक स्थळांचा एकूण परिस्थितीसापेक्ष आलेख या लेखात दिसून येतो. लेखाचे वाड्.मयीन मूल्य फार नसले तरी प्रवासवर्णनाचा अनोखा भाग तो लक्षात राहतो एवढेच खरे.

## ६.९ 'थोडं मायेचं' :-

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी "सुवार्ता" च्या लेखकांच्या मेळाव्याला बोलविणे केले. त्यावर सपत्नीक रा. भि. हे आमत्रंण स्वीकारतात आणि एक दिवस ख्रिस्ती कुंटुबात राहण्यासाठी मिळेल का ? अशी अट घालून वसईच्या ख्रिस्ती कुंटुंबाची त्यांच्या हिंदू मिश्रित संस्कृतीची,

ख्रिस्ती सस्कृतीची आणि वसई परिसरातील इतर धार्मिक, ऐतिहासिक स्थळांची माहिती या लेखात देतात.

मुंबईवरून वसई अलीकडील नायगाव स्टेशनवर लेखक उतरतात तेव्हा सृष्टीने भरलेला भूप्रदेश त्याचे लक्ष वेधून घेतो. नायगावला श्री वेन्सी डिमेलो त्यांना घ्यायला येतात तेव्हा एकमेकांशी परिचित असलेले डिमेला विचारतात 'पाहुणे कोण?' उद्या पापडीला सुवार्ताचा मेळावा आहे. त्यासाठी आलेले पाहूणे. एवढीच ओळख करून दिली जाते. श्री वेन्सी डिमेलासह जेव्हा पालीबंदरला लेखक उतरतात जेव्हा सुसज्ज "स्नेहालय" घराकडे त्यांचे लक्ष जाते व आपली व पत्नीच्या या घरी राहण्याची व्यवस्था केली असावी असे त्यांना वाटते. घराचे "स्नेहालय" नाव जणू हिंदूच्या घराचे नाव पण खरे घर ख्रिस्ती कुंटुंबाचे. त्यावरून लेखक म्हणतात की, गोव्यातल्या ख्रिस्तीपैकी बरेच जण अजून पोर्तुगिज राजवटीतून बाहेर आलेले नाही पण वसईचे ख्रिस्ती पोर्तुगिज जोखडातून अडिचशे वर्षापूर्वीच सुटले. वसईचा प्रांत ब्रिटीशाकडे आल्यामुळे इतर महाराष्ट्रीय लोकाप्रमाणे ते ब्रिटीशांची प्रजा बनले. आणि त्यातूनच घराला "स्नेहालय" नाव मिळाले असावे.

वेन्सी डिमेलोच्या घरी त्याचे बंधूशी गप्पा मारतांना ते सामाजिक, राजकीय प्रश्नांवर बोलत होते पण बोलण्यात वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, जयवंत दळवी, साने गुरूजी यांचे संदर्भ येऊ लागले तेव्हा आपण एका ख्रिस्ती कुंटुबातील व्यक्तीशी बोलतो का ब्राहमण असे कळेनासे झाले. त्याचबरोबर फादर रॉड्रीग्स ह्यांनी तर युरोपमधील ख्रिस्ती धर्माच्या पवित्र स्थानी केलेल्या प्रवासाचे वर्णन आणि संत ज्ञानेश्वर - तुकाराम यांचे वचने वापरीत केलेले संभाषण गोंधळात भर घालणारे होते. आश्चर्यचकित करणारे होते. घराची रचना सुबक होती. घर पाहण्यासाठी जेव्हा आम्ही आत गेलो तर डिमेलोच्या आई - सुना - मुली नमस्कार करून सामोऱ्या आल्या व परस्परांची ओळख करून देऊ लागल्या. त्यातून घरातील सर्व स्त्रीया फक्त सुसंस्कृतच नाही तर उच्चशिशित व मुंबईला नोकऱ्या करणाऱ्या आहेत हे लक्षात भरले. त्यांच्याकडे चहापाण झाल्यावर डिमेलो म्हणाले की, "आपल्याला दुसरीकडे जावयाचे आहे" तेव्हा या घरात ट्रिब्रिटोने आपली व्यवस्था केली नसून दुसरीकडे आहे. त्या दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी निघालो तेव्हा वाटेनच झाडाझुडपात लपलेला देखणा टुमदार बंगला दिसला तो तो इथल्या काझीचा. पण मुळात हा बंगला गुजरातच्या सुलतानाचा होता तो काझीने विकत घेतला व शेजारी छोटी मस्जिद बांधली अशी हकिकत डिमेलोकडे चौकशी केल्यानंतर कळते. पायवाटेने जातांना लाभणारे निसर्गसृष्टीदर्शन यांचे वर्णन करून लेखक म्हणतात, आम्ही "ऑगुस्तान तवारीस" यांच्या घरी आलो. तवारीस यांचे घर अधिक मोठे, अधिक संपन्न सुखवस्तु दिसत होते. तवारीसच्या बौठकखोलीत मऊ गाद्याचा ऐसपैस सोफासेट, मधोमध प्रशस्त बैठे टेबल, एका बाजूला रेडियोग्राम-रेकार्डप्लेअर आणि सुबक अल्तार (मंदिर) होते. तवारीसच्या घरी सुध्दा वेन्सी डिमेलोच्या घरच्या प्रमाणे सर्व स्त्रीया सुशिशित व नोकरदार होत्या. घराची रचना सारखीच असली तरी श्रीमंती दिसत होती. अगदी आपल्या नातेबाईकांशी गप्पा माराव्या त्याप्रमाणे घरातील सर्वच गप्पा सहभागी होत होते. आपल्या आईने विचारपुस करावी तशी तवारिसच्या आई विचारत होत्या. तवारिसच्या घरातील वातावरण अतिशय सौजन्यपूर्ण आणि खेळकर होतं. महाराष्ट्रीय पध्दतीने शाकाहारी आणि रूचकर जेवणासाठी मात्र फादर दिब्रिटो, मी, पत्नी असे तिघे बसला असता कळले की पारंपरिक महाराष्ट्रीय लोक जसे आधी पाहुण्यांना जेवायला घालतात तशीच पध्दत या घरी होती. टेबलावर बसून जेवण करण्याची पध्दत ही ख्रिस्तीमध्ये अगदी अलीकडे आली नाहीतर त्यांचे राहणीमान, पेहराव आणि पुरूषासमोर

स्त्रियांनी धीटपणे उभे राहणे आधुनिकतेची साक्ष देणारे आहे. जेवतांना आग्रह करून पोटभर घ्या असे जे वाटत होत त्यात ख्रिस्ती  कुंटुंबातील माया (प्रेम जिव्हाळा ओसंडून वाहत होता म्हणून थोडी मायेची खीर घ्या. म्हणणारी आईच या लेखाची शिर्षक बनली. पण या घरी आपली राहण्याची व्यवस्था केली गेली नाही म्हणून फादर दिब्रिटो समावेत रात्री १०.०० दहा वाजता आम्ही तंवारीस "घरातून" मि. विल्यम नरोन्हांच्या घरी पोहचलो तेव्हा  मि. विल्यमचे घर म्हणजे राजवाड्याप्रमाणे पार असलेले घर होते. घराची सजावट आणि श्रींमती बैठक खोलीत लक्षात भरत होती. मि. विल्यमचे एक भाऊ दुबईला राहतात. त्यांच्याकडून सुबक वेगवेगळ्या शैलीच्या आकर्षक पध्दतीने रंगसंहिता तर होतीच पण प्रशस्त बेडरूमची मांडणी मात्र दरबारी होती. पंलगावरील गाद्यापासून प्रसाधन गृहातील सगळ्या वस्तू फ्रेंच किंवा अमेरिकन होत्या. फर्स्ट क्लास अतिथीगृह म्हणजे काय ते प्रथमच अनुभवायाला मिळाले.

दुसऱ्या दिवशी पालीच्या चर्चमध्ये मि. विल्यमने सोडले व तेथीच भिस्साविधी अनुभवण्याचा योग आला. प्रत्यक्ष उपासनेला सुरवात करण्यापूर्वी फादर ब्रिटोने आमची सर्वांना ओळख करून दिली. आजुबाजूला बसलेल्या उपादकात आमच्याबद्दल आपुलकीची जाणीव डोळ्यातून स्पष्ट दिसत होती. फादर दिब्रिटोनीं आम्हाला  फक्त ख्रिस्ती कुटुंबात स्थान दिल नाही तर चर्चाविधीत आणि धर्मजीवनात ही स्थान दिले होते. भिस्साचा विधी प्रथम पाहत असल्यामुळे सर्व विधी मराठीत होत आहे. याची जाणीव झाली म्हणजे धर्म ख्रिस्ती तरी भाषा मराठी असा संगम इथे जुळला होता. कुजबुजल्या आवाजात होणारी प्रार्थना, ख्रिस्ती स्त्री-पुरूषांची गाणी, त्यांचा स्वरमेळ यामुळे चर्च निनादत होते आणि प्रसंगी निशब्द शांतही होत होते. पालीचे हे चर्च "देवमाता मारियेचे" आहे वसई प्रांतावर पोर्तुगीजांचा अंमल बसल्यानंतर जी चर्च बांधण्यात आली त्यापैकीच एक. म्हणजे जवळजवळ चारशे वर्षापूर्वीचे. वसईचे ख्रिस्ती कॅथलीक असले आणि आडनावे पोर्तुगीज असली तरी ते स्वतःला पोर्तुगिज मानत नाही. वसई प्रांत इंग्रजांच्या अंमलाखाली गेल्यानंतरही पोर्तुगीज राजांकडून प्रांताचे धर्मगुरू नेमले जात हे वसईकरांना पसंत नव्हते. पोर्तुगिज धार्मिक सत्ता त्यांना नको होती. ती झुगारून देण्यासाठी पाली आणि पापडी येथील धर्मगुरूनी जवळजवळ शंभर वर्ष लढा दिला असे हे पालीचे चर्च.

अशा ऐतिहासिक चर्चमध्ये फादर दिब्रिटो यांचा मिस्साविधी संपत आला होता. पवित्र धर्मगुरूच्या वेशात फादर दिब्रिटो म्हणाले, "ही भाकरी माझं शरीर आहे आणि हा द्राक्षरस माझ रक्त आहे ह्यांच तुम्ही सेवन केल्यान तुम्ही माझ्यात आणि मी तुमच्यात एकरूप झालो असे मला वाटेल" एवढ बोलून त्यांनी वेदीवरच्या प्लेटमध्ये ठेवलेला पवित्रकृत भाकरीचा तुकडा जाण्यापूर्वी आपल्या शिष्यासमवेत् येशु ख्रिस्ताने भोजन केले. असे होय.

पाली चर्चच्या मागे वसईचा किल्ला म्हणजे नुसते उद्ध्वस्त स्मारक आहे तर हे त्याच काळातील चर्च जिवंत आहे. विधी संपल्यानंतर फादर दिब्रिटोच्या घरी पापडीला आल्यानंतर त्यांचे भाऊ, आई, इतर सर्वाचे पोषाख म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रीयनच रूप होते. तेथून जवळच असलेल्या टॉमस बॅप्टिस्टा हायस्कूलच्या सभागृहात "सुवार्ता" लेखकांचा मिळावा होता. रॉक कार्व्हालो मेळाव्याचे अध्यक्ष तर फादर एलायस रॉडिग्ज यजमान होते . मेळाव्याला स्त्री-पुरूष मिळून सत्तर-पच्चाहतर लोक होते. मेळाव्यात चर्चा, अडचणी नवे प्रश्न यावर चिंतन झाले. पण लोक लक्षात राहिले.

ज्या कामासाठी म्हणजे 'एका ख्रिस्ती कुंटुंबात एक रात्रंदिवस घालवावी'या उद्देशाने आलो त्या एक नव्हे तर तीनचार कुंटुंबातील प्रेमळ पाहुणचाराने, भेटीगाठींनी, आदरतिथ्याना वसईच्या हिरवा समृध्दीने मने अगदी तृप्त झाली. जणू संपूर्ण वसईच म्हणत होती "थोड मायंच घ्या."

असा ख्रिस्ती कुंटुंबाचा सहवास लेखकाने रेखाटला आहे.

## ६.१० रोजनिशी रत्नागिरीची :-

लेखक रा. भि. जोशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या महाडच्या कॉलेजचे प्राचार्य होते. महाडला ज्ञानदानाचे कार्य करीत असतांना त्यांच्या मनात आले की महाड सोडून गेल्यावर कोकणात पुन्हा फिरायला येणे शक्य नाही म्हणून ते संगमेश्र्वर, रत्नागिरी, मालगुंड, गणपतीपुळे ही ठिकाणे पाहण्यासाठी जातात. त्यात मालगुंड पत्नीच्या आईचे आजोळ आणि कवी केशवसूतांचे जन्मगाव. या उद्देशाने या ठिकाणचा प्रवास करतात.

औरंगजेबाने दिलेल्या आज्ञेवरून त्याच्या लोकांनी छत्रपती संभाजीराजांना ज्या ठीकाणी पकडले ते गाव म्हणजे संगमेश्र्वर संभाजीराजे शूर, धाडसी, अंत्यत अभिमानी जसे होते तसेच अंत्यत उग्र, अविवेकी व नको त्या माणसांची संगत धरणारे होते. अशा संभाजी राजांना ते विलासात मग्न असतांना औरंगजेबाच्या लोंकानी अचानक छाप टाकून संभाजींना पकडले पुढे औरंगजेबाने त्यांना अतिशय अपमानास्पद वागणूक दिली. त्यापेक्षा त्यांनी मरण स्विकारले पण ज्या गावात संभाजीचे वास्तव्य होते ते गाव बघावे म्हणून रा. भि. एका ओळखीच्या व्याप्याऱ्याकडे उतरतात. संगमेश्र्वर गाव टुमदार निसर्गाने नटलेले, गावातील घरांची रचना साधारण उंच जोते, घरासमोर प्रशस्त अंगण पण सर्व घरे ऐकमेकांना लागून. जणू बाजरपेठेतील दुकानांची राग. अशा एका वाड्यात म्हणजे सरदेसायांच्या वाड्यात संभाजीराजेचा मुक्काम होता. वाड्यात छोटेखानी मंदिर, औरंगजेबाच्या लोकांनी राजेंना पकडले तेव्हा राजे याच मंदिरात लपून बसले होते असे एकाने सांगितले. मंदिर हेमाडपंती रचनेचे होते. त्याकाळी ते खूप उंच व प्रशस्त असेल पण आता त्याचे स्वरूप खूप लहान झालेले दिसले. या गावात त्याकाळी तिनशेपेक्षा जास्त मंदिरे होती, कोकणातील मुख्य बाजारपेठेतील एक गाव म्हणून त्याचा लौकिक होता. पण आज या ठीकाणी मुस्लिमांची संख्या अधिक आहे व हिंदूची कमी त्यामुळे मंदिरे उध्वस्त झालीत. गावातील मुस्लिमांची आडनावे हिंदूच्या आडनावासारखी त्याच्यातील स्त्रिया पडदापध्दती पाळत नाही. कदाचित ते पूर्वाश्रमीचे हिंदूच असावेत आणि मोगल काळात या लोंकानी मुस्लिमधर्म स्वीकारला असावा असे लेखकाला वाटते. असा संगमेश्र्वराच्या भेटीच्या वृत्तांत त्यांनी लिहला आहे.

२० एप्रिल १९६४ च्या डायरीत रा. भि. लिहितात संगमेश्र्वर सोडून आम्ही रत्नागिरीला पोहचलो माझ्ाी धर्मपत्नी सौ सुधा हिच्या मामाकडे चहा घेऊन लागेल आद्यकवी केशवसुताचे जन्मगाव मालगुंडला जाण्याचा बेत नक्की केला आणि परतच्या प्रवासात रत्नागिरीतील महत्त्वाचे ठिकाणे पाहू असे ठरविले. मालगुंडला सौ. सुधाचे मामा श्री गणेशपंत केळकर यांच्याकडे पोहचेपर्यंत पाच वाजले होते. मालगुंडमधील बाजारपेठ वगळता सर्व घरांची आवारे प्रशस्त होती. काही घरे शेतात बांधल्यासारखी वाटली घरांच्या आवारात साग, कुंभा, कळक, आंबा, फणस आणि रातंबे ही झाडे होती. मालगुंडची लोकसंख्या साधारण पाचसहा

हजाराची पण बाजारपेठ प्रशस्त होती. बाजारपेठेचे थोडे पुढे "बळिराम परकर हायस्कूल" च्या डावीकडे जाणाऱ्या रस्त्यावर केशवसुत मार्ग अशी पाटी लावलेली होती. मोकळ्या मैदानात एक पडके घर दिसले तेच केशवसुतांचे जन्मस्थान. सातखण लांब आणि तीन खण रूंद अशा घरात आता कोणीही राहत नाही. पर्यटकांशिवाय गावातील कोणीही इकडे येत नसावे असे वाटते. कारण घराची बहुतेक कौल उडाली होती. भिंती कोसळल्या होत्या. मागच्या खोलितल्या एका कोपऱ्यात एक चौरंगाचा देव्हारा होता. त्या काळवंडलेल्या तांब्याच्या ताम्हनात एक दगडाचा गणपती आणि भोके पडलेले दोन शंख, आजच्या या "चंद्रमोळी" घरात शंभर वर्षापूर्वी केसोपंत दामले राहत असतात आणि १८६६ ला याच घरात कवी केशवसुत जन्माला आले. ज्याला मराठी साहित्यविश्वात मानाचे स्थान आहे त्या कवीचे घर उध्दवस्त अवस्थेत आहे. या ठिकाणी केशवसुतांचे स्मरक व्हावे ही गावकऱ्यांची इच्छा. स्मारक होईल तेव्हा होईल. पण आज गावकऱ्यांनी या घराची डागडुजी करून ते जतन करावे असे लेखकांस वाटते. नाहीतर शालेय अभ्यासक्रमातून शिकविल्या जाणाऱ्या परकर हायस्कूल मधील विद्यार्थी विचारतील केशवसुत कोठे जन्माला आले. समाज आणि सामाजिक अभिसरणाच्या गप्पा मारणारे आजचे मालगुंड व इतर गावातील लोक या महात्माला विसरतील अशी खंत वाटते.

२१ एप्रिलच्या डायरीत लेखक लिहितात मालगुंडची खाडी ओलांडून गणपती पुळेला आलो आणि कवी महादेव मोडक यांनी केलेले सागराचे वर्णन प्रत्यक्षात अनुभवासाला मिळाले. गणपतीपुळेचा समुद्रकिनारा. पश्चिमेच्या क्षितिजापर्यंत पसरलेल्या काळया-निळ्या-करड्या समुद्राच्या लाटा आणि दक्षिणोत्तर लांबवर पसरलेली वाळूची पुळण. या पुळणीत घुसलेला डोंगराचा एक भाग. त्याच्या पायाशी केतळीचे दाट बन होते. चारशे वर्षापूर्वी मुसलमानी अंमलात या पुळणीचे बहिवटदार भिडे यांच्यावर संकट आले म्हणून ते डोंगरातील या केतकीच्या बनात लपून बसले. आणि अन्नत्याग करून गणपतीचे अनुष्ठान करू लागले तेव्हा मूळचा आगरगुळाच्या गणपतीने त्याना (भिडेंना) दृष्टांत दिला की, "तुझ्या संकटाचे निवारण होईल. मी आगुरतुळयावरून इथे प्रगट झालो आहे, हे केतकीचे बन. साफ कर, डोगराच्या पायथ्याशी खडकात दोन गंडस्थळ आणि दात ह्यांच्या रूपाने मी दिसेन. तिथे मंदिर बांधून पुजा-अर्चा कर" या दृष्टातप्रमाणे भिडेंनी मंदिर बांधले आणि पुळे गावचे गणपतीपुळे झाले. या गावच्या शेजारी असलेल्या कोतवडे गावच्या हरभट पटवर्धानांनी बारा वर्षे गणपतीच्या दुर्वांचा रस प्राशन करून वंश विस्तार वाढविला. त्यामुळे महाराष्ट्रातील पटवर्धन घराण्यातले संरजामदार, सरदार, जहागीरदार, संस्थानिक उदयाला आले. पेशवे काळात या दैवताचा उत्कर्ष झाला. तिथे अन्नछत्र उभे राहिले, देवाचे संस्थांलय झाले अनेक प्रतिष्ठिनांकडून देणग्या मिळाल्या पण आजही हा देव देणग्यांच्या ओझ्याखाली गुदमरला नाही साधाच आहे. दररोज समुद्र येऊन अंगणात सडा घालत आहे. सूर्य उगवतांना आणि अस्ताला जातांना मंदिराचा कळस दैदिण्य करीत आहे. असा गणपतीपुळेचा गणपती प्रसन्न व भक्तांच्या नवसाला पवणारा आहे. असे या डायरीत रा. भि. नी. नोंदविले आहे.

२२ एप्रिल १९६४ या दिवशीच्या परतीच्या प्रवासाचे वर्णन म्हणजे मालगुंड मधील केशवसुतांचे भग्न जन्मस्थान, गणपतीपूळेचे दिमाखदार वर्णन करून झाल्यावर रत्नागिरीला लोकमान्य टिळक ज्या घरी जन्मले ते मधल्या आळीतील घर बघितले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि वामन मोडक हे दोन समाजसुधारक, गोपळा गणेश आकरकर ज्या शाळेत शिकले ते पटवर्धन हायस्कूल, ब्रिटिशांनी पदच्युत केलेला ब्रम्हदेशाचा थीवा राजा जिथे राहिला तो राजवाडा, अंदमानहून सुटका झाल्यानंतर स्वांतत्र्यवीर सावरकर स्थानबध्द होऊन जिथे

राहिले ते घर, अस्पृश्यांना प्रथम प्रवेश मिळालेले पतितपावन मंदिर, शहरभर फिरून पाहिली एकूणच रत्नागिरी आपापल्या पध्दतीने समाजोद्धाराचे कार्य करणारे नेते मंडळी घडविणारी नगरी आहे. तसे बहिष्कृत राजाला आश्रय देणारे शहर आहे याचा हसा मनास उमटला. 'विहार' मध्ये सौ. सोबत पुन्हा आगरगुळे पाहवे अशी इच्छा झाली. गणपतीने आगरगुळे सोडले ते ठिकाणी बघण्यासाठी किती कष्टदायक प्रवास करावा लागेल हे सुधाचे मामा व पटवर्धन हायस्कुलचे हेडमास्तर खोल खोल आवाजात सांगत होते म्हणून तो प्रवास रद्द करावा लागला. असे या तीन दिवसांच्या नोंदित रा. भि. नी. संगमेश्वर, मालगुंड, गणपतीपुळे व रत्नागिरीचे वर्णन केले आहे.

## ६.११ काळे शिलारत्न :-

रा. भि. जोशींचे या प्रवासलेखातील शेवटचे दोन्ही लेख गोव्यावर, गोव्यातील प्रवासावर आधारित आहे. गोवा कितीहि वेळा पर्यटनसाठी पर्यटन म्हणून केला तरी मनाला उदासी किंवा तोचतोचपणा जाणवत नाही. गोव्याचे आधुनिकीकरण - औद्योगिकरण सुरू झाल्यापासून गोव्यातले पर्यटन कमी होत नाही, कारण गोव्यात अशी अनेक ठिकाणे आहेत की, जिथे गेल्याने शांतता आणि सौंदर्य-निसर्गाचे आणि वास्तूकलेचे एकदाच लाभतील व मन प्रसन्न होईल. गोव्यातील पणजी. फोंडे, खांडेपार, घारबांदोडे अशी नकाशावरील गावे पर्यटनाचे केंद्रे आहेत. पण त्यापुढे 'तांबडी' नावाचे गाव आहे तेथे तांबडी-सुलेचे शंकराचे मंदिर आहे ते पाहण्यासाठी केलेला प्रवास व त्याचे वर्णन या लेखात केले आहे.

प्रसिध्द विचारवंत श्री माधवराव गडकरी यांना आग्रह करून मी तांबडी-सूर्लाचे मंदिर पाहण्याचे ठरविले. गोवातील मंदिराच्या परंपरागत बांधणीचे वैशिष्टय, सौदर्य, त्यांची प्रमाणबद्धता, भव्यता त्यांत दिसणारी स्थानिक कलावंतांची आणि कारागिरांची कलाकुशलता यांचे उत्कृष्ट नमुने अनेक मंदिरातून दिसतात. तसे तांबडी-सूर्लाचे मंदिर नाही. ते देशावरच्या मध्ययुगीन दगडी मंदिरासारखे आहे. हे मंदिर अरण्यात आहे त्यामुळे बसने प्रवास करणे शक्य नाही म्हणून माधवराव गडकरी यांना सांगून व्यवस्था करून घ्यावी असे ठरले तेव्हा माधव गडकरी, प्रल्हाद वडेर, अंबाजी कामत असे सगळे गाडीने घारबांदोडे मार्गे साकोर्ड्याला पोहचलो. तेथे तळवलीकरांच्या मॅगनीजच्या खाणी आहेत तेथील मॅनेजरने आमचे आदरतिथ्य करून स्वतःची जीप प्रवासाला दिली रस्ता अरण्याचा होता म्हणून मूळ तांबडी-सूर्लेचे सरपंच यांना वाटाड्या म्हणून सोबत दिले. पुढचा प्रवास फक्त जंगलाच्या हिरव्या रानामधून जाणारा हा तांबड्या मातीचा रस्ता. तो गडद जवळजवळ शेंदरी तांबडाच. इतर गोव्यातही किंवा महाराष्ट्रातील कोकणात तांबडी माती आहे. पण येथे असलेल्या तांबडयामातीला सोनेरी झकाळी आहे इतर ठिकाणी ती नाही. साकुर्ड्यापासून पाचसहा किलोमीटर गाडी थांबली. पण या सर्व प्रवासात कोठेही वस्ती किंवा माणसे दिसली नाही. फक्त सावडर्याच्या काही अंतरावर शाळेत शिक्षिका असलेली एक तरूणी ओढा ओलाडतांना दिसली होती. पुढे हा रस्ता निमनुष्य वाटला.

सुर्लेचे मंदिर लहान नाही आणि फार मोठेही नाही. तीन टप्प्यांचे शिखर चांगल्या स्थितीत आहे. त्यांचे आमलक आणि कळसाखालचा कंगोरेदार गोलभाग तेवढा खाली पडलेला होता. शिखराच्या दोन्ही बाजूंवर कोरलेल्या मूर्ती आहेत. दगडाचे आयतकार आणि चौकोनी ढोकळे सारख्या अंतराने रचून त्यात विविधता साधली आहे. शिखर तीन टप्प्यात असल्यामुळे प्रमाणबध्द घडीव आकार आहे. सभामंडपाचे खांब ठेंगणे आणि जाड ते चौकोनी, अष्टकोनी,

कंगोरेदार भक्कम पण नाजूक वाटतात. सोन्याच्या किंवा काचेच्या वस्तूवर कोरीव काम करावे तसे खाबांवर कोरीव काम केलेले आहे. त्यामुळे मंदिर भव्य वाटण्यापेक्षा सुबक व डौलदार अधिक वाटते.

हे मंदिर कंदब वंशातल्या राजांनी बाराव्या शतकात बांधले असे म्हणतात. पण ते एवढ्यात अरण्यात का बांधले याचे उत्तर मिळत नाही. कदाचित त्या काळात व्यापारी व पथिकांना विश्रांतीसाठी आणि देव दर्शनासाठी बांधले गेले असावे असे सरपंच सांगतात. कथासरितसागर, कादंबरी, दशकुमार यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे राजकुमार - राजकन्याा यांच्या वनप्रणयासाठी याची उभारणी केली असावी असे वाटते. मंदिरात कोणतीही मूर्ती दिसली नाही, पण जवळच्या झाडीत मोकळ्या जागेत एक गजलक्ष्मीची मूर्ती होती. दोन्ही हातात कमळे घेतलेली त्रिभूजा लक्ष्मी, दोन बाजूंनी दोन हत्ती तिच्या मस्तकावर कलशातून जलाभिषेक करताहेत अशी. तिच्या खालच्या बाजूला मृदंग वाजवणारे माणसे, नृत्य करणारे माणसे, स्त्रिया अशी शिल्पे होती.

## ६.१२ ‘घाटशिळेवरि उभी’ या प्रवासवर्णनातील भारतीय संस्कृतीचे दर्शन

‘घाटशिळेवरी उभी’ रा. भि. जोशी यांच्या प्रवासलेखाचा चौथा संग्रह आहे. ह्यात समाविष्ट झालेल्या वीस लेखांपैकी ‘पुढची मजल’ हा १९६० साली आणि ‘गोवे सदैव सुंदर रहो’ हा १९६६ साली प्रसिध्द झाला बाकीचे अठरा १९७८ ते १९८४ ह्या अवधीत प्रसिध्द झाले आहेत. ह्या संग्रहातले लेख उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवे ह्या भागातल्या काही स्थलांसंबंधी आहेत. या संग्रहात एकूण वीस प्रवास लेखांचा समावेश आहे. परंतु त्यापैकी केवळ दहा प्रवास लेखांचाच अंतर्भाव अभ्यासक्रमात झालेला आहे व त्यांचाच अभ्यास आपण करणार आहोत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) आहे कुठे ‘स्वर्गाश्रम’ (२) परतीचा प्रवास (३) वेरूळच्या वाटेने (४) रोजनिशी अहमदनगरची (५) ॐ नमोजी आद्या (३) घाटशिळेवरि उभी (७) पुढची मजल (८) थोड मायेचं (९) रोजनिशि रत्नागिरिची (१०) काळे शिलारत्न यापैकी आठ लेख वेगळे अनुभव मांडणारे आहेत. अनुक्रमे ‘परतीच्या प्रवासात’ आलेले भले बुरे अनुभव आणि ख्रिस्ती लोकांकडून मिळालेल ‘थोड मायेचं’ आदरातिथ्य याविषयीचे सुखद अनुभव या दोन लेखात मांडलेले आहेत.

‘आहे कुठे स्वर्गाश्रम’? हा लेख हरिद्वार या तीर्थक्षेत्राच्या प्रवासातील अनुभवांवर आधारित आहे. हरिद्वार म्हणजेच करद्वार, तेथील हतरिकी पैडी, हरिदवारपासूनच जवळच असणारे कनखल, तेथील वाटेने लागणाऱ्या मोठमोठ्या बागा, वाड्या, मंदिरे, वेगवेगळ्या पंथांच्या गोसाव्यांचे आखाडे, कनखल मधील दक्ष प्रजापतीची यज्ञभूमी, सतीच्या आत्मदहनाचे स्मारक, हषीकेश, मुनिकी रती, लछमन झुला, स्वर्गाश्रम, बदरी विशालजीचे छोटेसे मंदिर यांचे संदर्भ या लेखात येतात. ही सर्व स्थळे पाहून आनंद होण्याऐवजी तेथे पाहायला मिळालेल्या सुधारणेमुळे मन विषण्ण होताना दिसते कारण या ‘सुधारणे’ मुळे हरिद्वारच्या अध्यात्मिक आणि नैसर्गिक सौंदर्याला अवकळा आली होती. दुसरे महायुध्द आणि चीन-पाकिस्तानशी बिघडलेले संबंध यामळे लष्कराचे वाढते साम्राज्य, सिमेंट कॉंक्रीटचे वाढते बांधकाम, यामुळे एकेकाळी ‘आश्रमभूमय’ असणारे हरिद्वार व कनखल ‘नगरभूमयः’ झाले होते. हषीकेशमधील लघमन

झुल्यावरून गंगा ओलांडून पलीकडच्या तीरावर गेल्यावर उजव्या हाताकडल्या सगळ्या तीर भागाला 'स्वर्गाश्रम' म्हणतात. जो एकेकाळी नितांत सुंदर, निसर्गरम्य होता, साधकांची आश्रम तिथे होती पण आज सगळ्या भागाचे आश्रमाचे स्वरूप नाहीसे होन्याना त्याला एखाद्या शहरातल्या पार्कचे स्वरूप आले होते. गंगेच्या तटाची नैसर्गिक शोभा तिथल्या हॉटेल्स आणि त्यांच्या बाजारीकरणाने गिळून टाकली होती. सगळ्या 'मॉडर्न' सोयी आल्या, पण स्वर्गाश्रम मात्र तिथे राहिले नव्हते असा दु:खी सूर या लेखातून जाणवतो.

'**वेरूळच्या वाटेने**' या लेखात देवगिरीपासून एळापूर-एळौर-वेरूळपर्यंतचा प्रदेशांचे वर्णन आले आहे. इतिहासामधील ईल आणि इला आणि पुराणातला एळ आणि एल इथे एकमेकांत मिसळली आहेत. मोमिन आरिफचा दर्गा, चाँदबोधल्याची समाधी, खुल्दाबाद, परियोंका तालाब ही ठिकाणी इतिहास आणि आख्यायिका यांनी भरलेली आहेत. सर्वात महत्त्वाचे आणि पाहण्यासारखे म्हणजे वेरूळची लेणी. वेरूळच्या लेण्यांचा समूह हा एक असाधारण समूह आहे. वेरूळला पस्तीस लेणी आहेत. विशेष म्हणजे दीड मैल लांबीच्या डोंगरात कोरलेल्या ह्या लेण्यांत बौध्द, हिंदू आणि जैन असा तिन्ही धर्मांची अनुक्रमे बारा सोळा आणि सात लेणी आहेत. लेखक म्हणतो, 'इथे वेरूळात इतिहासात पुराणे आणि आख्यायिका ह्यांचा त्रिवेणी संगम झाला आहे. ह्या संगमात बुडी मारून बाहेर पडताना एखाद्या स्वप्नातून बाहेर पडल्यासारखे वाटते. त्यातली बहुतेक दृश्ये हळूहळू विरुन जातात. काही थोडी ठळक-ठसठशीत मनात राहतात. विश्वकर्मा, दशावतार, कैलास, सीता की न्हाणी, इंद्रसभा, घृणेश्वर आणि अशीच आणखी काही.'

'**रोजनिशी अहमदनगरची**' या लेखात नगरमधील औरंगजेबाचे जिथे निधन झाले ते भिगार, फर्गसन गेट भागातले रेव्ह. ना. वा. टिळक ह्यांचे घर, समाधी, वेगवेगळ्या सामाजिक पातळ्यांवरची ख्रिस्ती कुंटुंबे, नगरातील जुनी ख्रिस्ती देवळे, ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, स्मृतिचित्रे बालकवी, वि. द. घाटे असे साहित्यिक आणि साहित्यकृतीचे संदर्भ नगरातील पहिले मराठी चर्च, औरंगजेबाचा दर्गा पाहायला गेल्यावर लेखकाला ओला अनुभव-दर्गा दाखविणारा, त्याची माहिती सांगणारा तरूण युवक मराठीत न बोलता उर्दूत बोलत होता व त्याला मराठीत बोलण्याची काही गरज आहे असेही वाटत नव्हते. महाराष्ट्रातच आणि महाराष्ट्राच्या गाभ्यात जन्माला आलेल्या युवकाला मराठीविषयी वाटणारी अनास्था पाहून झालेले दु:ख, आणि मदरसा असबिया दारूल उलूम अहमदनगर ह्या नावाची धर्मशिक्षण देणारी संस्था आहे म्हणून वाटलेले समाधान आणि सध्याच्या जगातल्या चालू परिस्थितीतल्या कोणत्याही घडामोडींचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणारी संस्था म्हणून वाटलेले वैषम्य; अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, नगरचा प्रसिध्द किल्ला, नगरचा इतिहास-मराठे व मुघलांचा इतिहास, नगरमधील अगणित थडगी, जमीनदोस्त इमारती, नगरच्या किल्ल्याने पाहिलेला अनेक थोर आणि महत्वाकांक्षी व्यक्तींच्या कर्तुत्त्वाचा कोंडमारा तसेच नगरने दिलेले अनेक थोर कर्तृत्ववान लोक त्यांचा इतिहास या बाबींचा आढावा घेतला आहे.

"**ॐ नमोजी आद्या**" या लेखात 'नेवासे' गावाचे वर्णन आले आहे. रा. भि. नेवाश्याला आद्यात्व बहाल करून इथे येन आपण 'समुद्र' मंथनापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतचा प्रवास केला' असे म्हटले आहे. ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानदेवीत गणेशाला संबोधून 'नमोजी आद्या' हे शब्द उच्चारले गेले. पण लेखकाने ज्ञानदेवांना 'आद्या' म्हटले आहे कारण ते मराठीचे आद्या ग्रंथकार आहेत. तसेच त्याना नेवेसेहि अनेक परींनी 'आद्या' वाटते. कारण समुद्रमंथन झाले तेव्हा समुद्र त्याच्या अगदी जवळ होता, तारकासुराने स्वर्गातून देवांना हाकलले, तेव्हा विष्णूच्या कृपेने त्यांना

इथे निवास मिळाला म्हणून त्यांचे निवासक्षेत्र-'नेवसे' झाले. नेवाश्याचा प्राचीन इतिहास, पौराणिक कथा याबरोबरच आधुनिक काळात तिथे झालेले बदलही लेखकाने टिपले आहेत. नेवासे मधील 'मोहिनीराज' चे मंदिर, विष्णूची 'अर्धनारी' मूर्ती ज्ञानेश्वरांनी जिथे ज्ञानेशवरी सांगितले ते मंदिर, तिथून जवळच मुसलमानांनी मूळचे शंकराचे देऊळ पाडून तिथे बांधलेली मशिद, प्रवरा नदी या सगळ्यांचे तपशीलवार वर्णन लेखकाने केले आहे. नेवाशाला जसा प्राचीन इतिहास आहे तसेच आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासातले एक छोटे पानही नेवशाला चिकटले आहे. गोविंदराव कानिटकर, काशीबाई कानिटकर आणि हरीभाऊ आपटे यांचा निर्मळ आणि मनमोकळा वाड्.मयस्नेह हे मराठी साहित्याच्या आणि सामाजिक सुधारणेच्याही इतिहासातले एक सुंदर पान आहे. ह्या विचाराने रा. भिं. ना धन्यता वाटते.

'**घाटशिळेवरि उभी**' या लेखात तुळजापूरच्या भावानीचे महात्म्य, तिची कथा, तिच्याविषयीच्या आख्यायिका, तिचे मंदिर यांचे तपशीलवार वर्णन लेखकाने केले आहे. अनुभूतीच्या काकुळतीने तुरजा 'तुळजाभवानी' यमुना चलावर प्रकट झाली. रामाला वर देणारी हीच 'रामवरदायिनी' घाटाशिळेवरि सीतेचे रूप घेऊन आली. हीच पुढे महाराष्ट्राची 'तुकाई' आणि भोसल्यांची 'कुलदेवता' झाली. शहाजीराजे, शिवाजीराजे, शाहूराजे आणि पेशव्यांनी तिची आराधना केली. तिला नवस केले, वस्त्रालंकार दिले. समर्थ रामदासांनी तिची आळवणी केली, ती सर्वसामान्यांची 'वरदायिनी देवी' झाली. शिवाय भवानीने इथेच राहयचे ठरवताच गंगा, यमुना, नर्मदा, कावेरी इत्यादी भारतातल्या नद्या नव्हेत तर भूतलावरची सगळी तीर्थे आली आणि ती सर्व एकाच वेळी एकत्र येऊन मिसळली तेव्हा जो कल्लोळ झाला त्याचे तिथे 'कल्लोळतीर्थ' झाले. लेखकाने भवानीच्या मंदिराचे अंबेजोगाईतल्या अंबेचे मंदिर व कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या मंदिराशी तुलना केली आहे. बालेघाटातल्या पठारावरच्या तुळजापूरला येणे शक्य झाले. प्रभु रामचंद्राची वरदायिनी समर्थ रामदासांची कुलस्वमिनी, शिवाजी महाराजांची श्रीभवानी आणि सगळ्या महाराष्ट्राची तुकाई पहायला मिळाली म्हणून लेखकाला आनंद होतो. तिथून निघताना, शिंदेशाही पगडी घालून शेषशायीसारखा लोंडाला रेललेला गणपती, भवानी देवीची संपूर्ण मूळ स्वरूपातली मूर्ती, कल्लोळतीर्थ, भारतीबुवांच्या  निर्मनुष्य मठाला प्रध्यापक, देवीचे पहायला मिळालेले दागिने या सगळ्यांच्या आठवणी मनात ठेवूनच लेखकाने देवीचा निरोप घेतला व मनाशीच म्हटले, 'आतापर्यंतच्या  माझ्या आयुष्यात जे काही मला द्यावसं वाटल ते तू दिल असशीलच आणि उरलेल्या आयुष्यात आणखी जे काही द्यावंसं वाटेल तेही देशीलच. मग मागायंच काय? आणि कशासाठी?'

'पुढली मजल' या लेखात इंदूर ते मुंबई आणि मुंबई ते पुणे असा केलेला सायकल प्रवास, या प्रवासात मुंबई पुण्यातील पाहिलेली विविध ठिकाणे यांचे वर्णन केले आहे. सेट टॉमसचे कोटातले कथड्रिल, भव्य टाऊन हॉल, फाऊंटन, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, अपोलोबंदर राजाबाई, हायकोर्ट वगैरे इमारती गिरगाव, भायखळा, राणीचा बाग, लालबाग, परळ वगैरे विभाग मुंबईत पाहिले. परतीच्या प्रवासात ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचे ठाणे, ठाण्याचा किल्ला, त्यामागचा इतिहास, नेताजी पालकरांचे गाव, चौक, नाना फडणिसांनी बांधलेले तळे, टाटांचा विजेचा कारखाना अशी विविध ठिकाणे विद्यार्थी दशेत पाहायला मिळाल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला आहे. पुण्यात आल्यावरही अनेक ठिकाणे पाहिली. शिवाजे राजे, पेशव्यांचे पुणे, नाना फडणिसांचे पुणे, थोरल्या बाजीरावाचे पुणे, अशी अनेक पुणी शिवाय पुणे म्हणजे विद्येचे माहेर, पुण्याचे लोक फार लबाड, पुण्याचे विद्यार्थी आणि स्त्रिया यांना मिळणारे स्वातंत्र्य या सगळयांबद्दल लेखकाला वाटणारे कौतुक, हेवा येथे व्यक्त झाला आहे. पुण्यात जिजाबाईचा लाल महाल, शनिवारवाडा, नाना वाडा, बुधवारवाडा, माणकेश्वरवाडा, मराठी शाळा, हुजूर पागा, हरिभाऊ आपट्यांचा

आनंदाश्रम, लक्ष्मणशास्त्री लेलेंचे घर गायकवाड-वाड़ा, लाकडीपूल, ब्राम्हणब्राम्हणेतरांचे ओंकारेश्वर, पुण्यातील स्मशानं, फर्गुसन् कॉलेज, महाराष्ट्र मंडळ, स. प. कॉलेज, पर्वती, मुठा नदी, पुण्यातील प्रशस्त मंडई अशी विविध ठिकाणे पाहिली. लेखक म्हणतात, "पुण्याला नसता मन गुंतवून ठेवणारा आसमंतही लाभला आहे" पण जाता जाता लेखक तिथल्या सायकल चालवण्याच्या अनुभवाबद्दल मिस्किलपणे सांगून जातात, "पुण्यात सायकल चालवणे हे मुंबईत सायकल चालवण्यापेक्षा कठीण आहे. पुण्यात ह्या सायकलस्वारीत मला काहीही अपघात झाला नाही. त्याचे श्रेय माझ्या कौशल्याला नसून पुण्यातल्या समंजस वाटसरूंना आणि तरबेज सायकलस्वारांना आहे आणि त्याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन."

**'रोजनिशी रत्नागिरीची'** या लेखात संगमेश्वर, रत्नागिरी, मालगुंड, गणपतीपुळे या ठिकाणच्या प्रवासाचे वर्णन आले आहे. औरंगजेबाच्या लोकांनी संभाजीराजांना जेथे पकडले ते संगमेश्वर, त्याचा इतिहास, तेथील मुसलमानांची घरे, सरदेसायांचा वाडा, हेमाडपंथी देवळे, वरूणा आणि अलकनंदा या नद्याचा संगम, शास्त्री नदी, शंकराचे मंदिर अशा संपन्नतेने परिपूर्ण संगमेश्वर. मालगुंडचा सुंदर निसर्ग, बाजार, हायस्कूल, केशवसुतांचे जन्मस्थान म्हणून लेखकाला मालगुंड अत्यंत महत्त्वाचे वाटते. पण केशवसुतांच्या घराची उद्ध्वस्त अवस्था पाहून त्यांना दुःख वाटते. गणपतीमुळे, तिथला सुंदर समुद्रतट, निसर्ग, गणपतीविषयीची आख्यायिका यांचे तपशीलवार वर्णन ते करतात व या ठिकाणाचे सौंदर्य अबाधित राहावे म्हणून गणपतीपुळे पर्यटनकेंद्र होऊ नये अशी मनोमन गणेशाला प्रार्थना करतात. रत्नागिरी हे शहर टिळक, भांडारकर, मोडक आगरकर, थीबी राजा, स्वतंत्र्यावीर सावरकर यांच्या वास्तव्याने ऐतिहासिकदृष्टया धन्यच झाले असे लेखकाला वाटते.

अशा प्रकारे रा. भि. जोशी यांच्या 'घाटशिळेवरि उभी' ह्या प्रवासवर्णनातील सर्व लेख, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गोवा ह्या भागातील स्थलांचे, तीर्थाचे तेथील इतिहासाचे संस्कृतीचे वर्णन करणारे अत्यंत संपन्न असे लेख आहेत. त्यातून केवळ त्या त्या स्थळांची माहितीच नाही तर त्यांच्याशी निगडीत अनेक पौराणिक, ऐतिहासिक, साहित्यिक संदर्भ विविध गोष्टी, कथा आणि प्रवासात लेखकाला आलेले विविध अनुभव आणि या सगळ्यांकडे पाहणारे लेखकांचे व्यासंगी, बहुश्रूत, रसिक हळुवार मन यांचेही दर्शन घडते.

**'घाटशिळेवरि उभी' मधील निवेदन शैली'** आधुनिक साहित्यात नवविचारांचे वारे वाहू लागले, नवीन विचारप्रवाह निर्माण होऊ लागले. नवसाहित्याला चालना मिळू लागली. साहित्याच्या विविध प्रकारांचे अंतर्बाह्य स्वरूप पालटू पहात होते. नवे विषय, नवा आशय। नवे तंत्र, अभिव्यक्तीतील आगळेपण, भाषाशैली असे बाह्यांगापासून ते अंतरंगापर्यत परिवर्तन होत होते. कोणत्याही ललितकृतीची् निर्मिती ललित लेखकाच्या अनुभव घेण्याच्या विशिष्ट पद्धतीतून होत असते. साहजिकच या अनुभवांची अभिव्यक्तीही व्यक्तिपरत्वे भिन्न भिन्न असते. अभिव्यक्तीच्या निवेदनशैलीच्या खास वैशिष्टयातून ललित लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रकटले.

लेखकाच्या निवेदनात गुंतागुंतीचे विचार, कल्पना, प्रतिक्रिया आढळतात. अशा निवेदनात उपहास ,कधी उद्वेग अशा विविध प्रतिक्रिया व्यक्त होतात. कधी हे निवेदन वस्तुनिष्ठ असते. निवेदनात लवचिकता असेल तर अनुभवाच्या स्वरूपानुसार तिची घडण बदलते व त्यात वेगळेपण येतो. कधीकधी निवेदनात तपशीलाचा हव्यास बारकावे टिपण्याच्या वृत्तीतून दिसतो. निवेदनात उपयोगात आणल्या जणाऱ्या प्रत्ययकारी प्रतिमा अधिक काहीतरी सांगून जातात. याउलट साधी प्रांजळ निवेदनशैली ही फार मोठी परिणाम साधून जाते. याचे उत्तम उदाहरण

म्हणजे गोडसे भटजींचे 'माझा प्रवास' हे प्रवासवर्णन, त्यांचे निवेदन सरळधोपट असले तरी मोठे प्रत्ययकारी असल्याने त्यास कलात्मक मूल्य प्राप्त झाले आहे. त्यांच्या निवेदनात अर्थवाहीपणा जाणवतो. रा. भि. नी स्वतःच म्हटल्याप्राणे भेट दिलेले स्थळ विशिष्ट स्वभावधर्मांनी युक्त असलेल्या लेखकाने बघितले असते व ते त्याच्या नजरेतून जिवंत होत असते. म्हणूनच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे कवडसे अशा प्रवासवर्णनात पडल्याखेरीज राहत नाहीत. व्यक्तिपरत्वे शैलीभेद आढळतो. लेखकाच्या लेखनशैलीतून वर्णनातून रसनिष्पत्री  कथारूप धागा, कल्पना रम्यता, विनोद असे भेद असतात. प्रवासवर्णनपर वाड्.मयाची लेखनशैली पद्यात्मक, पत्ररूप, गद्य रोजनिशी संस्कृती संकलनात्मक छोटे लेखरूप, निबंधात्मक अशी विविधढंगी असते. अशा विविध शैली वैशिष्ट्यांमुळेच प्रवासवर्णनातील एक वेगळ्या प्रकारचे लेखन म्हणून रूप लाभले. प्रवासी, त्याने पाहिलेली वास्तू, स्थळ, दृश्य, व्यक्ती यांच्यात परस्पर भाव संवाद प्रस्थापित झाला पाहिजे. यासाठी कल्पकता, पूर्ववृत्तीचे ज्ञान, तौलनिक व्यापक दृष्टी यांच्या अभिव्यक्ती होताना लेखक स्वतःची शैली शोधत असतो. त्याच्या शैलीवैशिष्ट्यामुळे प्रगल्भता येते.

रा. भि. ची शैली ही शब्द चित्रात्मक, गतिशील भाषासुलभ असून त्यांच्या वर्णनातून सौंदर्य किंवा अनुभव जसे टिपले जातात तसेच त्या स्थलांचा आत्मीयता त्याच्यातही तादात्म्य पावून सर्वागीण वैशिष्ट्यांसकट घेतलेला तो रसास्वाद असतो. लेखनातून, निवेदनातून वेळोवेळी आलेले पौराणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय संदर्भ त्यांच्या बहुश्रुततेची साक्ष पटवतात.

## ६.१३ सरावासाठी प्रश्न :

प्र. १. 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकाराची ठळक वैशिष्ट्ये सांगा.

प्र. २. माराठीतील प्रवासवर्णनाची परंपरा थोडक्यात विशद करा.

प्र. ३. रा. भिं. जोशींना भारतीय संस्कृतीबद्दल असलेले आकर्षण 'घाटशिळेवरि उभी' या प्रवासवर्णनातून सतत जाणवते. विधानाची चिकित्सा.

प्र.४. रा. भि. ची बहुश्रूतता 'घाटशिळेवरि उभी' या प्रवासवर्णनातील लेखातून कशी प्रत्ययास येते, सोदाहरण लिहा.

प्र. ५. 'तोकोनामा' हे प्रवासवर्णन प्रभाकर पाध्ये यांच्या सौंदर्यदृष्टीतून अवतरले आहे. विधानाची साधकबाधक चर्चा करा.

प्र.६. 'तोकोनामा' या  प्रवासवर्णनातून जपानी संस्कृतीचे दर्शन कसे घडते, सोदाहरण लिहा.

प्र.७. टिपा लिहा.

**(अ)**

(१) प्रवासवर्णन : एक साहित्य प्रकार

(२) मराठीतील प्रवासवर्णनाची परंपरा

(३) प्रवास व प्रवासवर्णनामागील प्रेरणा

**(ब)**

(१) 'पुढील मजल' पुणे शहाराचे चित्र

(२) 'वेरूळच्या वाटेने'वेरूळच्या लेण्या

(३) 'थोड मायेचं' शीर्षकाची समर्पकता

**(क)**

(१) जपानी 'चंद्रोत्सव'

(२) 'तोकोनामा ' शीर्षकाची समर्पकता

(३) जपानमधील गेशा संस्कृती

❖❖❖❖